




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय


■ अमरावती, सोमवार ११ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




## भारतात मोठ्या तेलाच्या विहिरी नाहीत

# पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करा





**बंगळुरू /हैदराबाद/ वृत्तसंस्था-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सांगितले की, आजच्या काळात पेट्रोल, गॅस आणि डिझेलचा वापर कमी करावा लागेल. शेजारील युद्धामुळे जगभरात पेट्रोल-डिझेलचे दर अनेक पटींनी वाढले आहेत.पंतप्रधानांनी हैदराबादमध्ये सांगितले की, भारतावर या जागतिक संकटाचा परिणाम जास्त आहे, आपल्याकडे तेलाच्या मोठ्या विहिरी नाहीत. ज्या शहरांमध्ये मेट्रो आहे, तेथील लोकांनी मेट्रोचा वापर करावा. कारपूलिंग करावे. आज वर्क फ्राम होमसारख्या उपायांची गरज आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले- आपण एकजूट होउन राष्ट्रहितासाठी आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. पश्चिम आशियाई संघर्षाच्या परिणामाचा संदर्भ देत नरेंद्र मोदी म्हणाले की, जेव्हा पुरवठा साखळी सतत संकटात असते, तेव्हा कितीही उपाययोजना केल्या तरी अडचणी वाढतच जातात. त्यामुळे, देश आणि भारतमातेला सर्वोच्च स्थानी ठेवून आपण आता एकजुटीने लढा दिला पाहिजे.ते म्हणाले की, देशभक्ती

### तेलंगणामध्ये 9,400 कोटींच्या प्रकल्पांचे भूमिपूजन केले

म्हणजे केवळ देशासाठी प्राण देणे नव्हे. देशासाठी जगणे आणि आपली कर्तव्ये पार पाडणे ही सुद्धा देशभक्तीच आहे. जनता आता घराणेशाहीला नव्हे, तर विश्वासार्हतेला पसंती देत आहे. सिकंदराबाद येथील जाहीर सभेत नरेंद्र मोदी म्हणाले, भाजपचा आसामपासून ओडिशापर्यंत आणि बंगालपासून पुद्दुचेरीपर्यंत झालेला विस्तार हा केवळ एक निवडणुकीतील विजय नाही, तर देशाच्या राजकीय विचारांमधील बदलाचे ते एक चिन्ह आहे. जनता आता घराणेशाही आणि कुटुंबवादाला नव्हे, तर विश्वासार्हतेला पसंती देत आहे.

ते म्हणाले की, १० वर्षांपूर्वी आसाममध्ये भाजपचे केवळ काही आमदार होते, पण आज तिथे तिस-यांदा भाजप-एनडीएचे सरकार स्थापन झाले आहे. दहा वर्षांपूर्वी बंगालमध्ये भाजपचे केवळ तीन आमदार होते, पण आज पक्षाने २०० चा आकडा पार केला आहे. जिथे भाजपचा झेंडा फडकवणारे कोणी नव्हते, तिथे आज भाजपची सरकारे स्थापन होत आहेत. पंतप्रधान मोदी ➯ (पान २ वर)

## तामिळनाडूत 'थलपती' पर्व! विजयनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

**चेन्नई/वृत्तसंस्था-** दाक्षिणात्य सुपरस्टार आणि तमिळगा वेत्री कळघम पक्षाचे संस्थापक विजय यांनी आज तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. चेन्नईच्या जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या एका दिमाखदार सोहळ्यात राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या ऐतिहासिक क्षणासह तामिळनाडूच्या राजकारणात गेल्या ६० वर्षांपासून सुरू असलेली DMK आणि AIADMK या दोन द्रविडी पक्षांची मक्तेद्दारी संपुष्टात आली आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत विजय यांच्या TVK पक्षाने १०८ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष म्हणून झेप घेतली होती. बहुमतासाठी आवश्यक असलेल्या ११८ या आकड्यासाठी त्यांना काँग्रेस (५), डावे पक्ष आणि इतर मित्रपक्षांनी पाठिंबा दिला आहे.विजय यांच्यासोबत त्यांच्या पक्षाच्या ९ इतर मंत्र्यांनीही शपथ घेतली. यामध्ये बुसी आनंद आणि के.ए. सेंगोट्टयन यांसारख्या दिग्गज नेत्यांचा समावेश आहे. या सोहळ्याला काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह देशभरातील अनेक विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. राजकारणात प्रवेश केल्यानंतर अवघ्या दोन वर्षांत विजय यांनी प्रस्थापित पक्षांना धूळ चारत सत्ता काबीज केली आहे. त्यांच्या या विजयाला लोकांचा विजय म्हणून संबोधले जात आहे. तामिळनाडूच्या इतिहासात १९६७ नंतर पहिल्यांदाच या दोन प्रमुख द्रविडी पक्षांव्यतिरिक्त तिस-या पर्यायाने सरकार स्थापन केले आहे. शपथविधीनंतर स्टेडियमबाहेर जमलेल्या हजारो चाहत्यांनी आणि समर्थकांनी थलपती, थलपती अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. मुख्यमंत्री विजय यांनी शपथ घेतल्यानंतर तामिळनाडूच्या जनतेचे आभार मानले असून, समाजकारण आणि पारदर्शक प्रशासन हेच आपल्या सरकारचे मुख्य उद्दिष्ट असेल, असे स्पष्ट केले आहे.

## थलपथी विजय यांचा धमाका: तामिळनाडूत 200 युनिट वीज मोफत

**चेन्नई:** तामिळनाडूच्या राजकारणात एका नव्या युगाची सुरु वात झाली आहे. अभिनेता ते राजकारणी असा प्रवास करणा-या सी. जोसेफ विजय (थलपथी विजय) यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच आपल्या जाहीरनाम्यातील महत्त्वाच्या आश्वासनांची पूर्तता करण्यास सुरु वात केली आहे. सत्तेवर येताच पहिल्याच दिवशी विजय यांनी तीन मोठ्या फाईल्सवर स्वाक्षरी करून जनतेला मोठा दिलासा दिला आहे. निवडणुकीपूर्वी दिलेले सर्वात मोठे आश्वासन पूर्ण करत, मुख्यमंत्री विजय यांनी राज्यातील घरगुती ग्राहकांसाठी २०० युनिटपर्यंत मोफत वीज देण्याच्या निर्णयावर स्वाक्षरी केली आहे. यामुळे वाढत्या महागाईत सर्वसामान्यांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे. ➯ (पान २ वर)

## कोरोनाचा नवा व्हेरिएंट सापडला, वटवाघळात 'क्लेड बी' विषाणूचा शोध

**नवी दिल्ली :** थायलंडमधील वटवाघळांमध्ये क्लेड बी नावाचा नवीन कोरोना विषाणू सापडल्याने खळबळ उडाली आहे. यामुळे जागतिक स्तरावर पुन्हा एकदा चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.हा विषाणू मानवी पेशींना संक्रमित करू शकतो, असा प्राथमिक दावा संशोधकांनी केला आहे. मात्र सध्या हा विषाणू माणसांत पसरत असल्याचा कोणताही ठोस पुरावा मिळालेला नाही. प्राण्यांवरील चाचण्यांमध्येही यामुळे गंभीर आजार झाल्याचे निष्कर्ष समोर आलेले नाहीत. तरीही संभाव्य धोका लक्षात घेउन जागतिक आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून पुढील संशोधन सुरू आहे.हा नवीन विषाणू मानवी पेशींना संक्रमित करण्याची क्षमता ठेवतो, असा दावा तज्ज्ञांनी केला आहे. हा विषाणू माणसांमध्ये पसरत असल्याचा कोणताही ठोस पुरावा अद्याप मिळालेला नाही. प्राण्यांवर केलेल्या प्राथमिक चाचण्यांमध्ये या विषाणूमुळे कोणताही गंभीर आजार झाल्याचे दिसून आलेले नाही. भविष्यातील संभाव्य धोका टाळण्यासाठी जागतिक आरोग्य यंत्रणांनी आतापासूनच खबरदारी घेण्यास सुरु वात केली असून ते परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.



### खरात प्रकरणात मोठी खळबळ!

## मंत्रिमंडळातील 4 मंत्र्यांचा समावेश



**मुंबई/प्रतिनिधी-**खरात प्रकरणामध्ये चार मंत्र्यांचा समावेश आहे असा आरोप नाना पटोले यांनी केला आहे. मंत्र्यांना मंत्रीमंडळातून काढून टाकण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याची माहिती नाना पटोले यांनी दिली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात खरात प्रकरणावरून पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणामध्ये राज्य मंत्रिमंडळातील तब्बल चार मंत्र्यांचा थेट समावेश असल्याचा खळबळजनक आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. या मंत्र्यांची नावे पत्राद्वारे मुख्यमंत्र्यांना कळवणार असून, त्यांना तातडीने मंत्रिमंडळातून बडतर्फ करण्याची मागणी करणार असल्याचेही पटोले यांनी स्पष्ट केले. नाना पटोले यांनी या प्रकरणाचे गांभीर्य अधोरेखित करताना सत्ताधारी पक्षावर जोरदार हल्ला चढवला. ➯ (पान २ वर)

## छ.संभाजीनगरमधून मुली-महिला बेपत्ता होण्यामागे MIM चा हात?

### ■ शिंदे सेनेच्या शिलेदाराचा आरोप ■ राज्यात एकच खळबळ



**मुंबई/प्रतिनिधी-** टीसीएस आयटी कंपनीची माजी कर्मचारी आणि धर्मांतरण तसेच लैंगिक शोषण प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खान हिला छत्रपती संभाजीनगरमधून अटक झाली. नारेगाव परिसरात एमआयएम नगरसेवक मतीन पटेल यांच्या घरातून तिला अटक करण्यात आली. हा मुद्दा आता चांगलाच तापला आहे. एमआयएम निदा खान निर्दोष असल्याचे दावा करत उघडपणे समर्थनात आल्याचे दिसले. तर एमआयएमच्या भूमिकेवर हिंदुत्वादी संघटना, भाजप आणि शिवसेनेने संताप व्यक्त केला आहे. तर आता शहरातून मुली आणि महिला गायब होण्यामागे एमआयएमचा हात तर नाही ना? असा गंभीर आरोप शिवसेना जिल्हाप्रमुख आणि उप महापौर राजेंद्र जंजाळ यांनी केला आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. मतीन पटेल याचे घर कार्यालय आणि निदा खान हिला ज्या ठिकाणी लपवले ➯ (पान २ वर)

## 'लोकशाहीत सर्वोच्चस्थानी संसद नव्हेच'-श्रीलंकेत माजी सरन्यायाधीश भूषण गवईंचे व्याख्यान



### ● १९७५ ची आणीबाणी हा लोकशाहीसाठी गंभीर इशारा
### ● एडीएम जबलपूर' प्रकरणात न्यायपालिका अपयशी ठरल्याची व्यक्त केली खंत

**नागपूर/प्रतिनिधी-**ख-या लोकशाहीत संसद सर्वोच्च असते का? या प्रश्नाचे उत्तर देताना सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी भारतीय लोकशाहीचे केंद्र संसद नसून संविधान असल्याचे स्पष्ट केले. संसद, कार्यपालिका किंवा न्यायपालिका यांपैकी कोणतीही संस्था सर्वोच्च नाही, तर संविधानच सर्वोच्च आहे, असे परखड मत गवई यांनी व्यक्त केले.

**काय म्हणाले गवई?-** श्रीलंकेतील कोलंबो विद्यापीठात आयोजित सुजाता जयवर्धने स्मृती व्याख्यानात गवई बोलत होते. लोकशाहीव्यवस्थेत सत्तेचे केंद्रीकरण टाळण्यासाठी भारतीय राज्यघटनेची रचना करण्यात आल्याचे सांगताना गवई यांनी विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका या तिन्ही संस्था परस्पर स्वतंत्र असल्या तरी त्या संविधानाच्या चौकटीतच कार्य करतात, असे सांगितले. कोणतीही संस्था अमर्याद अधिकार वापरू शकत नाही. प्रत्येक अधिकारावर संविधानाची मर्यादा आहे, असे ते म्हणाले. ब्रिटनमध्ये संसद सर्वोच्च ही संकल्पना अस्तित्वात असली तरी भारताने संविधान सर्वोच्चचा ➯ (पान २ वर)






## राष्ट्रीय महामार्गांवरील टोलनाके होणार गायब!

### 2026 अखेरपर्यंत देशभरात कॅशलेस टोल अनिवार्य



**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** महामार्गांवरून प्रवास करायचा म्हणजे टोल नाक्यांवरील लांबच लांब रांगांची कटकट. फास्टॅगमुळे हा प्रवास वेगवान झाला असला तरी अनेकवेळा तांत्रिक बिघाड किंवा पेमेंट फेल झाल्यामुळे वाहनांना पुन्हा थांबावे लागते आणि प्रवासात वेळ वाया जातो. पण नितीन गडकरींच्या नव्या मास्टरप्लॅनमुळे ही रोजची चिंता मिटणार आहे. २०२६ अखेरपर्यंत देशातील सर्व राष्ट्रीय महामार्गांवरील टोल प्लाझा हटवणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

सध्या सुरू असलेल्या टोल नाक्यांऐवजी एका आधुनिक प्रणालीचा वापर केला जाणार आहे. यामुळे टोल नाक्यावर न थांबताच प्रवासी आधीपेक्षा वेगवान प्रवास करू शकतात. या नव्या सिस्टिमअंतर्गत, वाहनांनी प्रत्यक्ष पार केलेल्या अंतरानुसारच त्यांच्याकडून टोल आकारला जाणार आहे. टाइम्स ग्रुपच्या टाइम्स ड्राईव्ह ऑटो समिट अँड अवार्डस् २०२६या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. त्यावेळी नितीन गडकरींनी ➯ (पान २ वर)

## घाटात आढळले दोघांचे मृतदेह, तीन दिवसापासून होते पडून, एक मृतक चिखलद-याचा



**बुलढाणा/प्रतिनिधी-:** बुलढाणा जिल्ह्यात मागील काही दिवसांत वाहन अपघातांचे प्रमाण वाढले आहे. नियमित अंतराने होणा-या या अपघातात अनेकांचे बळी जात असून निष्पाप प्रवासी जायबंदी होत आहे.विविध प्रकारच्या वाहन संख्येत झालेली वाढ, अपुरे अरुंद रस्ते, वाहतुकीच्या शिस्तीकडे होणारे दुर्लक्ष, मद्य प्राशन करून वाहन चालविण्याचे फॅड आदि कारणामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. बुलढाणा खामगाव राज्य मार्गावरील बोथा घाटात एका भीषण अन अभूतपूर्व अपघाताची नोंद झाली आहे. एका दुचाकीवरून जाणारे दोन युवक दुचाकीसह खोल दरीत कोसळले. घनदाट जंगलामुळे हा परिसर वरून सहज दिसणारा नाही. यातच दुर्दैवाचा कळस म्हणजे या परिसरात मोबाईल रेंजच नाही! यामुळे दरीत कोसळल्यावर तीन दिवसापासून दोघांचे मृतदेह पडून होते.अखेर मृतदेह कुजल्यावर दुर्गंधी सुटल्याने काहीतरी भीषण झाल्याचे उघडकीस आले. गावाक-यांनी बोथा घाटात दुर्गंधी येत असल्याची माहिती हिवरखेड पोलिसांना दिली. प्रारंभी घातपाताचा संशय व्यक्त करण्यात आला. यामुळे घटनेचे गांभीर्य लक्षात घेता उपविभागीय पोलीस अधिकारी ( खामगाव ) प्रदीप पाटील यांच्यासह हिवरखेड पोलीस ठाण्याचे प्रभारी ठाणेदार आशिष केचरे, बीट जमादार गजानन अहेर, पोलीस हवालदार महेंद्र नारखेडे व प्रदीप वानखडे हे घटनास्थळी पोहचले . यावेळी त्यांनी दुर्गंधी येत असलेल्या परिसराची पाहणी केली असता बोथा घाटातील दरीमध्ये दोन जणांचे मृतदेह पडले असल्याचे दिसुन आले. मृतदेहांच्या बाजूला दुचाकी (क्र. एमएच २७ बीपी- ५६२०) ही पडलेली होती. प रात्रीच्या अंधारामुळे कार्यवाही करणे शक्य झाले नाही. त्यामुळे आज सकाळी पोलिस मृतदेह दरीतून बाहेर काढण्यासाठी घटनास्थळी पोहचले . यावेळी बोथा गावातील काही ग्रामस्थही घटनास्थळी दाखल झाले होते.

## पंतप्रधान मोदींच्या कार्यक्रमाच्या ठिकाणाजवळ स्फोटके आढळल्याने खळबळ; सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर



**बंगळुरू :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कर्नाटक दौ-यादरम्यान आज एक मोठी खळबळजनक घटना समोर आली आहे. बंगळुरूमध्ये पंतप्रधानांचा कार्यक्रम ज्या ठिकाणी होणार होता, त्या ठिकाणापासून अवघ्या काही अंतरावर स्फोटके सापडल्याने सुरक्षा यंत्रणांची मोठी धावपळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी आज आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ४५ व्या स्थापना दिन कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी बंगळुरू मध्ये आले होते. त्यांच्या आगमनापूर्वी सुरक्षा यंत्रणांकडून मार्गाची आणि परिसराची कसून तपासणी केली जात होती. यावेळी कनकपुरा रोडवरील कग्गलीपुरा भागात, मुख्य कार्यक्रम स्थळापासून सुमारे ३ किलोमीटर अंतरावर दोन जिलेटिनच्या कांड्या पोलिसांना आढळून आल्या. ➯ (पान २ वर)




जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# गर्भवती विवाहितेला घरातच अमानुष मारहाण

## -जबरदस्तीने केला गर्भपात -पती, सासू व नणंदेविरुद्ध गुन्हा



**अमरावती/प्रतिनिधीः-** हुंड्याच्या लालसेपोटी एका गर्भवती विवाहितेवर सासरच्या मंडळींकडून झालेल्या अमानुष अत्याचाराची संतापजनक घटना पथ्रोट पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. सततचा मानसिक छळ, शिवीगाळ आणि मारहाण यामुळे अखेर तीन महिन्यांच्या गर्भातील निष्पाप जीव गमवावा लागल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

पोलीस सुत्रानुसार, पती राजेश इंगळे, सासू आणि नणंद (सर्व रा. टवलार, ता. अचलपूर) अशी आरोपींची नावे असून , त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ वर्षीय महिलेचे ९ मे २०२५ रोजी राजेश इंगळे याच्यासोबत लग्न झाले होते. मात्र, लग्नाच्या दुसऱ्याच दिवसापासून 'हुंडा कमी दिला' या कारणावरून तिचा छळ सुरू झाला. पती, सासू आणि नणंद हे तिला सतत टोमणे मारत, अपमानित करत आणि मानसिक त्रास देत होते. अनेकदा वाद वाढल्याने विवाहितेला माहेरी जावे लागत होते. तरीही संसार टिकावा या आशेने ती पुन्हा सासरी परतत होती. १५ एप्रिल रोजी विवाहितेच्या वडिलांचे निधन झाल्याने ती माहेरी गेली होती. त्यानंतर २६ एप्रिल रोजी ती पुन्हा सासरी आली. त्यावेळी ती तीन महिन्यांची गर्भवती होती. प्रकृती ठीक नसल्याने ती घरात विश्रांती घेत असताना पती राजेश याने जबरदस्तीने तिला उठविले. 'झोपून राहू नको, घरातील कामे कर,' असे म्हणत तिला ढकलून दिले. त्याचवेळी नणंदेने तिचा हात पकडून खाली ओढले. त्यामुळे ती थेट पोटावर कोसळली. घटनेनंतर विवाहितेला प्रचंड रक्तस्त्राव सुरू झाला. तिने पतीला दवाखान्यात नेण्याची विनंती केली. मात्र, त्याने दुर्लक्ष करत 'सायंकाळी जाऊ' असे सांगून वेळ मारून नेली. अखेर विवाहितेने आपल्या आईला फोन करून मदत मागितली. आईने तातडीने तिला रुग्णालयात दाखल केले. तपासणीनंतर डॉक्टरांनी गर्भपात झाल्याचे स्पष्ट केले. या घटनेनंतर संतप्त विवाहितेने पथ्रोट पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी पती, सासू आणि नणंदेविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# भरधाव कारची विजेच्या खांबाला धडक

## मोठा स्फोट, चालक-प्रवासी बचावले

**धामणगाव रेल्वे/ प्रतिनिधीः-** शहरालगत असलेल्या राज्य महामार्गावर जुना धामणगाव येथे रविवारी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास भीषण रस्ता अपघात घडला. भरधाव वेगाने धावणाऱ्या कारवरील नियंत्रण सुटल्याने ती रस्त्याच्या कडेला असलेल्या विजेच्या खांबाला जोरदार धडकली. धडकेची तीव्रता इतकी होती की खांबाजवळील वीज वितरण पेटीतून मोठा स्फोट होऊन आग लागली.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, एमएच २९ बीपी ५३४५ क्रमांकाची कार भरधाव वेगाने जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार थेट वीजपुरवठ्याच्या खांबावर आदळली. कारमधील सेफ्टी व्हॉल्व्ह उघडल्यामुळे चालक व प्रवासी सुखरूप बचावले असून या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

धडक इतकी भीषण होती की वीज पुरवठ्याच्या यंत्रणेत मोठा स्फोट झाला आणि धुराचे लोट संपूर्ण परिसरात पसरले. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ घबराट पसरली. घटनेची माहिती मिळताच मोठ्या संख्येने नागरिक घटनास्थळी जमले.

स्थानिक रहिवाशांनी तात्काळ अग्निशमन दलाला कळविले; मात्र कर्मचाऱ्यांच्या अनुपलब्धतेमुळे अग्निशमन दलाला पोहोचण्यास विलंब झाला. दरम्यान, रहिवाशांनी स्वतःहून आग विझवण्याचा प्रयत्न केला.

या आगीत कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस तसेच वीज वितरण विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# पुतण्याची काकाला अश्लिल शिवीगाळ

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** काकाला त्याचे मालवाहू वाहन काढता येवू नये म्हणून पुतण्या नेहमी रस्त्यात त्याची गाडी उभी करतो. याबाबत काकाने त्याला जाब विचारला असता, त्याने अश्लिल भाषेत शिवीगाळ करीत काकाला मारहाण केली. तसेच यानंतर जर माझ्या घराजवळून गाडी नेली, तर पाहून घेईन अशी धमकी दिल्याची तक्रार काका, नितेश राजेंद्रराव सव्वालाखे (वय ३५) यांनी दिली. चांदूर रेल्वे पोलिसांनी पुतण्या तेजस संजय सव्वालाखे (वय २३) याच्यावर गुन्हा नोंदवला. ही घटना मांजरखेड येथे घडली.

## दागिने चमकून देण्याच्या नावाखाली फसवणूक

**वरुड:** सोन्याचे दागिने डाग मारून व चमकून देण्याच्या नावाखाली एका अज्ञात महिलेने गृहिणीची फसवणूक केली. ही घटना टेंभुरखेडा येथे घडली. अज्ञात महिलेने कानातले व पोत असा एकूण १० ग्रॅमचा ऐवज घेत पोबारा केला. त्याची अंदाजे किंमत १ लाख रुपये आहे. महिलेच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## भरधाव ट्रकची दुचाकीला धडक

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा-अमरावती मार्गावरील चामुंडा गोडाऊनसमोर शनिवारी दुपारी सुमारे ४.४५ वाजताच्या सुमारास भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिली. याबाबत विकास रमेश वाजपेयी (वय ४२, रा. बुंदेलपुरा, अचलपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमएच २७ बीपी ०३१३ क्रमांकाच्या ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. संबंधित ट्रक चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवून हा अपघात घडवून आणल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेची नोंद शनिवारी रात्री उशिरा सुमारे ९ वाजता अचलपूर पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## अचलपूरात आरोपीच्या घरातून गांजा जप्त

**अचलपूर :** स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार यांच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार अचलपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अलकरीम कॉलनी येथे छापा टाकण्यात आला. यावेळी मोहम्मद मुजाहिद मोहम्मद रफीक (वय ३०) याच्या घरातून प्लास्टिकच्या पिशवीत साठवून ठेवलेला गांजा आढळून आला. पोलिसांनी २ किलो २५६ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला असून त्याची अंदाजे किंमत ४५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. आरोपीला ताब्यात घेऊन पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे.

# बस प्रवासात महिलेचे २ लाखांचे सोन्याचे दागिने लंपास



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील मध्यवर्ती बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एका महिलेची पर्स चोरून नेल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. या पर्समध्ये सुमारे २ लाख १० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने असल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला या शनिवारी सकाळी ११ वाजता आपल्या पतिसह एसटीने अमरावती येथे लग्न समारंभासाठी आल्या होत्या. शहरातील कर्तव्य लॉनमध्ये लग्नाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर त्या दुपारी ४ वाजता पतीसोबत स्थानिक मध्यवर्ती बसस्थानकात आल्या. दर्यापूरकडे जाण्यासाठी त्या आपल्या मुलगा शुभम याच्यासोबत बसमध्ये बसल्या. यावेळी बसमध्ये बसल्यानंतर त्यांनी हँडबॅग तपासली असता त्यातील लाल रंगाची पर्स गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्या पर्समध्ये ४० ग्रॅम वजनाचा सोन्याचा चपळा हार (अंदाजे किंमत १ लाख २० हजार रुपये) तसेच ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी असलेली काळ्या रंगाची पोत (अंदाजे किंमत ९० हजार रुपये) असे एकूण २ लाख १० हजार रुपये किमतीचे दागिने होते. बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने ही पर्स चोरून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून शनिवारी रात्री ८ वाजता सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# मोर्शीत खुल्या कारागृहातील चार बंदींकडून बनावट वैद्यकीय प्रमाणपत्रांचा वापर



**अमरावतीः-** अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहानंतर आता मोर्शी येथील खुल्या कारागृहातही संचित रजा मिळविण्यासाठी बंदींकडून नातेवाइकांच्या नावाने बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र जोडल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी खुल्या कारागृह प्रशासनाने मोर्शी पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर चार बंदींविरुद्ध बनावट कागदपत्रांचा वापर केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मोर्शी येथील खुल्या कारागृहात शिक्षाधीन असलेले गजानन उर्फ विपीन रामकृष्ण पातोड (क्र. १०१२) यांनी त्यांच्या आईच्या आजाराचे बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र रजेच्या अर्जासोबत जोडले होते. तसेच भीमराव उरकुडा बनकर (क्र. ८१५) यांनी रजेच्या अर्जात घराचे बांधकाम सुरू असल्याचे कारण नमूद केले होते.

याचप्रमाणे मनोज रामाजी चवरे (क्र. ९५१) यांनी पत्नीच्या आजाराचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर केले होते, तर तुफान इंदलसिंग यादव (क्र. ८१६) यांनी आईच्या आजाराचे प्रमाणपत्र जोडले होते. रजा मंजूर करण्यापूर्वी मोर्शी खुल्या कारागृह प्रशासनाने संबंधित प्रमाणपत्रांची पडताळणी केली असता ती बनावट असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर कारागृह कर्मचारी अरविंद पंजाबराव चव्हाण यांनी मोर्शी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संबंधित चार बंदींविरुद्ध बनावट कागदपत्र सादर केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

१ व १० वरिल उर्वरित

## पेट्रोल-डिझेलचा वापर

म्हणाले- बंगालच्या जनतेने गुलामगिरीच्या राजकारणाचा पराभव केला आहे.

हैदराबादमध्ये नरेंद्र मोदी म्हणाले की, बंगाल म्हणजे केवळ राजकीय पक्षांचा जय-पराजय नाही, तर राज्यातील जनतेने लोकांना गुलामगिरीच्या बेड्यांमध्ये जखडून ठेवणा-या राजकारणाचा पराभव केला आहे.ते म्हणाले की, काँग्रेसने देशात भ्रष्टाचार, घराणेशाही आणि घटनात्मक संस्थांना कमकुवत करण्याचे काम केले. जेव्हा टीएमसीची स्थापना झाली, तेव्हा तिने काँग्रेसकडून या वाईट गोष्टी शिकल्या आणि डाव्यांच्या वाईट सवयीही अंगीकारल्या. यानंतर टीएमसीने भारतीय राजकारणात सर्वात घृणास्पद आणि धोकादायक मॉडेल विकसित केले.

पंतप्रधान म्हणाले- तेलंगणाच्या जनतेला येथेही भाजपचे सरकार हवे आहे.

**तेलंगणामध्ये ९,४०० कोटींच्या प्रकल्पांचे भूमिपूजन केले**

मोदींनी बंगळुरूमध्ये ध्यान मंदिराचे उद्घाटन केले; आर्ट ऑफ लिविंगला ४५ वर्षे पूर्ण

बंगळुरू येथील आर्ट ऑफ लिव्हिंग इंटरनॅशनल सेंटरमध्ये रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन ध्यान मंदिराचे उद्घाटन केले. हा कार्यक्रम आर्ट ऑफ लिव्हिंगला ४५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आणि संस्थापक श्री श्री रविशंकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आला होता.

यावेळी शिक्षण, महिला सक्षमीकरण, पर्यावरण, आदिवासी कल्याण, आरोग्य आणि डिजिटल साक्षरतेशी संबंधित ९ नवीन सेवा प्रकल्पांची सुरुवात करण्यात आली.

पंतप्रधानांनी बंगळुरूमध्ये आर्ट ऑफ लिव्हिंग इंटरनॅशनल सेंटरमध्ये नव-निर्मित मंदिरात पूजा केली.

पंतप्रधान मोदी म्हणाले- ध्यान मंदिर शांतीचे केंद्र बनेल

पंतप्रधान मोदी म्हणाले की, नवीन ध्यान मंदिर येणा-या पिढ्यांसाठी शांती आणि समाधानाचे मोठे केंद्र बनेल. त्यांनी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ४५ वर्षांच्या कार्याचे कौतुक करत सांगितले की, सेवाभावाने केलेला प्रत्येक प्रयत्न यशस्वी होतो.कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी गुरु देव श्री श्री रविशंकर यांना सांगितले की, मी तुमचाच आहे आणि जिथे मी आहे, तिथेही तुमच्यामुळेच आहे. यावर उपस्थित लोकांनी टाळ्या वाजवल्या.

कार्यक्रमात मध्यप्रदेशसह अनेक राज्यांतून हजारो स्वयंसेवक सहभागी झाले होते. यामध्ये तरुण, डाक्टर, शिक्षक, व्यावसायिक आणि प्रशासकीय अधिकारीही उपस्थित होते.

गुरु देव म्हणाले- भारतात नवीन आत्मविश्वास दिसत आहे

आर्ट ऑफ लिविंगचे संस्थापक श्री श्री रविशंकर म्हणाले की, गेल्या काही वर्षांत देशात आत्मविश्वास वाढला आहे. भारत जागतिक स्तरावर मजबूत झाला आहे.

ते म्हणाले की, स्वच्छ भारत अभियानानंतर देश अधिक स्वच्छ आणि सुव्यवस्थित दिसतो.

संस्थेने ९० लाख रोपे लावली, ५५० कारागृहांमध्ये कार्यक्रम राबवणार

आर्ट ऑफ लिविंगने सांगितले की, मिशन ग्रीन अर्थ अंतर्गत गेल्या एका वर्षात १९ राज्यांमध्ये ९० लाखांहून अधिक रोपे लावली आहेत. संस्था आता ४५ लाख शेवग्याची रोपे आणि ८७,५०० पवित्र वृक्ष लावण्याचे उद्दिष्ट घेउन वाटचाल करत आहे. संस्थेने हे देखील सांगितले की, कारागृह सुधार कार्यक्रमांतर्गत ५५० कारागृहांमध्ये १,००० कार्यक्रम राबवले जातील. तसेच, महिला आणि युवा नेतृत्व कार्यक्रमांद्वारे हजारो लोकांना प्रशिक्षण दिले जाईल.

## मंत्रिमंडळातील ४ मंत्र्यांचा

आम्ही यापूर्वीही विधानसभेत या विषयावर आवाज उठवला होता. खरातकडून सर्व माहिती काढून घेतली जात आहे, पण भीती अशी आहे की, ज्याप्रमाणे अक्षय शिंदेला मारले गेले, तसेच याचेही केले जाईल. या संपूर्ण प्रकरणात चार मंत्र्यांचे हात गुंतलेले आहेत आणि त्याची वस्तुस्थिती लवकरच समोर येईल, असे पटोले म्हणाले.

**मुख्यमंत्र्यांना देणार पत्र-** या प्रकरणातील पुराव्यांबाबत बोलताना पटोले यांनी सांगितले की, या चारही मंत्र्यांच्या सहभागाबाबतची सविस्तर पत्रे आम्ही मुख्यमंत्र्यांना देणार आहोत. ज्या मंत्र्यांची नावे या प्रकरणात येत आहेत. त्यामुळे या चारही मंत्र्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकावे, ही आमची प्रमुख मागणी आहे. खरात प्रकरणात कोणत्या बड्या नेत्यांची नावे आहेत, याबाबत अद्याप अधिकृत तपशील समोर आलेला नसला तरी, नाना पटोले यांच्या या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

खरात प्रकरण नेमकं काय आहे?

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात दिवसेंदिवस चांगलाच अडकत चालला आहे. खरातवर अनेक गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत. खरातने स्वतःकडे दैवी शक्त असल्याचे सांगत अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार केले. खरातचे अत्याचार करतानाचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. काही महिलांनी त्याच्याविरोधात तक्रार दाखल केली. त्यानंतर खरातने अनेक व्यावसायिकांची देखील फसवणूक केल्याचे उघड झाले. दरम्यान, महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकरांच्या बहिणीचे आणि खरातचे जवळचे संबंध असल्याचे देखली उघड झाले. आता खरात प्रकरणात आणखी चार मंत्र्यांची नावे समोर आली आहेत.

## छ.संभाजीनगरमधून मुली-महिला

होते, ते बांधकाम अवैध आणि अनधिकृत आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम कायद्या नुसार महापालिका त्यावर कारवाई करणार आहे, आणि तशी नोटीस मतीन पटेल याच्या घरावर नोटीस लावलेली आहे. आणि मतीन पटेल याला त्याचे म्हणणे मांडण्यासाठी तीन दिवसांचा वेळ देण्यात आला आहे. चौथ्या दिवशी मतीन पटेल याच्या घरावर आणि कार्यालयावर आणि ज्या ठिकाणी निदा खान हिला लपवण्यात आले ते बांधकाम पाडण्यात येईल

मतीन पटेल यांच्या नगरसेवक पदावर टांगती तलवार

नगरसेवक मातीन पटेल यांच्यावर काय कारवाई होणार याविषयी राजेंद्र जंजाळ यांनी महापालिका अधिनियमांचा आधार घेतला. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४७ ( १० ड ) मध्ये स्पष्ट केलेले आहे की, एखादा नगरसेवक किंवा त्याचे आई, वडील, बहीण, भाउ या पैकी कोणीही अनधिकृत बांधकाम केले असेल, त्याचे नगरसेवक पद निष्काशीत होउ शकते. हा कायदा आहे आणि नियम आहे आणि हे १०० टक्के होणार असा दावा जंजाळ यांनी केला.

पुरावे नष्ट करण्याचे काम

निदा खान प्रकरण दिसते तेव्हढे सोपे नाही, पोलिसांनी त्यात नउ एफआयआर नोंदवलेले आहे. निदा खानला ४० दिवस छत्रपती संभाजीनगर मध्ये आणून पोलिसांपासून दूर ठेवले आणि या ४० दिवसात अनेक पुरावे नष्ट झाले असतील. आणि असे कोणतेही कृत्य करत असेल तर त्या व्यक्तीवर कारवाई झाली पाहिजे. ओवेसी आणि जलील यांनी निदा खान आणि मतीन पटेल यांची पाठराखण केली. एमआयएमची भूमिका संशयास्पद आहे आणि एमआयएमने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांनी केली.

संभाजीनगरमधून मुली गायब होण्यामागे एमआयएमचा हात?

जबरदस्तीने केलेले धर्मांतर आणि लैंगिग शोषण, आणि असे आरोप असणा?यांना आश्रय देणे, ही जर एमआयएमची भूमिका असेल आणि छत्रपती संभाजीनगरमधून अनेक अल्पवयीन मुली आणि महिला बेपत्ता झालेल्या आहेत. अनेक पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल आहेत पण त्यांचा शोध लागलेला नाही, मग याच्या मागे एमआयएम आहे का? याची चौकशी केली गेली पाहिजे आणि एमआयएमने भूमिका स्पष्ट केली पाहिजे, असे मोठे वक्तव्य जंजाळ यांनी केले.

आम्ही बोलायला गेलो तर एमआयएमचे नगर सेवक विकासाची भाषा करतात. परंतु एमआयएमचे नगरसेवक निदा खानला आश्रय देण्यापूरते मर्यादित नाही. मतीन पटेलच्या मोबाईल मध्ये अनेक महिलांचे व्हिडिओ चित्रीकरण आहे, असे चित्रीकरण करून ब्लॅक मेल केलेल्या तक्रारी पोलिसांकडे दिलेल्या आहेत. एमआयएमच्या एका नगरसेवकावर ३०७ चा गुन्हा आहे, तर एक नगरसेवक मुंबईच्या ड्रग माफियासोबत पार्टनरशिप आहे. असे अनेक गुन्हे असलेले लोक एमआयएम मध्ये काम करतात. एमआयएम गुन्हेगारांना आपली पक्षात घेतात आणि त्याला तिकीट देतात. मागच्या वेळीही महापालिका मध्ये एमआयएमचे गुन्हेगार नगरसेवक सभागृहात होते. एमआयएम गुंड आणि विघातक कृत्य करणा-या लोकांचा पक्ष आहे, असा आरोप उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांनी केला आहे.

## 'लोकशाहीत सर्वोच्चस्थानी संसद नव्हेच

मार्ग स्वीकारला. ब्रिटनमध्ये संसद कोणताही कायदा करू शकतो तसेच रद्द करू शकते; मात्र भारतात संसदेलाही संविधानाच्या मूलभूत रचनेच्या मर्यादा पाळाव्या लागतात, असे त्यांनी सांगितले. भारतीय राज्यघटनेच्या इतिहासातील अनेक महत्त्वाच्या न्यायालयीन संघर्षांचा संदर्भ देत त्यांनी संसद आणि न्यायपालिका यांच्यातील तणावातूनच संविधानिक तत्त्वांची जडणघडण झाल्याचे नमूद केले.

**आणीबाणी गंभीर इशारा-**१९७५ च्या आणीबाणीचा संदर्भ देताना गवई यांनी तो भारतीय लोकशाहीसाठी गंभीर इशारा असल्याचे म्हटले. एडीएम जबलपूर प्रकरणात वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यात न्यायपालिकाही अपयशी ठरल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. आणीबाणीच्या काळात संसद, कार्यपालिका आणि न्यायपालिका या तिन्ही संस्थांना संवैधानिक कर्तव्य पार पाडण्यात अपयश आले, असेही गवईंनी सांगितले. राज्यघटनेतील कलम ३५६ च्या गैरवापराबाबत बोलताना त्यांनी एस. आर. बोम्मई निकालाचा संदर्भ दिला. राज्य सरकारे पाडण्यासाठी राष्ट्रपती राजवटीचा वापर करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट करत संघराज्य व्यवस्थेलाही संविधानाच्या मूलभूत रचनेचा भाग मानल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**न्यायपालिकेलाही मर्यादांचे भान आवश्यक-** लोकशाहीत संस्थांमधील संघर्ष अपरिहार्य असला तरी तोच संवैधानिक समतोल टिकवून ठेवतो, असे सांगताना माजी सरन्यायाधीशांनी न्यायपालिकेलाही आत्मसंयम बाळगण्याचा सल्ला दिला. न्यायिक पुनरावलोकन हे न्यायिक अतिक्रमणात रूपांतरित होता कामा नये. सक्रियता ही साहसी अतिक्रमण बनू नये, असे ते म्हणाले

## राष्ट्रीय महामार्गावरील टोलनाके

ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशन टेक्नालॉजी अँड फास्टॅगवर आधारित प्रणालीबद्दल माहिती दिली. या नवीन प्रणालीची सध्या चाचणी सुरू आहे. देशभरातील ८५ टोलनाक्यांवर यापूर्वीच ही सेवा सुरू करण्यात आली आहे.

प्रवासी आता ठराविक टोल भरण्याऐवजी पे-पर-यूजप्रमाणे टोल भरतील. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रणालीबद्दल बोलताना सांगितले की, २०२६ च्या अखेरपर्यंत भारतात टोल नाके राहणारच नाहीत. टोल भरण्याची चिंता न करता ताशी ८० किमी वेगाने वाहनचालक प्रवास करू शकतात. हाय-टेक कॅमेरे आणि जीपीएस-आधारित ट्रॅकिंगचा वापर करून वाहनांची ओळख पटणार आहे. त्यानंतर वाहनांशी थेट लिंक केलेल्या खात्यांमधून टोलची रक्कम वजा होईल.

टोल नाक्यावरील वाचलेल्या वेळामुळे इंधनाची बचत होणार आहे. तसेच, टोलचे पैसेही वाचणार आहेत. फास्टॅगच्या यशानंतर देशभरात ही सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. फास्टॅगची अंमलबजावणी झाली त्यानंतरही काही तांत्रिक त्रुटी निर्माण होत होत्या. त्यामुळे प्रत्यक्ष बूथ आवश्यक होते. पण गर्दीच्या वेळी त्यामुळे प्रवासात अडथळे निर्माण होत होते. २०२६ च्या डिसेंबरपर्यंत हे तंत्रज्ञान फुलप्रूफ आहे याची खात्री पटण्यासाठी सरकारने चाचण्या सुरू केल्या आहेत.

या प्रणालीमध्ये फास्टॅग आणि ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशन तंत्रज्ञान वापरले जाते. आरएफआयडी वाचक आपले फास्टॅग स्टिकर स्कॅन करतात. त्याच वेळी, एआय-पावर्ड कॅमेरे एएनपीआर वापरून आपल्या वाहनाची नंबर प्लेट वाचतात. ही ड्युअल-व्हेरिफिकेशन सिस्टम त्रुटी टाळण्यास मदत करते. जरी तुमचा फास्टॅग काम करत नसला तरीही तुमची नंबर प्लेट टोल टॅक्ससाठी वापरली जाउ शकते. लिंक केलेल्या खात्यातून ही रक्कम वजा केली जाईल.

**अधिक कठोर नियम-**या नव्या प्रणालीमुळे टोलचे नियम अधिक कठोर करण्यात येणार आहेत. जर एखाद्या वाहनचालकाच्या खात्यातून रक्कम वजा झाली नाही तर मालकाला ई-नोटीस पाठवली जाते. जर फास्टॅग पाळला गेला नाही तर फास्टॅग निलंबित केला जाउ शकतो.

## थलपथी विजय यांचा धमाकाः

**२. अमली पदार्थमुक्त राज्य**

राज्यातील तरुणाईला अमली पदार्थांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी एका विशेष कृती दलाची स्थापना करण्याचे आदेश दिले आहेत. अमली पदार्थांची तस्करी रोखणे आणि व्यसनमुक्त तामिळनाडू घडवणे हे त्यांच्या प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट असेल.

**३. महिला सुरक्षा दलः**

महिलांच्या सुरक्षेसाठी राज्यभर विशेष सुरक्षा यंत्रणा आणि टास्क फोर्स तैनात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महिलांची सुरक्षा हीच आमची प्राथमिकता असल्याचे त्यांनी आपल्या पहिल्या भाषणात स्पष्ट केले.

**ही तर फक्त सुरुवात आह**

शपथविधीनंतर जनतेला संबोधित करताना मुख्यमंत्री विजय म्हणाले की, मी दिलेली आश्वासने विसरलेलो नाही. ही केवळ सुरुवात आहे, अजून बरीच मोठी यादी बाकी आहे. मला थोडा वेळ द्या, मी प्रत्येक आश्वासन पूर्ण करेन.

त्यांच्या जाहीरनाम्यात महिलांना दरमहा २५०० रुपये आर्थिक मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाचे आश्वासन देण्यात आले आहे. या निर्णयामुळे तामिळनाडूतील द्रविडीयन राजकारणाला मोठा धक्का बसल्याचे मानले जात असून, विजय यांच्या टीव्हीकेपक्षाने पहिल्याच दिवशी आपली धमक दाखवून दिली आहे.

## पंतप्रधान मोदींच्या कार्यक्रमाच्या

सुरक्षा यंत्रणांकडून तपास सुरू

स्फोटके सापडल्यानंतर ब?म्ब शोधक आणि नाशक पथकाने (एक़्क्च) तातडीने घटनास्थळी धाव घेउन परिसर सुरक्षित केला. पोलिसांनी या प्रकरणी वेगाने तपास चक्रे फिरवून एका संशयित व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. या व्यक्तीची एका गुप्त ठिकाणी कसून चौकशी सुरू आहे. थाथागुनी परिसर, कग्गलीपुरा भागात दोन जिवंत जिलेटिनच्या कांड्या फूटपाथच्या बाजूला आढळून आल्या असून कोरामंगला भागातून एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. प्राथमिक माहितीनुसार, एका अज्ञात व्यक्तीने स्फोट करण्याची धमकी देणारा फोन केला होता, त्यानंतर तपासणीत ही स्फोटके सापडली. पंतप्रधानांच्या सुरक्षिततेत एवढी मोठी चूक कशी झाली आणि ही स्फोटके तेथे कोणी व कोणत्या उद्देशाने ठेवली होती, याचा सखोल तपास आता पोलीस आणि केंद्रीय सुरक्षा यंत्रणा करत आहेत. दरम्यान, या घटनेनंतर संपूर्ण परिसरात कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला असून सुरक्षेत मोठी वाढ करण्यात आली आहे.

## घातखेडा तलावात बुडून चार

असलेल्या इतर मुलांनी आरडाओरडा करत परिसरातील नागरिक व पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याचे प्रभारी रोशन श्रीसाठ हे पथकासह घटनास्थळी दाखल झाले. बचाव पथकाच्या मदतीने चारही मुलांना तलावाबाहेर काढण्यात आले. मात्र, त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी इर्विन रुग्णालयाच्या शवगृहात पाठविण्यात आले असून फ्रेजरपुरा पोलिस पुढील तपास करीत आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे महाजनपुरा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## सालोड येथे घरफोडी

अशी एकूण सुमारे ३० हजार रुपयांचे दागीणे अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून शनिवारी दुपारी ४ वाजता मंगरूळ चव्हाळा पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## 'समृद्धी'वरून गुटका तस्करी

ही माहिती महामार्ग पोलीस विभाग वाशीमचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीनकुमार दांदडे यांना दिली. दांदडे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून ट्रक कारंजा शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात ठेवला.

याची माहिती देत पोलीस ठाण्यात अन्न व औषध प्रशासन विभागाला पाचारण करण्यात आले. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या तपासणीत वाहनातील माल हा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी कारंजा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक यशवंत सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक नितीनकुमार दांदडे, पोलिस उपनिरीक्षक कृष्णकन्हैया पवार, पोलीस हेड कॉन्स्टेबल अमोल इंगोले व पोलीस कॉन्स्टेबल आनंद काकडे यांनी केली.

## दोन ट्रकमध्ये धडक; चालक

फिर्यादीच्या ट्रकचा चालक जखमी झाला. अपघातानंतर चालकाने फोनवरून मालकाला घटनेची माहिती दिली. जखमी चालकाच्या उजव्या पायाला दुखापत झाली असून त्याला उपचारासाठी पुलगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेप्रकरणी मंगरूळ दस्तगीर पोलिस ठाण्यात शनिवारी दुपारी सुमारे ५ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, ११ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## चार महिन्यांपासून चौकशी अहवाल 'पेंडिंग'

### पातूर पंचायत समितीतील कारभारावर प्रश्नचिन्ह; विस्तार अधिकाऱ्यावर आरोपांची झोड

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समितीतील एका ग्रामपंचायतीच्या कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात चौकशी होऊनही अहवाल अद्याप सादर न झाल्याने प्रशासनाचा कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. चौकशी समितीचे प्रमुख तथा विस्तार अधिकारी अनंत लव्हाळे यांनी जाणीवपूर्वक चौकशी अहवाल रोखून धरल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष अरविंद पाटील यांनी केला असून, या प्रकरणी जिल्हा परिषद प्रशासनाकडे थेट तक्रार दाखल करण्यात आली आहे.




माहितीनुसार, पातूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या एका ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतील कामांमध्ये, बाजार लिलाव प्रक्रियेत तसेच विविध बांधकामांमध्ये आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला होता. सचिव व सरपंच यांच्या कारभाराविरोधात १८ डिसेंबर २०२५ रोजी पुराव्यासह गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर २० जानेवारी २०२६ रोजी चौकशी समिती गठीत करण्यात आली आणि ३० जानेवारी रोजी संबंधित अभिलेखांची तपासणी व प्रत्यक्ष चौकशी करण्यात आली. मात्र, चौकशी प्रक्रिया पूर्ण होऊनही चार महिन्यांनंतरही अंतिम अहवाल वरिष्ठांकडे पाठविण्यात आलेला नसल्याने संशय अधिक गडद झाला आहे.तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या नियमानुसार अशा चौकशी अहवालाचा निष्कर्ष १५ ते ३० दिवसांत सादर करणे अपेक्षित असते. तरीही चौकशी समितीने अहवाल प्रलंबित ठेवल्याने संबंधितांना संरक्षण दिले जात असल्याची चर्चा पंचायत समिती वर्तुळात सुरू झाली आहे. या संदर्भात अरविंद पाटील यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच पंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार देत विस्तार अधिकारी अनंत लव्हाळे यांच्यावर शासकीय कामात दिरंगाई प्रतिबंधक अधिनियम २००५ आणि महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच त्यांना निलंबित करून विभागीय चौकशी सुरू करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, चौकशी अहवालाला होत असलेल्या विलंबामुळे पंचायत समितीच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत असून, 'चौकशी खरोखर निष्पक्ष आहे का?' असा सवालही उपस्थित केला जात आहे.

**गंभीर अनियमिततांचे आरोप**

तक्रारीत ग्रामपंचायतीच्या कामकाजातील अनेक कथित गैरप्रकार नमूद करण्यात आले आहेत. ई-निविदा प्रक्रिया टाळून मर्जीतील पुरवठादारांकडून साहित्य खरेदी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच शासकीय रॉयल्टी न भरता कामांची देयके काढणे, आठवडी बाजार लिलावाची रक्कम शासन खात्यात जमा न करणे, तसेच वरिष्ठांची मंजुरी न घेता शासकीय जागांवर अतिक्रमणधारकांच्या नावाने मालकी नोंदी घेण्यात आल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. या सर्व प्रकरणात पुरावे सादर करण्यात आल्याचा दावा करण्यात आला असला तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

**कामाचा ताण असल्याने विलंब – अनंत लव्हाळे**

याबाबत प्रतिक्रिया देताना विस्तार अधिकारी तथा चौकशी समिती प्रमुख अनंत लव्हाळे यांनी सांगितले की, 'गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संबंधित ग्रामपंचायतीच्या अभिलेखांची तपासणी करण्यात आली आहे. अहवाल जवळपास पूर्ण झाला आहे. मात्र इतर शासकीय कामांच्या व्यापामुळे तो सादर करण्यास विलंब झाला. लवकरच अंतिम अहवाल वरिष्ठांकडे पाठविण्यात येईल.'

## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची जिजाऊ हॉस्पिटल ला सदिच्छा भेट

■ प्रतिनिधी | रिसोड ■

येथील जिजाऊ हॉस्पिटल प्रसूती व स्त्री रुग्णालयास केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री मा. प्रतापरावजी जाधव यांनी दिनांक ९ मे रोजी सदिच्छा भेट दिली येथील डॉक्टर अमोल रतन नरवाडे व सौ करूणा अमोल नरवाडे यांचे जिजाऊ हॉस्पिटल प्रसूती व स्त्री रुग्णालय रिसोडचे दिनांक २५ एप्रिल २०२६ ला केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री नामदार प्रतापरावजी जाधव यांच्या हस्ते उद्घाटन होणार होते परंतु त्यावेळेस काही कारणास्तव ते येऊ शकले नाहीत त्यामुळे त्यांनी दिनांक ९ मे २०२६ ला हॉस्पिटल ला सदिच्छा भेट दिली याप्रसंगी त्यांचे डॉक्टर अमोल रतन नरवाडे, डॉक्टर करुणा अमोल नरवाडे, रतनभाऊ नरवाडे,



बाळासाहेब नरवाडे यांच्यावतीने त्यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला रिसोड मध्ये शहरातील व तालुक्यातील जनतेसाठी सुसज्ज जिजाऊ हॉस्पिटल प्रसूती व स्त्री रुग्णालय बांधल्यामुळे याचा रुग्णांना नक्कीच फायदा होणार असून सुसज्ज व सर्व सोयींनी युक्त अद्यावत असे हॉस्पिटल सुरु केल्याबद्दल त्यांनी डॉक्टर अमोल नरवाडे व डॉक्टर करूणा नरवाडे यांचे कौतुक केले केंद्र व राज्य सरकार मार्फत जनतेसाठी अनेक योजना राबविण्यात येत असून त्याचा सर्व जनतेने लाभ घेण्याचे आवाहनही यावेळी त्यांनी केले यावेळी उपस्थित रिसोड तालुका डॉक्टर असोसिएशनचे डॉक्टर मंडळींनी नामदार प्रतापराव जाधव यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला

## गोविंद न्यू इंग्लिश पब्लिक स्कूलची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**कारंजा :** गोविंद न्यू इंग्लिश पब्लिक स्कूलने यंदाच्या दहावीच्या परीक्षेत पुन्हा एकदा उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण निकालाची चमकदार कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या परीक्षेत कु. वैदेही बलिंगे हिने ९७.८० टक्के गुण मिळवून विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावला. यश उपाध्ये याने ९७.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर कु. लावण्या राऊत हिने ९४ टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक मिळविला. तसेच अरविंद चव्हाण याने ९३.८० टक्के, कु. जोया अनम मो. अयाज हिने ९३.४० टक्के, अथर्व राऊत याने ९३.२० टक्के, आदित्य सोनी याने ९१.६० टक्के, कु. प्राची भोयर हिने ९०.८० टक्के, कु. अनुष्का हांडे हिने ९०.४० टक्के, कु. जान्हवी जाधव हिने ८९.४० टक्के तसेच कु. भक्ती पवार हिने ८९.२० टक्के गुण मिळवून विद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली. विद्यालयातून एकूण १०८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

## गुरुकुल विद्यालय कोळी कारंजाचा ऐतिहासिक यशाचा क्षण

### दहावीच्या प्रथम बॅचलाच १०० टक्के निकाल; परिसरात आनंदाचे वातावरण

■ प्रतिनिधी | कारंजा ■

त्तालुक्यातील कोळी कारंजा येथील गुरुकुल विद्यालयाने आपल्या शैक्षणिक वाटचालीत ऐतिहासिक यश संपादन केले आहे. विद्यालयाच्या दहावी (एएए)च्या प्रथम बॅचने शंभर टक्के निकालाची उज्ज्वल कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या अभूतपूर्व यशामुळे विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक व संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यालयाच्या पहिल्याच दहावीच्या बॅचने उत्कृष्ट निकाल नोंदवत गुणवत्ता, शिस्त आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांचा आदर्श निर्माण केला आहे. विद्यार्थ्यांच्या अथक मेहनतीसोबत शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना विद्यालय प्रशासनाने व्यक्त केली.

विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल राऊत सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, 'विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत आत्मविश्वास, नियमितता आणि सकारात्मक दृष्टिकोन जपला. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केले.

त्यामुळे पहिल्याच बॅचमध्ये १०० टक्के निकालाचा मान मिळवणे ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.'

विद्यालयाच्या संचालिका मेघा राऊत मॅडम यांनीही सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. 'गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास' हे विद्यालयाचे मुख्य ध्येय असून भविष्यातही विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातील नागरिक, पालक व शिक्षणप्रेमींनी विद्यालयाचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. गुरुकुल विद्यालयाच्या या यशामुळे कोळी कारंजा परिसराच्या शैक्षणिक क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले असून विद्यालयाने आपल्या गुणवत्तेची ठळक छाप उमटवली आहे.

## बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालयाचा उत्कृष्ट निकाल

**मालेगाव :** माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी /मार्च २०२६ चा निकाल ८ मे रोजी ऑनलाइन पद्धतीने जाहीर झाला असून, यामध्ये बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालय मालेगाव च्या विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची परंपरा कायम ठेवत उत्कृष्ट निकाल प्राप्त केला आहे. विद्यालयाचा निकाल ९१.५२ टक्के लागला आहे. दर्शन निरंजन जाधव हा ९५.६० टक्के गुण मिळवून तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकवला तर आदर्श पार्श्वनाथ नागरे ९०.२० टक्के गुण मिळवून द्वितीय आला, तर सृष्टी जगन मगर ८९.८० टक्के गुण मिळवून तृतीय आली. या विद्यालयातील एकूण ५९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी १५ प्राविण्य श्रेणीत, १७ प्रथम श्रेणीत, तर १८ द्वितीय श्रेणीत व ०४ विशेष गुण श्रेणी (७५टक्के ) तर एकूण ५४ उत्तीर्ण श्रेणीत पास आहेत. विद्यालयाचा निकाल ९१.५२ टक्के लागला आहे विशेष उल्लेखनीय आहे.

## पातूर नगरपरिषद निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी पूर्ण ताकदीने मैदानात

**सर्व जागांवर उमेदवार देण्याची तयारी; कार्यकर्त्यांमध्ये उत्साह**

**पातूर :** पातूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण तापू लागले असून वंचित बहुजन आघाडीनेही निवडणुकीच्या तयारीला वेग दिला आहे. नगरपरिषदेच्या सर्व जागांवर उमेदवार उभे करण्याचा निर्धार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला असून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

पातूर शहरात वंचित बहुजन आघाडीच्या विचारांना मोठा प्रतिसाद मिळत असल्याने आगामी निवडणुकीत पक्ष निर्णायक भूमिका बजावू शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. पक्षाचे राष्ट्रीय नेते ?ड. प्रकाश आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांनी नगरपरिषदेत जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्याचा संकल्प केला. तालुका अध्यक्ष डॉ. ओम धर्माळ, महासचिव शरद सुरवाडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी आगामी निवडणुकीत विजय मिळवून तो पक्ष नेतृत्वाला वाढदिवसाची भेट म्हणून देण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

दरम्यान, नगरपरिषद निवडणुकीसाठी पक्षाची रणनीती तसेच संभाव्य उमेदवारांची घोषणा लवकरच करण्यात येणार असल्याची माहिती पक्षातील सूत्रांनी दिली. आगामी काळात नगरपरिषदेच्या सत्तेत वंचित बहुजन आघाडीचा मोठा वाटा राहील, असा विश्वासही कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## विदर्भातील वाढत्या तापमानावर नियंत्रणासाठी हरित विकास धोरण राबवावे - सागर कोकास

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विदर्भातील अकोला, वाशीम, नागपूर, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ व चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये वाढत्या तापमानामुळे नागरिकांचे आरोग्य, शेती, जलस्त्रोत आणि पर्यावरण धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने विशेष हरित विकास धोरण राबवावे, अशी मागणी आपचे पश्चिम विदर्भ प्रवक्ता सागर कोकास यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.रस्ते विकास, वृक्षतोड, काँक्रीटीकरण आणि अनियोजित



शहरीकरणामुळे उष्णतेची तीव्रता वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. विदर्भात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण, हरित पट्टे, अर्बन फॉरेस्ट, जलसंधारण प्रकल्प आणि पर्यावरण संरक्षणाच्या उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. कडुनिंब, पिंपळ, वड, अर्जुन, करंज, जांभूळ, चिंच आदी स्थानिक वृक्षांची लागवड रस्त्यालगत सक्तीने करावी, तसेच एक झाड तोडल्यास दहा झाडे लावणे बंधनकारक करावे, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. या उपाययोजनांमुळे विदर्भातील तापमानात घट होऊन उष्णतेच्या लाटांवर नियंत्रण, वायू प्रदूषणात कमी, जलसंधारण वाढ आणि पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होईल, असा दावा सागर कोकास यांनी केला आहे.

## श्री स्वामी समर्थ बाल संस्कार विद्या मंदिरचा १०० टक्के निकाल

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी /मार्च २०२६ चा निकाल ८ मे रोजी ऑनलाइन पद्धतीने जाहीर झाला असून, यामध्ये श्री स्वामी समर्थ बालसंस्कार विद्या मंदिर मालेगाव च्या विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुणवत्तेची परंपरा कायम ठेवत उत्तम निकाल प्राप्त केला आहे. विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. मृण्मयी गिरीश जोशी ८८.४० टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम क्रमांक पटकवला तर श्रेया संदीप देशमुख ८६.४० टक्के गुण मिळवून द्वितीय आली , तर सार्थक विजय आंधळे ८२.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक आला. या विद्यालयातील एकूण २६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी १० प्राविण्य श्रेणीत, १० प्रथम श्रेणीत, तर ०४ द्वितीय श्रेणीत व ०२ विशेष गुण श्रेणी (७५टक्के ) तर एकूण २६ उत्तीर्ण श्रेणीत पास आहेत. विद्यालयाचा निकाल १००.०० टक्के लागला आहे हे या ठिकाणी विशेष उल्लेखनीय आहे. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष- अरविंद देशमुख, सचिव- रंजना देशमुख तसेच मुख्याध्यापक सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू भगिनी यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

## विद्याभारती माध्यमिक शाळेचा दैदिप्यमान निकाल



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता शिस्त आणि सातत्यपूर्ण यशाची परंपरा जपणाऱ्या विद्याभारती माध्यमिक शाळा वाशीम ने महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा फेब्रुवारी २०२६ मध्ये पुन्हा एकदा घवघवीत यश संपादन करत ९५.४५ टक्के निकालाची उज्ज्वल कामगिरी नोंदवली आहे. या उल्लेखनीय यशामुळे शाळेने वाशीम शहरात टक्केवारीनुसार तृतीय क्रमांक पटकावला असून सेमी इंग्रजी माध्यमातून प्रथम क्रमांक मिळवत मानाचा तुरा रोवला आहे.

विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमांना शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य लाभल्याने हे यश शक्य झाले असल्याची भावना शाळा प्रशासनाने व्यक्त केली.

यंदाच्या परीक्षेत संतोष अभिमान सुर्वे यानी ४७५ गुण ९५.०० टक्के मिळवत शाळेत प्रथम क्रमांक प्राप्त केला. संतोष चे वडील अभिमान गुलाबराव सुर्वे टेलरिंगचा व्यवसाय करत असून संतोषचे प्रॉडक्ट डिझाईनमध्ये करिअर करण्याचे स्वप्न आहे. सुरज भारत सुरुशे यानी ४६१ गुण ९२.२० टक्के द्वितीय मिळवला असुन त्याचे वडील भारत देवराव सुरूशे हे व्यावसायिक असून सूरजला इंजीनियरिंग करायचे आहे.तर पुनम रघुनाथ पडवाल हिने ४४१ गुण ८८.२० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.

## निवासी शाळेत प्रवेश सुरू; मोफत शिक्षणासह सर्व सुविधा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मंगरूळपीर तालुक्यातील तुळजापूर येथील अनुसूचित जाती मुलांची शासकीय निवासी शाळेत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी सेमी-इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता ६ वी ते १० वीच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणासह निवास व इतर सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याने पालकांकडून उत्सुकता व्यक्त होत आहे.

प्रवेशासाठी अर्ज २६ जून २०२६ पर्यंत शाळेत मोफत उपलब्ध आहेत. या निवासी शाळेत विद्यार्थ्यांना कोणतीही फी न आकारता प्रवेश दिला जातो.


शाळेत विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज व अद्ययावत वर्गखोल्या, ग्रंथालय, ई-लायब्ररी, भोजन, पाठ्यपुस्तके, गणवेश तसेच निवासाची मोफत सोय उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे नियमित आयोजन केले जाते. विशेष म्हणजे, सत्र २०२५-२६ मध्ये येथील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात तालुका, जिल्हा व राज्यस्तरापर्यंत यश संपादन केले आहे. या शाळेची जमेची बाजू म्हणजे उच्चशिक्षित व अनुभवी शिक्षकवर्ग असल्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणाची खात्री मिळत आहे. दरम्यान, प्रवेशासाठी प्रवर्गनिहाय जागांचे आरक्षण पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.त्यामध्ये अनुसूचित जाती ८० टक्के, अनुसूचित जमाती १० टक्के, वीजा/भज ५ टक्के, मागास प्रवर्ग (एसबीसी) २ टक्के तर दिव्यांग व अनाथ विद्यार्थ्यांसाठी ३ टक्के जागा राखीव आहेत.

## लेखक बाबाराव मुसळे पुरस्कृत कला-गंगा ग्रामीण कादंबरी पुरस्कार ऋषिकेश गोल्हार यांच्या 'रानोबाचा माळ' या कादंबरीला जाहीर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

लेखक बाबाराव मुसळे पुरस्कृत कला-गंगा ग्रामीण कादंबरी पुरस्कार योजना-२०२५/ वर्ष दुसरे या पुरस्काराची घोषणा आज (आठ मे रोजी) करण्यात आली. प्राप्त प्रवेशिकांमधून अंतिम आणि सर्वोत्तम ग्रामीण कादंबरी म्हणून ऋषिकेश गोल्हार यांची 'रानोबाचा माळ' ही ग्रामीण कादंबरी निवडण्यात आली.

यावर्षी या पुरस्कार योजनेसाठी एक जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान प्रकाशित झालेल्या नवोदित ग्रामीण लेखकांच्या एकूण १४ कादंबऱ्या प्राप्त झाल्या होत्या. या कादंबऱ्यांचे परीक्षण ग्रामीण कादंबरीकार, कथाकार बाबाराव मुसळे, ज्येष्ठ कवी, समीक्षक मोहन



शिरसाट आणि नामावंत वाचक प्राचार्य भास्कर गायकवाड या तिघांनी केले. सन्मानचिन्ह आणि दहा हजार रूपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

ही पुरस्कार योजना गतवर्षीपासून नवोदित ग्रामीण कादंबरीकारांसाठी सुरू करण्यात आली असून, यंदाचे हे दुसरे वर्ष आहे. यंदाचा पुरस्कार वितरण कार्यक्रम सहा जून २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता एस.एम.सी. शिक्षण संकुल परिसर, वाशीम येथे होणार आहे. वत्सगुल्म फाउंडेशन वाशीम, विदर्भ साहित्य संघ शाखा वाशीम, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय वाशीम आणि मुसळे कुटुंबियांतर्फे पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

शब्दवेध बुक हाऊस, औरंगाबाद यांनी प्रकाशित केलेली ऋषिकेश रोहिदास गोल्हार यांची 'रानोबाचा माळ' ही ग्रामीण कादंबरी आजच्या बदलत्या ग्रामीण जीवनाला कवेत घेणारी आहे. अल्पभूधारक शेतकरी व शेतमजूर यांच्या वाट्याला आलेलं खडतर जगणं सुसह्य करण्यासाठी त्यांना कधीकधी विस्थापित व्हावे लागते. कधी पोटा-पाण्यासाठी तर कधी शासकीय प्रकल्प, योजना, कारखाने वा अतिवर्षण-अवर्षण यांमुळे. या कादंबरीतला नायक कोंडीबा असाच गंगथडीच्या (गोदावरी) पलीकडच्या बालाघाटच्या एका वैराण डोंगर-गावातून विस्थापित होऊन आपली बायको, दोन बैल यांसह बैलगाडीत पसारा भरून थडीच्या अलीकडच्या बारमाही ओलित असलेल्या कायम हिरव्या रानात येतो. एका गावपाटलांचे उपेक्षित असे रानोबाच्या माळावरचे अर्धवट पडीक रान कसायला घेतो. हा माळ दहशतग्रस्त म्हणून पंचक्रोशीत कुप्रसिद्ध. तेथे उद्भवणाऱ्या आकस्मिक संकटांना कोंडीबा धैर्याने तोंड देतो. पुढे कसायला घेतलेली तीच जमीन विकत घेतो. एवढेच नव्हे तर तेथे गावोगावच्या विस्थापितांना सन्मानाने तेथे आणून एक अख्खं गाव उभं करतो.त्या गावचा तो प्रतिष्ठित वतनदार बनतो. काळ्या मातीवर निरतिशय प्रेम करणारा हा जातिवंत कास्तकार काळी माय आणि नवा गाव यांचा सर्जक बनतो. हा नायक मनाने कणखर, धैर्यशील, कष्टाळू, विपरित परिस्थितीशी न डगमगता भिडणारा आहे. कादंबरीच्या कथानकात विलक्षण गती आहे. रानोबाच्या माळाविषयीचे रहस्य लेखकाने अत्यंत कुशलतेने फुलवत फुलवत नेले आहे. त्यामुळे वाचक - उत्सुकता उत्तरोत्तर अधिकाधिक वाढत जाते. गंगथडीची ग्रामीण बोली तेथील जीवनानुभवांना अधिक जिवंत करते. यामुळेच तीनही परीक्षकांनी ही कादंबरी पुरस्कारासाठी सर्वोत्तम म्हणून निवडली आहे.

# ‘काँग्रेस परजीवी पक्ष, मित्रांच्याच पाठीत खंजीर खुपसतो’

## तमिळनाडूमध्ये सत्ता स्थापन होताच पंतप्रधान मोदींची टीका



**तामिळनाडू-** तामिळनाडमध्ये टीव्हीके पक्षाने इतर पक्षांच्या मदतीने सत्ता स्थापन केली आहे. टीव्हीकेचे प्रमुख जोसेफ विजय यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली असून मंत्रिमंडळातील ८ जणांनीही यावेळी शपथ घेतली. या शपथविधीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जोसेफ विजय यांचे अभिनंदन केले असून केंद्र सरकार राज्याच्या विकासासाठी कायम सहकार्य करेल, असं आश्वासन दिलं. दरम्यान, यावेळी त्यांनी काँग्रेसवरही टीका केली आहे. काँग्रेस धोकेबाज असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. ते कर्नाटकातील कार्यक्रमात बोलत होते.

**राजकीय वारे बदलताच काँग्रेसने दगा दिला**

‘सध्या तामिळनाडूतील परिस्थिती बघा. २५-३० वर्षे काँग्रेसचे द्रमुकसोबत घनिष्ठ संबंध होते. वेळोवेळी द्रमुकसोबतच्या युतीने काँग्रेसला संकटातून बाहेर काढले आहे. खरं तर, २०१४ पूर्वी १० वर्षे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार मोठ्या प्रमाणावर द्रमुकमुळेच टिकले. तरीही, जी द्रमुक काँग्रेसच्या भल्यासाठी सातत्याने काम करत होती, त्याच पक्षाला राजकीय वारे बदलताच काँग्रेसने दगा दिला’, असे पंतप्रधान म्हणाले.

**काँग्रेसने पाठित खंजीर खुपसला**

‘सत्तेच्या लालसेपोटी, सत्तालोभी काँग्रेसने पहिल्याच संधीत द्रमुकच्या पाठीत खंजीर खुपसला. आता राजकीयदृष्ट्या टिकून राहण्यासाठी काँग्रेसला आणखी एका पक्षाची गरज आहे, ज्याच्या पाठीवर स्वार होऊन ती पुढे जाऊ शकेल’, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

विजय यांच्या नऊ मंत्र्यांच्या नव्या मंत्रिमंडळात तरुण आणि अनुभवी नेते असून त्यात टीव्हीके प्रमुखांच्या मुख्य गटालाही स्थान मिळाले आहे. परंतु, बहुमताचा आकडा गाठण्यासाठी संख्याबळाची गरज असताना टीव्हीकेला पाठिंबा देण्यास तयार झालेल्या पहिल्या पक्षांपैकी एक असलेल्या राहुल गांधींच्या काँग्रेसच्या एकाही नेत्याला नव्या तामिळनाडू मंत्रिमंडळात स्थान मिळालेले नाही.

राजकीय विश्लेषकांच्या मते, प्रचाराच्या काळातच काँग्रेस पक्ष विजयवर बारीक लक्ष ठेवून असल्याचे स्पष्ट संकेत मिळत होते. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना तमिळनाडूच्या राजकारणात विजय यशस्वी होईल यावर खूप विश्वास होता, इतका की निवडणुकीपूर्वी डीएमकेने बोलावलेल्या अनेक सभांना काँग्रेसने हजेरी लावली नव्हती.

**मुख्यमंत्री पदी जोसेफ विजय**

टीव्हीके या पक्षाने तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत मोठा करीश्मा दाखवत १०८ जागा जिंकल्या. तमिळनाडूमध्ये पन्नास वर्षांपासून असलेली डीएमके आणि एआयडीएमके या पक्षांना पर्याय म्हणून जोसेफ विजय यांचा टीव्हीके पक्ष उभा राहिला आहे. या पक्षाला बहुमत गाठता आले नव्हते. दरम्यान आता १२१ सदस्यांचा पाठिंबा असल्याचं पत्र विजय यांनी राज्यपालांना दिले. ज्यानंतर तमिळनाडूच्या मुख्यमंत्री या पदावर जोसेफ विजय विराजमान झाले आहेत.

# खा. सुप्रिया सुळेंच्या कारचा अपघात

## भरधाव वाहनाची धडक; गुजरात पासिंगचे वाहन



**पुणे :** राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार तथा शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांचा पुणे ते मुंबई प्रवासादरम्यान भीषण अपघात झाला. आज महामार्गावरून जात असताना एक वाहनचालक बेदरकार वाहन चालवत असल्याने त्याने सुप्रिया सुळे यांच्या गाडीला धडक दिली. सुदैवाने यात काही दुर्दैवी घडलेलं नाहीय.

**सुप्रिया सुळेंची पोस्ट करत माहिती**

याबाबत सुप्रिया सुळे यांनी पोस्ट करत माहिती दिली आहे. सुळे यांनी संबंधित गाडी चालकाचा नंबर देखील शेअर केला आहे. ’जीजे १३ सीएफ ५२५७ या क्रमांकाच्या वाहनाने निष्काळजीपणे आणि वेगात वाहन चालवत बाजूने धडक दिल्याने हा अपघात झाला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि सर्वजण सुरक्षित बचावले. सीट बेल्ट घातल्यामुळे मी बचावले असल्याचं’, सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.

**रस्ते सुरक्षित करण्याचे आवाहन**

या घटनेनंतर महामार्गावरील वाढत्या बेफिकीर वाहनचालकांबाबत चिंता व्यक्त होत आहे. अतिवेग, निष्काळजीपणा आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्यामुळे अनेकांचे जीव धोक्यात येत असल्याचं पुन्हा अधोरेखित झालं आहे. नागरिकांनी सीट बेल्टचा वापर करावा, सतर्क राहावे आणि जबाबदारीने वाहन चालवून रस्ते सुरक्षित करण्याचं आवाहन सुप्रिया सुळेंकडून करण्यात आलं आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर संग्राम भंडारे यांच्याकडून शाईफेक हल्ला केल्याची घटना घडली. यावेळी आपणास ठार मारण्याची धमकीही देण्यात आल्याचं लवांडे यांनी सांगितलं. या शाईफेकीचा व्हिडीओ समोर आला असून तो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. याप्रकरणी, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र, याप्रकरणात, हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी विकास लवांडे यांनी केली आहे. त्याच अनुषंगाने राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनीही पोलीस ठाण्यात जाऊन थेट पोलिसांना आणि सरकारला इशारा दिला आहे. रोहित पवार यांनी ट्विटरवरही पोस्ट केली आहे.

# उद्धव ठाकरे रमले फोटोग्राफीच्या आठवणीत



**मुंबई :** छायाचित्र क्षण गोठवण्याची कला आहे. निर्जीव क्षणांना बोलके करण्याचे कसब छायाचित्रकाराकडे असते. सध्या फोटोग्राफीतील डेव्हलप शब्द गेला आहे. आता सगळे डिजिटल झाले आहे. छायाचित्रकाराने स्वत:चे छायाचित्र विकसित करण्याबरोबरच आपल्यासारखेच आणखीन छायाचित्रकार पुढे आणायला हवेत. आपल्याकडील कला इतरांना शिकवायला हवी, असा सल्ला शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी छायाचित्रकार या नात्याने दिला.

मुंबई प्रेस क्लब येथे शुक्रवारी छायाचित्रकार दिवंगत रजनीश काकडे यांनी असोसिएटेड प्रेस संस्थेसाठी टिपलेल्या ‘द आय दॅट नेव्हर क्लोजेस’ या निवडक छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे ठाकरे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. ‘रायटींग वुईथ लाईट’ अशी छायाचित्रकारितेची व्याख्या आहे. छायाचित्रकार त्याच्या छायाचित्रातून व्यक्त होतो. ही व्यक्त होण्याची कला आहे. छायाचित्रकार निर्जीव क्षणांना बोलके करतो. पण, त्याची महती कळेपर्यंत तो आपल्यातून निघून गेलेला असतो, असे काहीसे काकडे यांचे झाले आहे.

महागड्या कॅमेऱ्याने चांगली छायाचित्रे येतात, असा अनेकांचा समज आहे. पण, प्रत्येकाला महागडा पेन दिल्याने अक्षर सुंदर येईल असे होत नाही. आणि चांगले अक्षर आले तरी विचार आणि शब्द चांगले असतीलच असे नाही. छायाचित्रकाराला नशा हवी. छायाचित्रकारांचे अग्रणी असलेले रघु राय हे बाळासाहेबांची छायाचित्रे घेण्यासाठी ‘मातोश्री’ येथे आले होते. तेव्हा मी त्यांना जवळून पाहिले. अत्यंत साधा माणूस होता. छायाचित्रकाराने गर्दीत स्वत:ला वेगळे समजता कामा नये, अन्यथा त्याला तो क्षण टिपता येणार नाही, असे ठाकरे म्हणाले.

छायाचित्रणाच्या माध्यमातून ऐतिहासिक घटना जतन होत असतात. मुंबईतील प्रमुख क्षण आणि महत्त्वाच्या टप्प्यांना समर्पित असे कायमस्वरूपी छायाचित्र दालन उभारण्याचा प्रस्ताव यावेळी ठाकरे यांनी मांडला. या दालनामुळे देशा-विदेशातील पर्यटकांना तसेच तरुण पिढीलाही मुंबईच्या इतिहासाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल, असे ते म्हणाले. यावेळी शिवसेनेचे खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, शिवसेना आमदार मिलींद नार्वेकर, असोसीएटेड प्रेसच्या विनीता प्रदीप, मुंबई प्रेस क्लबचे अध्यक्ष समर खडस, सरचिटणीस राजेश मस्करान्हस, रजनीश यांचे बंधू राजू काकडे उपस्थित होते.

## ‘आई-वडिलांना सोड तरच...’

**नवी दिल्ली -** उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पाचवीपर्यंत शिकलेल्या एका पतीने आपल्या पत्नीला एएनएम चा कोर्स करण्यासाठी दिवसरात्र मेहनत केली, मात्र नोकरी मिळताच पत्नीने आता त्याच्यासोबत राहण्यास नकार दिला आहे. गोंडा जिल्ह्यातील मोतीगंज पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या चपरतल्ला कौरहे गावातील राजेश कुमार वर्मा याचं २००१ मध्ये रेणू वर्माशी लग्न झालं होतं.रेणूने एएनएम कोर्स करण्याची इच्छा व्यक्त केली. राजेशने पत्नीच्या शिक्षणासाठी पंजाबला जाऊन लोखंडाच्या गोदामात हमाली केली. आपल्या दोन म्हशी ३५ हजार रुपयांना विकल्या आणि उसाच्या शेतीतून आलेले ६० हजार रुपयेही तिच्या शिक्षणासाठी दिले. राजेशचा असा आरोप आहे की, एएनएमचा कोर्स पूर्ण झाल्यावर रेणूला गोंडा येथील एका रुग्णालयात नोकरी मिळाली.

# फोटोवर थुंकला, मग हर की पैडीमध्ये जिवंत पत्नीचे केले पिंडदान



**हरिद्वार -** हिंदू धर्मात पवित्र धर्मक्षेत्र म्हणून ओळख असलेल्या हरिद्वार येथील हर की पैडी या तीर्थक्षेत्रातील व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमुळे खळबळ उडाली आहे. या व्हिडीओमध्ये एक व्यक्ती कथितपणे एका महिलेच्या फोटोवर थुंकताना दिसत आहे. त्यानंतर तो हा फोटो गंगा नदीत प्रवाहित करताना तसेच पिंडदान करताना दिसत आहे. या व्यक्तीने काही कारणामुळे त्याच्या जिवंत पत्नीचं प्रतिकात्मक पिंडदान केल्याचा दावा केला जात आहे.

दरम्यान, या व्हिडीओमध्ये दिसत असलेल्या व्यक्तीची ओळख पटू शकलेली नाही. तसेच फोटोमध्ये दिसत असलेली महिला कोण आहे. तसेच या दोघांमध्ये काय संबंध होते, हेही स्पष्ट झालेलं नाही. मात्र या व्हिडीओवरून सोशल मीडियावर वेगवेगळे दावे केले जात आहेत. काही युझर्सच्या म्हणण्यानुसार सदर इसम त्याच्या पत्नीच्या सततच्या रील बनवण्याच्या सवयीमुळे त्रस्त झाला होता. तसेच त्या रागातून त्याने हे कृत्य केलं. मात्र आतापर्यंत या दाव्याला दुजोरा मिळू शकलेला नाही.

हा व्हिडीओ हर की पैडी येथील असल्याचे सांगण्यात येत आहे.

तसेच हा व्हिडीओ समोर आल्यापासून पुरोहित आणि हिंदुत्ववादी संघटनांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. आध्यात्मिक केंद्र मानल्या जाणाऱ्या गंगा नदीच्या घाटांवर अशा प्रकारचं कृत्य करणं हे लोकांच्या धार्मिक भावना दुखावणारं कृत्य आहे, असे लोकांचे म्हणणे आहे.

# मथुरा, वृंदावन, आग्रा येथे विमानाने जाणे सोयीचे ठरणार

## नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ १५ जूनपासून सेवेत



**मुंबई :** नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ (जेवर विमानतळ) उत्तर प्रदेशातील गौतम बुद्ध नगर जिल्ह्यातील जेवर येथे स्थित एक महत्त्वाकांक्षी ग्रीनफील्ड प्रकल्प आहे. दिल्ली-एनसीआर आणि पश्चिम उत्तर प्रदेशला विमान सेवा मिळेल. १५ जून पासून या विमानतळावरून व्यावसायिक विमानसेवा सुरू होणार असून इंडिगो, अकासा एअर आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या कंपन्या इथून सेवा सुरू करतील.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २८ मार्च रोजी नोएडा विमानतळाचे अधिकृत उद्‌घाटन झाले आहे. पहिल्या टप्प्यात १ धावपट्टी आणि वार्षिक १२ दशलक्ष प्रवाशांची हाताळण्याची क्षमता असणार आहे. नोएडा विमानतळ दिल्ली-वाराणसी हाय-स्पीड रेल कॉरिडॉर आणि भविष्यातील मेट्रो विस्ताराशी जोडले जाणार आहे. झुरिच एअरपोर्ट इंटरनॅशनल एजी या स्विस कंपनीद्वारे विकसित केले जात आहे. विमानतळावर भारतीय संस्कृती आणि आधुनिक सुविधांचा मेळ घातला आहे. नोएडा विमानतळामुळे दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी करण्यास मदत होईल. तसेच विशेषतः मथुरा, वृंदावन, आग्रा या शहरातील पर्यटन व औद्योगिक विकासाला चालना देईल.

# भोंदू खरात प्रकरणी रूपाली चाकणकर यांची चौकशी सुरू

## नाशिकमध्ये SIT समोर नोंदवला जबाब



**नाशिक -** भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे वादात अडकलेल्या रूपाली चाकणकर यांची नाशिक एसआयटीसमोर चौकशी सुरू झाली आहे. आज सकाळी चाकणकर यांनी पुण्याहून नाशिकला जात तपास यंत्रणेसमोर हजेरी लावली. रूपाली चाकणकर या वकिलांसोबत चौकशीसाठी पोहचल्या. महिला आयोगाच्या अध्यक्ष म्हणून चाकणकर यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर केला होता असा आरोप आहे. त्याशिवाय खरात यांच्या शिवानिका संस्थाच्या विश्वस्तपदी रूपाली चाकणकर होत्या. त्यामुळे आर्थिक व्यवहारांबाबतही चाकणकर यांची चौकशी करण्यात येत आहे.

एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते या रूपाली चाकणकर यांची चौकशी करत आहेत. खरातशी संबंधित आर्थिक व्यवहार आणि त्यांच्यावर झालेल्या आरोपाबाबत ही चौकशी होत आहे. या चौकशीला हजर होण्यापूर्वी चाकणकर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या की, आज जो एसआयटीचा तपास सुरू आहे, त्यांना काही प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. ती देण्यासाठी मी आली आहे. तपासात माझे पूर्णपणे सहकार्य राहील. तपास यंत्रणेला जी काही मदत लागेल ती निश्चितपणे केली जाईल असं त्यांनी म्हटलं आहे.

तर खरात प्रकरणात राज्याच्या मंत्रिमंडळातील ४ मंत्र्यांचा समावेश आहे. या मंत्र्यांची हकालपट्टी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवणार असून भोंदू खरातकडून सगळी माहिती गोळा करून त्याचा एन्काऊंटर केला जाईल असा दावा काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला आहे. मात्र ४ मंत्र्यांची नावे आहेत, त्यांचा यात सहभाग असेल तर नाना पटोलेंनी ती नावे मुख्यमंत्र्यांकडे द्यावीत किंवा जाहीर करावीत. याची निश्चितपणे चौकशी केली जाईल. मात्र ठोकताळ्यावर अंदाजपणे नावे सांगणे आणि प्रत्यक्ष गुन्ह्यात सहभागी असणे हा भाग वेगळा आहे. त्यामुळे ही नावे मुख्यमंत्र्यांना द्यावीत. माध्यमांसमोर जायचे असेल तर ती नावे उघडही करावी असा टोला मंत्री संजय शिरसाट यांनी लगावला आहे.दरम्यान, तपास यंत्रणेत पतसंस्थांच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी होईल परंतु ज्या राजकीय नेत्यांचा या प्रकरणात सहभाग आहे त्यांची चौकशी कोण करणार असा सवाल सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. माझ्याकडे आलेली सगळी माहिती, त्यातील आर्थिक गैरव्यवहार हे सगळे एसआयटी कडे पाठवले तरीही त्याची चौकशी झाली नाही असा आरोप दमानिया यांनी केला आहे.

# संक्षिप्त

## पाच वाघांच्या मृत्यूनंतर खळबळ

**नागपूर :** मध्यप्रदेशातील कान्हा व्याघ्रप्रकल्प परिसरात ‘कॅनाईन डिस्टेंपर’ विषाणूमुळे पाच वाघांचा मृत्यू झाल्यानंतर देशातील व्याघ्रसंवर्धन व्यवस्थेबाबत धोक्याची घंटा वाजली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणने (एनटीसीए) देशभरातील सर्व व्याघ्रप्रकल्पांसाठी सतर्कतेच्या नव्या सूचना प्रसिद्ध करत प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याचे आदेश दिले.



आढळल्यानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर नमुने जबलपूर येथील ‘स्कूल ऑफ वाइल्डलाइफ फॉरेन्सिक अँड हेल्थ’ येथे तपासणीसाठी पाठवण्यात आले. तपासणीत ‘कॅनाईन डिस्टेंपर’ या संसर्गाची पुष्टी झाली. उपचार सुरू असतानाच ‘टी-१४१’ वाघीण आणि तिच्या चार बछड्यांचा मृत्यू झाला. यापूर्वी तीन बछड्यांचे मृतदेहही परिसरात आढळून आले होते. मध्यप्रदेशातील या घटनेनंतर देशभरातील व्याघ्रप्रकल्पात खळबळ उडाली.राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने ‘कॅनाईन डिस्टेंपर’च्या प्रतिबंधासाठी नव्या सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. मध्यभारतातील वाघांच्या मृत्यूंचा उल्लेख करत ‘कॅनाईन डिस्टेंपर’ संसर्गाबाबत सतर्कता वाढवण्याच्या सूचना दिल्या आहेत. व्याघ्रप्रकल्प आणि संवेदनशील अधिवासांभोवती ‘इम्युनायझेशन बफर’ तयार करण्यासाठी श्वानांचे मोठ्या प्रमाणावर लसीकरण करण्याच्या सूचना दिल्या. पशुसंवर्धन विभाग व स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने विशेष मोहीम राबवणे, बफर क्षेत्रातील पाळीव जनावरांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे, संशयित प्रकरणांचे नमुने तातडीने तपासणीसाठी पाठवणे आणि वनकर्मचाऱ्यांना रोगनियंत्रण प्रशिक्षण देण्याचे निर्देशही देण्यात आले. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने सर्व राज्यांना या उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करून नियमित ‘केलेल्या कारवाईचा अहवाल’ सादर करण्यास सांगितले.

## कोकण, गोवा प्रवाशांना रेल्वेचा सुखद दिलासा

**नवी मुंबई :** उन्हाळी सुट्ट्यांमध्ये कोकण आणि गोव्याकडे जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने प्रवाशांना दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मडगाव जंक्शन-पनवेल-मडगाव जंक्शन दरम्यान अतिरिक्त साप्ताहिक उन्हाळी विशेष रेल्वे चालवण्याची घोषणा केली आहे.रेल्वे प्रशासनाने



दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ०११०६ मडगाव जंक्शन-पनवेल रेल्वे स्थानक साप्ताहिक विशेष रेल्वे रविवार, १० मे २०२६ रोजी सायंकाळी ४:३० वाजता मडगाव जंक्शन येथून रवाना होणार आहे. ती दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजता पनवेल स्थानकात पोहोचेल. त्यानंतर गाडी क्रमांक ०११०५ पनवेल-मडगाव जंक्शन विशेष रेल्वे सोमवार, ११ मे २०२६ रोजी सकाळी ५:४५ वाजता पनवेल येथून सुटणार असून, सायंकाळी ६:१० वाजता मडगाव जंक्शन येथे पोहोचणार आहे.ही विशेष रेल्वे करमाळी, थिवीम, सावंतवाडी रोड, कुडाळ, सिंधुदुर्ग, कणकवली, वैभववाडी रोड, राजापूर रोड, विलवडे, आडावली, रत्नागिरी, संगमेश्वर रोड, चिपळूण, खेड, माणगाव, रोहा आणि पेण या महत्त्वाच्या स्थानकांवर थांबा घेणार आहे. त्यामुळे गोवा, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील प्रवाशांना या सेवेचा मोठा लाभ होईल.

## नागपूरच्या शंकरनगर चौकात उन्हात ड्रामा

**नागपूर :** उपराजधानी नागपुरात सध्या उष्णतेने अक्षरशः कहर केला आहे. तापमान ४५ अंशांच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे. अशा प्रचंड उन्हात नागरिक घराबाहेर पडणे टाळत असताना, शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या शंकरनगर चौकात आज भर दुपारी घडलेल्या एका विचित्र प्रकाराने नागरिकांसह पोलिसांनाही धक्का बसला.



भर रस्त्यात एका तरुणाने अचानक अर्धनग्न होत चौकाच्या मधोमध झोपून अक्षरशः ‘बेडरूम’सारखा आराम करण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता तो निवांतपणे मोबाईलवर कोणाशी तरी गप्पा मारत पडून राहिला. या अनपेक्षित प्रकारामुळे काही काळ वाहतुकीत गोंधळ निर्माण झाला आणि चौकात बघ्यांची गर्दी जमली.

## माती खचल्याने विहिरीत कोसळले

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमधील सिल्लोड तालुक्यातील धानोरा गावातून एक अत्यंत सुन्न करणारी घटना समोर आली आहे. विहिरीचं काम सुरू असताना अचानक मातीचा ढिगारा खचल्यानं, विहिरीत पडलेल्या दोन तरुण मुलांसह वडिलांचा जागीच मृत्यू झाला. काल शनिवारी रोजी रात्री साडेनऊ



वाजेच्या सुमारास ही काळजाचा ठोका चुकवणारी दुर्घटना घडली. बाजीराव सर्जेराव काकडे (वय ५५), आजिनाथ बाजीराव काकडे (वय २५) आणि शाम बाजीराव काकडे (वय २२) अशी मृतांची नावे आहेत. या घटनेनं काकडे कुटुंब उद्ध्वस्त झालं असून संपूर्ण धानोरा गावावर शोककळा पसरली आहे.

## गरोदरपणाच्या कारणावरून नियुक्ती रोखणे बेकायदेशीर

**छत्रपती सं.:** एखादी महिला गरोदर असेल तर तो काही आजाराचा विषय राहात नाही, असे स्पष्ट करत मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने महिला वर्गासाठी दिलासादायक निर्णय दिला आहे. केवळ गरोदरपणाचे कारण पुढे करून एखाद्या महिलेची नियुक्ती रोखणे हे तिच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल देताना



न्यायालयाने केंद्र सरकारचा यासंदर्भातील आदेश रद्द ठरवत याचिकाकर्त्या महिला डॉक्टरला कामावर रुजू करून घेण्याचे आदेश दिले आहेत. याचिकाकर्त्यांना कामावर रुजू करून घेण्यापूर्वी सीआरपीएफ डीआयजी यांच्या ‘फिटनेस सर्टिफिकेट’ च्या अधीन राहूनच त्यांना नियुक्ती दिली जाणार आहे.

# जनमाध्यम

E-paper - www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा,सोमवार ११ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४ ■ वर्ष - १४ ■ अंक- १६३


## ग्रंथालयांच्या नावाखाली अनुदानाची लूट; ‘गाव तिथे ग्रंथालय’ योजना कागदावरच ठप्प

### वाचन संस्कृतीचा गळा घोटणारे कोण? फक्त बोर्ड, बनावट बिले आणि घरच्यांचीच नोकरभरती

**वर्धा / रवींद्र लाखे**

‘वाचाल तर वाचाल’ असा संदेश देणाऱ्या महाराष्ट्रातच आज वाचन संस्कृतीचा श्वास गुदमरू लागला आहे. राज्य शासनाची गाजलेली ‘गाव तिथे ग्रंथालय’ योजना वर्धा जिल्ह्यात अक्षरशः कागदावरच उरली असून शासनमान्य ग्रंथालयांच्या नावाखाली मोठा अनुदान घोटाळा सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. तब्बल १ हजार ३८७ गावांचा जिल्हा असलेल्या वर्ध्यात केवळ १०४ गावांतच शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये अस्तित्वात आहेत. उर्वरित हजारो गावांतील विद्यार्थी, युवक आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे तरुण आजही वाचनालयाच्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत.

राज्य शासनाने सन२०१२-१३ नंतर नवीन सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता देणेच बंद केले. परिणामी गेल्या १४ वर्षांत जिल्ह्यात एकाही नवीन ग्रंथालयाला मान्यता मिळाली नाही. ज्ञानाची गंगा गावागावात पोहोचवू अशी घोषणा करणारे शासन प्रत्यक्षात मात्र वाचन संस्कृतीच्या प्रश्नावर पूर्णपणे उदासीन असल्याचे चित्र आहे.

विशेष म्हणजे, ज्या गावांमध्ये ग्रंथालये आहेत त्यांची परिस्थितीही अत्यंत दयनीय आहे. अनेक ठिकाणी फक्त ग्रंथालयाचा बोर्ड लावलेला दिसतो, आत ना पुस्तके, ना वाचक, ना वर्तमानपत्रे तरीही शासनाचे अनुदान मात्र नियमितपणे खात्यात जमा होत असल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

आंजी येथील ‘ब’ गटाच्या ग्रंथालयाचे उदाहरण तर संतापजनक ठरत आहे. नियमांनुसार अशा ग्रंथालयात किमान आठ दैनिके, मासिके आणि साप्ताहिके उपलब्ध असणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात येथे वाचकांसाठी आवश्यक साहित्यच नसल्याची चर्चा गावात रंगली आहे. एवढेच नव्हे तर गावात अवघ्या सहा वर्तमानपत्रांचे पार्सल येत असताना



तब्बल १८ वर्तमानपत्रांचे बिल दाखवले जात असल्याचा आरोप होत आहे. शासनाकडून मिळालेली झेरॉक्स मशीनही ग्रंथालयात न वापरता खासगी किराणा दुकानात वापरली जात असल्याची माहिती समोर आली आहे.

याहून धक्कादायक बाब म्हणजे, काही ग्रंथालयांमध्ये घरातीलच सदस्यांना कर्मचारी म्हणून रजिस्टरवर दाखवून वेतन उचलले जात असल्याचे बोलले जात आहे. याच धरतीवर जिल्ह्यात आणखी काही ग्रंथालय सुरू आहे, जिल्ह्यातील जवळपास २०० कर्मचारी या १०४ ग्रंथालयांमध्ये कार्यरत असल्याचे दाखवले जात असले तरी अनेक ठिकाणी प्रत्यक्ष कर्मचारीच आढळत नाहीत. हे अनुदान नेमके कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, असा प्रश्न आता नागरिक उपस्थित करीत आहेत.

दरम्यान, ऑडिट अहवाल न सादर करणे, अंतर्गत वाद, आर्थिक अनियमितता आणि कारभारातील गोंधळ यामुळे गेल्या तीन वर्षांत जवळपास १५ ग्रंथालयांची शासनमान्यता रद्द करण्यात आली आहे. मात्र तरीही प्रशासनाकडून जिल्हाभरातील संशयित ग्रंथालयांची सखोल चौकशी होत नसल्याने भ्रष्ट कारभाराला खतपाणी मिळत असल्याची टीका होत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार पुस्तके, स्पर्धा परीक्षांची मासिके, वर्तमानपत्रे आणि अभ्यासासाठी शांत जागा मिळावी, यासाठी शासनाने ‘गाव तिथे ग्रंथालय’ योजना आणली होती. पण आज या योजनेचे रूपांतर काही ठिकाणी अनुदान तिथे गैरव्यवहार अशा स्थितीत झाले आहे.

वाचन संस्कृती वाचवायची असेल तर शासनाने तातडीने जिल्ह्यातील सर्व ग्रंथालयांचे विशेष ऑडिट करून बनावट बिलं, खोटी कर्मचारी नोंद आणि अनुदान घोटाळ्यांची चौकशी करावी, तसेच प्रत्येक गावात खऱ्या अर्थाने सुसज्ज वाचनालय उभे करावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

---

बजाज ग्रुप खर्च करतोय कोट्यवधी


## ... आणि प्रशासन चौकाच्या विद्रूपीकरणावर मौन

### झेंड्यांच्या अतिक्रमणाने ‘हायमास्ट’चे दिवे फुटले

### जमनालाल बजाज चौकाचा चेहरामोहरा बिघडविणाऱ्यांवर कारवाई कधी?

**वर्धा / जनमाध्यम**

शहराच्या मध्यवर्ती भागातील जमनालाल बजाज चौकाचे कोट्यावधी रुपये खर्च करून सौंदर्यीकरण सुरू असताना, दुसरीकडे त्याच चौकाचे उघडपणे विद्रूपीकरण होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, या सौंदर्यीकरणासाठी शासनाचा एक रुपयाही खर्च होत नसून संपूर्ण खर्च बजाज ग्रुप करीत आहे. मात्र एवढे असूनही चौकाची देखभाल आणि विद्रूपीकरण रोखण्याची जबाबदारी असलेल्या नगरपालिका प्रशासनाने घेतलेली संशयास्पद शांतता आता चर्चेचा विषय ठरत आहे.



बसस्थानक, रेल्वे स्टेशन आणि सावंगी रुग्णालयाकडे जाणारा हा वर्ध्यातील अत्यंत वर्दळीचा चौक आहे. शहराची ओळख असलेल्या या चौकाचे आकर्षक रूप निर्माण करण्यासाठी बजाज ग्रुपने पुढाकार घेत आधुनिक विद्युत रोषणाई, सुशोभीकरण आणि दोन भव्य हायमास्ट उभारले. चौक सुंदर दिसावा, शहराची प्रतिमा उंचवावी यासाठी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. मात्र काही बेजबाबदार घटकांनी या हायमास्टवर मोठमोठे राजकीय झेंडे आणि बॅनर लावून चौकाचे विद्रूपीकरण सुरू केले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, झेंडे बांधताना हायमास्टवरील लाईटही फुटल्याची माहिती समोर आली आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होत असतानाही प्रशासनाने कोणतीही कठोर कारवाई केलेली नाही. याबाबत नगरपालिकेला वेळीच माहिती देण्यात आल्याचे बोलले जात असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी कानाडोळा केल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.शासनाचा पैसा खर्च झाला नाही म्हणून प्रशासनाने दुर्लक्ष करायचे का? चौकाचे सौंदर्य जपणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे ही जबाबदारी प्रशासनाची नाही का? असा प्रश्न आता वर्धेकर विचारू लागले आहेत.

एका बाजूला बजाज ग्रुप शहर सुंदर करण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करीत आहे, तर दुसऱ्या बाजूला प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे चौकाचा चेहरामोहरा विद्रूप होत असल्याचे चित्र संतापजनक ठरत आहे.

आता तरी नगरपालिका प्रशासन जागे होऊन चौक विद्रूप करणाऱ्यांवर कारवाई करणार का, की ‘झेंडा संस्कृती’समोर पुन्हा हात टेकणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

---

## न्यू आर्ट्स कॉलेजलगत भीषण आग

### शॉर्टसर्किटने दोन दुकाने भस्मसात, मोठा अनर्थ टळला

**वर्धा / जनमाध्यम**

शहरातील न्यू आर्ट्स कॉलेजच्या बाजूला रविवारी सकाळी सुमारे आठ वाजताच्या सुमारास अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. प्राथमिक माहितीनुसार, इलेक्ट्रिक शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून या आगीत दोन दुकाने जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.




सकाळच्या वेळी अचानक धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळा उसळू लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली. काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण केल्याने आजूबाजूच्या दुकानधारकांनी धावाधाव करत आपला माल सुरक्षित ठिकाणी हलविण्याचा प्रयत्न केला. नागरिकांनी तत्काळ नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाला माहिती दिली.

माहिती मिळताच नगरपरिषदेचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे आग आणखी पसरून मोठा अनर्थ होण्यापासून टळला. घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती.

प्राथमिक तपासात इलेक्ट्रिक शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. मात्र नेमके कारण काय, याचा अधिकृत तपास सुरू असून संबंधित विभागाकडून पंचनामा करण्यात येत आहे. आगीत जळालेल्या दुकानांतील साहित्य, फर्निचर व इतर वस्तूंचे मोठे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, शहरात वाढत्या उष्णतेमुळे तसेच जुन्या वीजवाहिन्यांमुळे शॉर्टसर्किटच्या घटना वाढत असल्याने नागरिकांनीही सतर्क राहण्याची गरज व्यक्त होत आहे. नगरपरिषद व वीज वितरण विभागाने अशा धोकादायक ठिकाणांची तातडीने तपासणी करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

---

## दारूबंदी फक्त नावालाच ; तीन दिवसांत तब्बल १.६९ कोटींचा दारूसाठा जप्त

### वर्धेत पोलिसांची ‘वॉशआऊट’ मोहीम; २२९ गुन्हे दाखल, अवैध दारू व्यवसायाचे जिल्हाभर जाळे उघड

**वर्धा / जनमाध्यम**

दारूबंदी लागू असलेल्या वर्धा जिल्ह्यात अवैध दारू व्यवसाय किती फोफावला आहे, याचे धक्कादायक वास्तव पोलिसांच्या ‘वॉशआऊट’ मोहिमेतून समोर आले आहे. अवघ्या तीन दिवसांत पोलिसांनी तब्बल १ कोटी ६९ लाख २३ हजार ७५० रुपयांचा दारूसाठा आणि संबंधित मुद्देमाल जप्त केला असून जिल्हाभरात २२९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे दारूबंदी फक्त कागदावरच आहे का असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत जिल्ह्यातील गावठी दारूभट्ट्या, जंगल परिसरातील गुप्त अड्डे, तसेच शहरांमध्ये सुरू असलेली देशी-विदेशी दारू विक्रीची ठिकाणे पोलिसांनी लक्ष्य केली. दि. ६ मे ते ८ मे दरम्यान जिल्ह्यातील १९ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाचवेळी



छापेमारी करण्यात आली.

या कारवाईत ६८ देशी-विदेशी दारू विक्रीचे गुन्हे आणि १६१ गावठी दारू विक्रीचे गुन्हे असे एकूण २२९ गुन्हे नोंदविण्यात आले. पोलिसांनी २७२ आरोपींवर कारवाई करत मोठ्या प्रमाणावर दारूसाठा, गावठी दारू निर्मिती साहित्य आणि इतर मुद्देमाल जप्त करून नष्ट केला.

विशेष म्हणजे, दारूबंदी असलेल्या जिल्ह्यात एवढ्या मोठ्या प्रमाणावर दारूचा साठा आढळल्याने पोलिस आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. गावोगावी आणि शहरातील काही भागांत अवैध दारू विक्री खुलेआम सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. पोलिसांनी जरी धडक कारवाई केली असली तरी या व्यवसायामागील मुख्य सूत्रधारांवर कठोर कारवाई होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.वर्धा जिल्ह्यात अवैध दारूचा कोणताही प्रकार सहन केला जाणार नाही. अशा मोहिमा पुढेही सातत्याने राबविल्या जातील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

---

## खासगी शाळांतील शिक्षकांचीही होणार ‘टीईटी चौकशी’

### पात्रता नसलेल्या शिक्षकांचे पितळ उघडे पडणार; शिक्षण विभागाचा इशारा

**वर्धा / जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यात इंग्रजी माध्यम आणि आधुनिक शिक्षणाच्या नावाखाली पालकांकडून भरमसाठ फी वसूल करणाऱ्या खासगी शाळांतील शिक्षक खरंच पात्र आहेत का? अनेक शाळांमध्ये टीईटी न झालेल्या शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना शिकवले जात असल्याच्या चर्चांना आता अधिकृत पडताळणीची जोड मिळणार आहे. राज्य शासनाने खासगी शाळांतील शिक्षकांच्या टीईटी पात्रतेची माहिती सक्तीने मागविण्याचा निर्णय घेतल्याने वर्ध्यातील अनेक शाळांचे शैक्षणिक वास्तव समोर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत शिकवणाऱ्या प्रत्येक शिक्षकाला शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. सरकारी शाळांमध्ये ही अट काटेकोरपणे राबविली जाते. मात्र खासगी विनाअनुदानित आणि स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये शिक्षकांची गुणवत्ता, पात्रता आणि अनुभव याबाबत कोणतीही पारदर्शक व्यवस्था नसल्याची ओरड सातत्याने होत आहे. वर्धा जिल्ह्यातही अनेक शाळांमध्ये कमी वेतनावर अपात्र शिक्षकांकडून शिक्षण दिले जात असल्याची चर्चा पालकांमध्ये सुरू आहे.दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने देशातील पहिली ते आठवीच्या सर्व शिक्षकांना टीईटी पात्र असणे बंधनकारक असल्याचा स्पष्ट निर्णय दिल्यानंतर शिक्षण विभाग अधिक सक्रिय झाला आहे.

---

## हॉटेल शिवममध्ये रंगली ‘दारू पार्टी’ ; एलसीबीचा धडाका, ७६ हजारांचा मुद्देमाल जप्त

### रामनगर हद्दीत अवैध दारू विक्रीचा पर्दाफाश; ग्राहकांसह हॉटेल व्यवस्थापनावर गुन्हा

**वर्धा/ जनमाध्यम**

शहरात दारूबंदी कायदा अस्तित्वात असतानाही काही हॉटेल चालकांकडून उघडपणे सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीला स्थानिक गुन्हे शाखेने जोरदार दणका दिला आहे. आर्वी रोडवरील हॉटेल शिवम येथे सुरू असलेल्या अवैध दारू अड्ड्यावर छापा टाकून पोलिसांनी तब्बल ७६ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे शहरातील अवैध दारू व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहेत.



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वाखालील पथक शुक्रवारी शहर परिसरात अवैध धंद्यांविरोधात पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी खात्रीशीर माहिती मिळाली की, आर्वी रोडवरील हॉटेल शिवममध्ये देशी-विदेशी दारूची विक्री केली जात असून ग्राहकांना तेथे बसून दारू पिण्यासाठी सर्व सुविधा पुरविण्यात येत आहेत. माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ हॉटेलवर धाड टाकली.

पोलिसांनी हॉटेलला घेराव घालून आत प्रवेश केला असता, काउंटरवर मॅनेजर दारू विक्री करताना आढळून आला. तर मागील हॉलमध्ये काही ग्राहक टेबलवर विदेशी दारूच्या बाटल्या, ग्लास आणि पाण्याच्या बाटल्या ठेवून मद्यप्राशन करताना दिसून आले. ग्राहकांना सेवा देण्यासाठी एक नोकरदेखील तेथे उपस्थित होता.

कारवाईदरम्यान पोलिसांनी नितेश शिरभाते, कुंदन करणे, दर्शन ठोके, रोहित सावरे आणि मनोज सायम यांना ताब्यात घेतले. झडतीमध्ये देशी-विदेशी दारू व बियरचा साठा, डिप फ्रिजर, स्टील ग्लास, जार, तसेच ग्राहकांना बसण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लोखंडी खुर्च्या व टेबल असा एकूण ७६ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी हॉटेल मालक नितीन पडोळे याच्यासह पाच आरोपींविरुद्ध रामनगर पोलीस ठाण्यात दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या पथकाने केली.

---

## संसदेत आवाज घुमताच रेल्वे प्रशासनाला जाग

- ■मृत्यूचे सापळे ठरलेले भुयारी मार्ग अखेर दुरुस्तीकडे
- ■खा. अमर काळेंच्या आक्रमक पाठपुराव्याला यश
- ■ पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याचा रेल्वेचा दावा

**वर्धा / जनमाध्यम**

लोकसभा मतदारसंघातील नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या रेल्वेच्या भुयारी मार्गांच्या समस्येवर अखेर रेल्वे प्रशासनाला जाग आली आहे. वर्षानुवर्षे खड्डयांनी विद्रूप झालेले रस्ते, साचणारे घाण पाणी आणि पावसाळ्यात बंद पडणारे भुयारी मार्ग यामुळे नागरिक अक्षरशः त्रस्त झाले होते. अनेकदा जीव धोक्यात घालून प्रवास करणाऱ्या नागरिकांचा आक्रोश संसदेत पोहोचताच खासदार अमर काळे यांनी हा प्रश्न जोरकसपणे लावून धरला आणि अखेर रेल्वे विभागाला कामाला लागावेच लागले.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात खासदार अमर काळे यांनी सिंदी (रेल्वे) ते चांदूर (रेल्वे) या मार्गावरील भुयारी मार्गांची दयनीय अवस्था उघड करत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. पावसाळ्यात हे मार्ग जलसमाधीत जातात, नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो, असा प्रश्न त्यांनी संसदेत उपस्थित केला होता.

या आवाजाची दखल घेत रेल्वे मंत्रालयाने संबंधित मार्गांच्या



दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.

सिंदी ते टिमटाळा रेल्वे लाईनवर तब्बल २१ भुयारी मार्ग असून त्यापैकी अनेक ठिकाणी पाण्याचा निचरा होत नसल्याने रस्ते कायम चिखलमय राहत होते. शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि नागरिकांना रोजच्या रोज नरकयातना सहन कराव्या लागत होत्या. काही ठिकाणी तर मोठमोठ्या खड्डयांमुळे अपघातांची भीती कायम होती. मात्र प्रशासनाकडून केवळ आश्वासनांचे फुगे उडवले जात होते.

खा. अमर काळे यांनी संसदेत आवाज उठवताच रेल्वे प्रशासनाने १४ भुयारी मार्गांवर पाण्याचा निचरा होण्यासाठी नाल्यांची व्यवस्था केली आहे. तर ७ ठिकाणी मोटारपंप बसवून साचलेले पाणी बाहेर काढण्याची तयारी करण्यात आली आहे. खड्डे बुजविण्याचे आणि रस्ते दुरुस्तीचे कामही सध्या वेगाने सुरू असल्याची माहिती रेल्वे मंत्रालयाने ४ मे २०२६ रोजी पत्राद्वारे दिली आहे.

दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या या प्रश्नावर अखेर हालचाल सुरू झाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

लोकप्रतिनिधींनी आवाज उठवला तर प्रशासन हलते, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. आता पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण होऊन नागरिकांची जीवघेणी समस्या कायमची मिटणार का, याकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# बदलत्या राजकारणाची नवी दिशा

केरळ आणि पश्चिम बंगालमधील संभाव्य सत्तापालट केवळ राज्यांपुरता मर्यादित नसून भारतीय राजकारणात राष्ट्रवाद आणि थेट विकासाच्या मुद्द्यांसह नवीन ध्रुवीकरणाचे संकेत देतो. भाजपला पोषक ठरणाऱ्या वातावरणाची निर्मिती देशभर होणे शक्य असून ही आगामी उत्तर प्रदेश विधानसभा आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी रणनीती ठरवणारी नवी बाब ठरु शकते. त्यामुळे राष्ट्रीय राजकारणाची समीकरणे पूर्णपणे बदलू शकतात. तपशिलात जाऊन पाहताना लक्षात येते, की दीर्घकाळ सत्तेत राहिल्याने प्रशासकीय यंत्रणा संथ आणि संवेदनशून्य बनते. धोरणात्मक निर्णयांचा अभाव आणि भ्रष्टाचाराच्या वाढत्या तक्रारींमुळे जनतेमध्ये प्रस्थापित सरकारबद्दल टोकाचा असंतोष निर्माण होतो. बदलाची ही तीव्र इच्छा मतपेटीतून व्यक्त होते, तेव्हा त्याला प्रचंड सत्ताविरोधी लाट म्हणतात. ती प्रबळ सत्ताधाऱ्यांनाही पायउतार करण्यास कारणीभूत ठरते. भ्रष्टाचाराच्या प्रकरणामुळे सरकारची नैतिक प्रतिमा मलीन होते. बंगालमधील शिक्षक भरती घोटाळा आणि केरळमधील सुवर्ण तस्करी प्रकरणाने थेट सुशिक्षित तरुण आणि मध्यमवर्गीयाच्या विश्वासाला तडा दिला. पारदर्शकतेचा अभाव आणि सत्तेचा गैरवापर मतदारांना चिथावणी देणारा ठरतो. त्यामुळे नैतिक अधिष्ठान गमावलेले शासन बदलण्याकडे जनतेचा कल वाढतो, जे सत्तांतराचे प्रमुख निमित्त ठरते. आजचा तरुण मतदार पारंपरिक वैचारिक वादविवादांपेक्षा आर्थिक प्रगती आणि रोजगाराला प्राधान्य देतो. जुन्या राजकीय अस्मितांमध्ये अडकून न पडता तो जागतिक दर्जाच्या संधी आणि आधुनिक पायाभूत सुविधांकडे ओढ दाखवतो. प्रस्थापित सरकारे अशा आकांक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरतात, तेव्हा हा वर्ग प्रबळ व्होट बँक म्हणून सत्तांतरासाठी निर्णायक भूमिका बजावतो. निवडणुकोत्तर हिंसाचार आणि राजकीय सूडबुद्धीमुळे सामान्य नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेची भावना निर्माण होते. राज्ययंत्रणा कायदा-सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरते, तेव्हा जनतेतील सुप्त नाराजी मतदानातून बाहेर पडते. लोकशाहीत हिंसेला स्थान नसल्याचा संदेश देण्यासाठी मतदार शांतता आणि सुरक्षिततेला प्राधान्य देत सत्ता परिवर्तनाचा मार्ग निवडतात. मध्यंतरीच्या काळात देशात अनेक ठिकाणी केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण झाले. उज्वला, पीएम-किसान आणि आवास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे गरीब आणि ग्रामीण वर्गात केंद्र सरकारबद्दल विश्वासार्हता वाढली. हा कल्याणकारी राजकीय पॅटर्न प्रादेशिक अस्मितेपेक्षा अधिक प्रभावी ठरून मतदारांना सत्तांतरासाठी प्रेरित करतो. प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व कमी झाल्याने राष्ट्रीय आघाड्यांच्या नेतृत्वावरून मतभेद वाढून विरोधी ऐक्याला तडा जातो. यामुळे पूर्व आणि दक्षिण भारतात विस्तारणाऱ्या भाजपची पॅन इंडिया प्रतिमा अधिक मजबूत होत आहे. दुसरीकडे, बालेकिल्ले ढासळल्याने डाव्या विचारसरणीचे आकुंचन होऊन राजकीय पटलावर वैचारिक पोकळी निर्माण होत आहे. केंद्र आणि राज्यात एकाच विचाराची सत्ता आल्यास संघराज्य रचनेत समन्वयाचे नवे स्वरूप दिसेल, जिथे अस्मितेच्या राजकारणापेक्षा डबल इंजिन सरकारच्या विकासवादाला जनता अधिक पसंती देत असल्याचे स्पष्ट होते. पश्चिम बंगालमध्ये संघाने (आरएसएस) गेल्या अनेक वर्षांपासून सुरू ठेवलेल्या शाखा विस्तार आणि सामाजिक सेवाकार्याचा मोठा फायदा सत्ता परिवर्तनाच्या प्रक्रियेत झाला. ग्रामीण भागातील तळागाळातील संवाद आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाची पेरणी यामुळे मतदारांचे वैचारिक ध्रुवीकरण होण्यास मदत झाली. प्रचारात प्रत्यक्ष सहभाग न घेताही, संघाच्या यंत्रणेने मतदानाची टक्केवारी वाढवण्यात आणि संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यात पडद्यामागून निर्णायक भूमिका बजावली. ताज्या निकालांमुळे पक्षयंत्रणेत 'अशक्य काहीच नाही' हा आत्मविश्वास निर्माण होईल. निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये हा विजय एक सकारात्मक कथ्य (नरेटिव्ह) तयार करेल. यामुळे तळागाळातील कार्यकर्ता अधिक उत्साहाने कामाला लागेल आणि आगामी निवडणुकांसाठी पक्षाची पकड अधिक मजबूत होईल. या निकालांमुळे उत्तर प्रदेशमधील जातीय समीकरणांची पुनर्रचना होऊ शकते, जिथे ओबीसी आणि मध्यम जातींचा कल राष्ट्रीय प्रवाहाकडे झुकतो. सुशासनाचा कौल मिळाल्यास उत्तर प्रदेशमध्ये बुलडोझर मॉडेलची व्याप्ती आणि आक्रमकता अधिक वाढेल. दुसरीकडे, पराभवाच्या धास्तीने विरोधकांची रणनीती बदलून सपा-बसपा सारख्या पक्षांना अस्तित्वासाठी आघाडीचा पुनर्विचार करावा लागेल तसेच, केरळच्या पार्श्वभूमीवर धार्मिक ध्रुवीकरणाचे स्वरूप बदलून अधिक तीव्र होण्याची शक्यता निर्माण होते. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने राजकीय समीकरणांचा विचार केला असता बंगाल आणि केरळमधील सत्तापालट संसदेतील बहुमताचे गणित पूर्णपणे बदलू शकतो, कारण या दोन राज्यांमधील ६२ जागा राष्ट्रीय राजकारणात निर्णायक ठरतील. अर्थात असेच काही तामिळनाडूमध्येही घडले. मात्र, तिथे विजय यांच्या लोकप्रियतेने टिव्हीके या पक्षाची कामगिरी द्विगुणीत झाली. भाजपसाठी केरळमधील यश हे दक्षिण भारताचे प्रवेशद्वार ठरेल, ज्यामुळे तमिळनाडू आणि तेलंगणासारख्या राज्यांमध्येही राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्यासाठी नवा राजकीय महामार्ग खुला होईल. केरळ आणि पश्चिम बंगालमधील हा राजकीय बदल केवळ सत्तेचे हस्तांतरण नसून भारतीय मतदारांच्या प्रगल्भ होत असलेल्या जाणिवांचा परिपाक आहे. जुन्या वैचारिक चौकटींना छेद देत जनतेने विकास आणि स्थैर्याला दिलेली पसंती आगामी काळातील राजकारणाची दिशा स्पष्ट करते. उत्तर प्रदेशमधील आगामी रणसंग्राम असो वा २०२९ ची महालढाई, ताज्या निकालांनी सिद्ध केले की, आता केवळ प्रादेशिक अस्मिता किंवा जुन्या वैचारिक चौकटींच्या जोरावर सत्ता टिकवता येणार नाही. मतदारांचा कल राष्ट्रवाद आणि थेट विकास याकडे स्पष्टपणे झुकला असून पारंपरिक राजकारणाऐवजी निकाल देणाऱ्या राजकारणाला महत्त्व देणारा हा नवा राजकीय प्रवाह देशभर प्रस्थापित झाला आहे. प्रादेशिक अस्मितेच्या मर्यादा ओलांडून राष्ट्रवादाच्या प्रवाहात सामील होणारा हा नवा कल भारतीय लोकशाहीला अधिक स्पर्धात्मक बनवणारा ठरेल. सत्ताधाऱ्यांसाठी ही यशाची पावती आहे, तर विरोधकांसाठी आत्मचिंतनाची आणि रणनीती बदलण्याची मोठी संधी आहे.

# इंडिया आघाडीचे तीनतेरा

**भाजपच्या बलाढ्य शक्तीपुढे व कुशल रणनीतीपुढे प्रादेशिक पक्षांचा निभाव लागत नाही किंवा पक्ष फुटीची टांगती तलवार त्यांच्यावर सतत लटकत असते. भाजप विरोधकांनी एकत्र येऊन इंडिया नामक आघाडी स्थापन केली; पण आज या आघाडीचे तीनतेरा वाजले आहेत. देशात बावीस राज्यांत एनडीएची सत्ता असून भाजपचे सतरा मुख्यमंत्री आहेत.**



नुकत्याच झालेल्या विधान सभा निवडणुकीत पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ या तिन्ही राज्यांत सत्ता परिवर्तन झाले. ममता बॅनर्जी, एम. के. स्टॅलिन आणि पिनाराई विजयन या तिन्ही मुख्यमंत्र्यांना सत्तेवरून पायउतार व्हावे लागले. तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी व द्रमुकचे स्टॅलिन यांचा दारूण पराभव झाल्याने त्यांना स्वत:ला मोठा धक्का बसलाच, शिवाय त्यांच्या पक्षांचीही मोठी पीछेहाट झाली. ममता आणि स्टॅलिन हे प्रादेशिक आणि भाषिक अस्मितेचे राजकारण करीत असताना केंद्रातील भाजप सरकारला नेहमीच आक्रमकपणे विरोध करायचे. त्यांचा भाजपविरोध टोकाचा असायचा. जनतेने त्यांना सत्तेवरून हटविल्यामुळे संसदेत या दोन्ही पक्षांच्या खासदारांची भाजप विरोधी धार आता बोथट होईल.

भाजपाप्रणीत एनडीएची शक्ती वाढली की, भाजपविरोधी इंडिया आघाडीचे नुकसान होते. तामिळनाडूत जोसेफ विजय या लोकप्रिय अभिनेत्याचा टीव्हीके पक्ष सत्तेवर निवडून असला, तरी त्या पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे काँग्रेस किंवा छोट्या पक्षांवर अवलंबून राहून सरकार चालवावे लागणार आहे. त्यांच्या पक्षाने द्रमुक व अण्णा द्रमुक अशा करुणनिधी व जयलिलता यांच्या नावाने पक्ष चालविणाऱ्यांना लगाम घातला आहे. ममता यांनी राजकारण करताना बंगाली अस्मितेचे, तर स्टॅलिन यांनी तमिळ अस्मितेचे राजकारण केले. हे दोन्ही पक्ष भाजप विरोधी इंडिया आघाडीची मोठी ताकद होती. या दोन्ही पक्षांना त्यांच्या राज्यात विरोधी पक्षात बसण्याची वेळ आल्याने त्यांचे नेते राष्ट्रीय राजकारणात फारसा रस घेतील, अशी चिन्हे नाहीत. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष (आप) हा तांत्रिकदृष्ट्या राष्ट्रीय पक्ष आहे. या पक्षाचा प्रभाव दिल्ली व पंजाबपुरता मर्यादीत आहे. गुजरात व अन्य काही राज्यांत आपने बरेच हातपाय मारले; पण त्यात फारसे यश लाभले नाही. पंजाब या एकाच राज्यात आपची सत्ता आहे. दिल्लीची सत्ता भाजपने आपकडून खेचून घेतली आहे. दिल्लीत आता केजरीवाल यांचा करिष्मा राहिलेला नाही. दिल्लीची सत्ता गमविल्यानंतर वर्षभरातच आपच्या राज्यसभेतील दहापैकी सात खासदारांनी बंडाचा झेंडा फडकवून भाजपात प्रवेश केला, हा केजरीवाल याच्यासाठी मोठा धक्का होता. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया किंवा सीपीआय (एम) हे दोन्ही पक्ष तांत्रिकदृष्टया राष्ट्रीय पक्ष आहेत. केरळच्या निकालानंतर देशात कुठेही आता डाव्या आघाडीचे सरकार सत्तेवर उरलेले नाही. ज्या कम्युनिस्ट पक्षांनी पश्चिम बंगाल व केरळवर वर्षानुवर्षे सत्ता राबवली, तेथे हे पक्ष संकुचित झालेत. काँग्रेस आघाडीने केरळमध्ये डाव्या आघाडीच्या सरकारला पराभूत केले आणि देशाच्या राजकीय नकाशावरून कम्युनिस्टांचा लाल रंग फिकट झाला. बिजू पटनाईक यांचा बिजू जनता दल (बिजद) कित्येक वर्षे ओडिशामध्ये सत्तेवर होता. २०२४ मधील लोकसभा निवडणुकीत भाजपने बिजदचा पराभव केला व वडिलांच्या पुण्याईवर अनेक वर्षे मुख्यमंत्रिपदावर कब्जा करून बसलेल्या नवीन पटनाईक यांना घरी पाठवले. देशातील भाजपच्या झंझावातात हेमंत सोरेन व ओमर अब्दुल्ला हे दोन मुख्यमंत्री अनुक्रमे झारखंड व जम्मू-काश्मीर या राज्यात टिकून आहेत. सोरेन यांचा झारखंड मुक्ती मोर्चा व अब्दुल्ला पिता- पुत्रांचा नॅशनल कॉन्फरन्स हे दोन्ही पक्ष आपापल्या राज्यात भाजपच्या सुनामीपुढे तग धरून आहेत. केंद्रात भाजप सत्तेवर आल्यापासून मतदारांचा राष्ट्रीय पक्षांकडे कल वाढला आहे व प्रत्येक निवडणुकीत प्रादेशिक पक्षांचे नुकसान होत आहे. राज्यात सत्तेवर असणारे प्रादेशिक पक्ष व केंद्रात सत्तेवर असणारा राष्ट्रीय पक्ष यांचे फारसे सख्य असत नाही. केंद्र सरकार आपल्या राज्याला निधी देत नाही, केंद्र सरकार तपास यंत्रणांचा ससेमिरा स्थानिक नेत्यांच्या मागे लावते, केंद्राकडून राज्यांना सापत्न वागणूक मिळते अशा तक्रारी प्रादेशिक पक्षांकडून नेहमी ऐकायला मिळतात. केंद्रातील सत्ताधारी पक्ष प्रादेशिक पक्षांना पराभूत करून राजकीय नकाशा बदलण्याचा प्रयत्न करतात, असेही आरोप होत असतात. केंद्रात काँग्रेस सत्तेवर असताना अनेक राज्यांतील विरोधी पक्षांची सरकारे बरखास्त केल्याच्या अनेक घटना घडल्या होत्या. केंद्रात भाजप सत्तेवर आल्यापासून भाजपच्या बलाढ्य शक्तीपुढे व कुशल रणनीतीपुढे प्रादेशिक पक्षांचा निवडणुकीत निभाव लागत नाही किंवा पक्ष फुटीची टांगती तलवार सतत लटकत असते.

भाजपची बलाढ्य शक्ती व विस्तारवादी रणनीती यांना तोंड देण्यासाठी भाजपविरोधकांनी एकत्र येऊन जुलै २०२३ मध्ये 'इंडिया' नामक आघाडी स्थापन केली. बिहारची राजधानी पाटणा येथे इंडिया आघाडीच्या स्थापनेसाठी तत्कालीन मुख्यमंत्री व जनता दल युनायटेडचे प्रमुख नितीश कुमार यांनी पुढाकार घेतला होता. इंडिया आघाडी यशस्वी झाली, तर आपण पंतप्रधान होऊ शकतो अशी महत्त्वाकांक्षा नितीशकुमार यांना होती. प्रत्यक्षात हेच महायश 'इंडिया'ला सोडून काही महिन्यातच एनडीएमध्ये सामील झाले. भाजपला आव्हान देण्यासाठी इंडिया आघाडी स्थापन झाली तेव्हा काँग्रेसची राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश व कर्नाटक अशा चार राज्यांत सत्ता होती. पश्चिम बंगालमधे तृणमूल काँग्रेस, बिहारमध्ये राजद, तामिळनाडूत द्रमुक, दिल्लीत आप अशी विरोधी पक्षांची सत्ता होती. शिवाय ओडिशातून बिजद, आंध्र प्रदेशातून वायएसआर काँग्रेस, महाराष्ट्रातून उबाठा सेना हेही घटक पक्ष इंडियात होते. गेल्या दोन वर्षांत देशाचा राजकीय नकाशा कसा वेगाने बदलला, हे बारकाईने बघितले, तर प्रादेशिक पक्ष विशेषत: इंडिया आघाडीतील घटक पक्षांची दयनीय अवस्था झाली आहे, हे लक्षात येते.काँग्रेसला दरम्यानच्या काळात राजस्थान व छत्तीसगड ही राज्ये गमवावी लागली. इंडिया आघाडीतून आपने माघार घेतली. इंडिया स्थापनेच्या वेळी राजद व जनता दल (यु) एकमेकांच्या बरोबर होते आता बिहारमधे दोन्ही पक्ष एकमेकांच्या विरोधात लढत आहेत. इंडिया आघाडीची ताकद असलेले अरविंद केजरीवाल, ममता बॅनर्जी, एम. के. स्टॅलिन, तेजस्वी यादव, शरद पवार, उद्धव ठाकरे या सर्व नेत्यांची शक्ती त्यांच्या राज्यात संकुचित झाली आहे किंवा त्यांचे पक्ष कमकुवत झाले आहेत. अखिलेश यादव व त्यांचा समाजवादी पक्ष उत्तर प्रदेशात टिकून आहे; मात्र काँग्रेस व सपा यांच्यात नेहमीच सापशिडीचा खेळ चालू असल्याने इंडिया आघाडीला त्याचा लाभ होत नाही. आंध्र प्रदेशात जगन मोहन रेड्डी, तेलंगणात चंद्रशेखर राव यांचे पक्ष कुठे आहेत? पंजाबात अकाली दल, आसाममध्ये आसाम गण परिषद, कर्नाटकात जनता दल एस यांची नावेसुद्धा ऐकायला मिळत नाहीत.केंद्रात २००४ मध्ये काँग्रेसप्रणीत यूपीए सरकार स्थापन झाले. डॉ. मनमोहन सिंग दहा वर्षे पंतप्रधान होते. यूपीए ते इंडिया या प्रवासात भाजप विरोधकांच्या आघाडीला सर्वमान्य नेतृत्व कधीच मिळाले नाही. आघाडीतील घटक पक्षांचे हितसंबंध हे त्यांच्या प्रदेशात व परिवारातच गुंतलेले होते. गेल्या वर्षी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले होते, इंडिया आघाडी लाईफ सपोर्टवर आहे. गेल्या दोन वर्षांत इंडियाचे अनेक सपोर्ट गळून पडले. देशात बावीस राज्यांत भाजपप्रणीत एनडीएची सत्ता असून भाजपचे सतरा मुख्यमंत्री आहेत. आता पुढील वर्षी होणाऱ्या उत्तर प्रदेश, पंजाब, गुजरातच्या निवडणुकीची तयारी भाजपने सुरू केली आहे.

**डॉ. सुकृत खांडेकर**

# परत एकदा मराठीचा टक्का घसरला!

नुकत्याच जाहीर झालेल्या (मे २०२६) महाराष्ट्र राज्य मंडळाच्या दहावीच्या निकालानुसार मराठी विषयात अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असून, मराठीचा टक्का पुन्हा एकदा घसरला आहे.दहावीच्या परीक्षेत तब्बल ९४,५४४ विद्यार्थी मराठी विषयात नापास झाले आहेत.चिंताजनक बाब म्हणजे, ज्यांनी मराठी ही प्रथम भाषा म्हणून घेतली होती, अशा ८०,८०३ पेक्षा जास्त विद्यार्थी मराठीत उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. बारावीप्रमाणेच दहावीचा निकालही गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे २ टक्क्यांनी घसरून ९२.०९इलागला आहे.कोकण विभागाने यावर्षीही निकालात बाजी मारली आहे, मात्र मराठीतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची ही आकडेवारी गंभीर आहे.दहावीच्या निकालांमध्ये, विशेषतः मुंबई आणि वसई-विरार सारख्या भागात, मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांची संख्या आणि निकाल कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जातआहे.वसई-विरार मध्ये मराठी माध्यमाचा निकाल ९४.४६ टक्के लागला आहे, तरीही मागील वर्षांच्या तुलनेत मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या उत्तीर्ण होण्याच्या प्रमाणात घट नोंदवली गेली आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला असतानाच शालेय स्तरावर मराठी भाषेबद्दलची अनास्था समोर आली आहे.मराठी भाषेला नुकताच 'अभिजात दर्जा' मिळणे ही प्रत्येक मराठी भाषिकासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. मात्र, या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर, शालेय स्तरावर मराठी भाषेविषयीची अनास्था आणि गुणवत्तेतील घसरण ही एक खरी आणि गंभीर चिंता आहे.मराठीचा टक्का घसरण्याचे कारण म्हणजे नवीन 'कृतीपत्रिका' आराखडा, शुद्धलेखनातील चुका, वाचनाचा अभाव आणि अध्यापन पद्धतीतील कमतरता यामुळे ही स्थिती ओढवली आहे. त्याच बरोबर इंग्रजी माध्यमाच्या शाळांची वाढती संख्या आणि पालकांचा त्याकडे असलेला कल या घसरणीला कारणीभूत असल्याचे मानले जाते.

पालकांचा कल इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे अधिक आहे, कारण इंग्रजीला 'रोजगाराची भाषा' मानले जाते.मराठी भाषेला कमी लेखण्याची मानसिक वृत्ती 'मराठी बोलून काय होणार?' अशी भावना तरुण पिढीत आणि पालकांमध्ये रुजली जात आहे. अनेक खाजगी शाळांमध्ये मराठी विषय दुय्यम मानला जातो किंवा तो सक्तीचा असूनही तो शिकवण्याची पद्धत आकर्षक नसते.डिजिटल युगातील भाषेची उपेक्षा होत आहे इंटरनेट आणि सोशल मीडियावर इंग्रजीचा दबदबा असल्याने विद्यार्थी मराठी लेखनापासून दूर जात आहेत.मराठी माध्यमातील विद्यार्थीही शुद्धलेखन आणि व्याकरणाच्या चुका करत आहेत. विद्यार्थ्यांचा मराठी शब्दसंग्रह मर्यादित होत चालला आहे, ज्यामुळे त्यांना मराठीत उत्तम निबंध किंवा संवाद साधताना अडचणी येतात. पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त इतर मराठी वाङ्मय (कथा, कविता, कादंबऱ्या) वाचण्याचे प्रमाण अत्यंत कमी झाले आहे.भाषा ही संस्कृतीचे वाहक असते. मराठी भाषेचा दर्जा खालावल्यास, आपली समृद्ध संस्कृती आणि परंपरा लोप पावण्याची भीती आहे. जेव्हा आपण भाषेला 'अभिजात' म्हणतो, तेव्हा ती भाषा केवळ संग्रहालयात ठेवण्याची गोष्ट न राहता, ती रोजच्या व्यवहारात, शिक्षणात समृद्ध असणे अपेक्षित असते.भाषेला 'अभिजात' दर्जा मिळणे म्हणजे तिला केवळ प्राचीनतेचे प्रमाणपत्र मिळणे नव्हे, तर ती भाषा काळाच्या ओघातही जिवंत, प्रवाही आणि समृद्ध आहे, हे सिद्ध करणे असते.अभिजात भाषा संग्रहालयातील वस्तू नसावी. ती लोकांच्या रोजच्या व्यवहारात, संभाषणात सहज वापरली जावी.शिक्षण आणि ज्ञानभाषा असावी.ती भाषा केवळ साहित्यापुरती मर्यादित न राहता, शिक्षणाचे माध्यम आणि उच्च शिक्षणात ज्ञानाची भाषा म्हणून समृद्ध असावी केवळ जुने ग्रंथ असणे पुरेसे नाही, तर त्या भाषेमध्ये आजही दर्जेदार नवीन साहित्य, संशोधन आणि निर्मिती होणे आवश्यक आहे.आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञान, विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्या भाषेचा वापर वाढणे ही खऱ्या अर्थाने 'अभिजात' भाषेची ओळख आहे.थोडक्यात, अभिजात भाषा म्हणजे प्राचीनतेचा वारसा आणि आधुनिकतेची कास धरणारी भाषा असते. ती ज्ञानाची आणि दैनंदिन व्यवहाराची जिवंत भाषा म्हणून सक्षम असावी, हेच अपेक्षित आहे. प्राथमिक शिक्षण मराठीतून देण्यास प्रोत्साहन द्यायला पाहिजे.मराठी शाळांमधील पटसंख्या वाढवण्यासाठी प्रयत्न करायला पाहिजे. बोलताना आणि लिहिताना मराठीचे शुद्ध रूप वापरण्याचा प्रयत्न करायला पाहिजे.घर, मित्र आणि कामाच्या ठिकाणी मराठीचा जास्तीत जास्त वापर व्हायला पाहिजे.मराठी पुस्तके/वृत्तपत्रे: मराठी साहित्य, पुस्तके, आणि वृत्तपत्रे वाचण्याची सवय लावून घेण्याची गरज आहे. लावा.सोशल मीडिया फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्रामवर मराठीतून पोस्ट, कॅप्शन आणि टिप्पण्या करायला पाहिजे डिजिटल आणि तांत्रिक प्रगतीमराठी टायपिंग करायला पाहिजे. मोबाईल आणि कॉम्प्युटरवर मराठी टायपिंग शिकून त्याचा वापर वाढवा.मराठीत सर्च करणे, गुगल किंवा इतर सर्च इंजिनवर माहिती शोधताना मराठीचा वापर करणे कंटेंट निर्मिती करणे युट्यूब, ब्लॉग किंवा पॉडकास्टच्या माध्यमातून मराठीत दर्जेदार आशय तयार केल्याने मराठीचा टक्का वाढण्यास मदत होईल.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल,** वर्धा
९५६१५९४३०६

## देशातील वाढते रस्ते, अपघात चिंताजनक

देशभरातील महामार्गाचा दर्जा सुधारला असला तरी वाहनचालकांच्या बेपर्वाईमध्ये मुळीच बदल होताना दिसत नाही. परिणामी वारंवार मोठमोठे अपघात घडत आहेत. यामध्ये अनेकांचे बळी चालले आहेत. अलीकडेच महाराष्ट्र राज्यात घडलेल्या रस्ते अपघातांमध्ये कुटुंबाच्या कुटुंबे मृत्युमुखी पडत आहेत. वाढत्या अपघातांना वाहतूक विभागाचे दुर्लक्ष देखील तितकेच कारणीभूत ठरते. लाचखोर वाहतूक पोलीस आणि अधिकारी, कर्मचाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची गरज आहे.केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने अलीकडेच प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार २०२३ मध्ये देशभरात ४.८ लाखांहून अधिक रस्ते अपघात घडले आहेत. त्यात जवळपास १.७२ लाख लोक मृत्युमुखी पडले आणि ४.६२ लाख जखमी झाले आहेत. रस्ते अपघात मृत्युमुखी पडलेल्यांपैकी ६८ टक्के पादचारी आणि दुचाकीस्वारांचे प्रमाण होते. कुटुंबांचा उदरनिर्वाह चालवण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर होती. महामार्गावर गस्त घालणाऱ्या वाहतूक पोलिसांकडून चिरीमिरी घेतली जाऊनशा बेकायदेशीर बाबींना पाठीशी घातले जाते. अपघातांना कारणीभूत ठरणाऱ्या निकृष्ट रस्त्यांची निर्मिती करणाऱ्यांवरही वेळीच कडक कारवाई करण्याची काळजी घेतली पाहिजे. अपघात रोखण्यासाठी अशाच उपायांची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**
९४२०५६६४०४

# पश्चिम बंगालच्या परिवर्तनाचा चेहराः शुभेंदु अधिकारी




पश्चिम बंगालचे राजकारण आज एका ऐतिहासिक वळणावर उभे आहे. एकेकाळी जे राज्य देशाचे औद्योगिक आणि वैचारिक नेतृत्व करत होते, तेच राज्य आज वाढती बेरोजगारी, राजकीय हिंसाचार आणि विकासाच्या संथ गतीमुळे चिंतेचा विषय बनले आहे. अशा परिस्थितीत बंगालला केवळ एका राजकीय पक्षाची सत्ता नको होती, तर एका खंबीर 'प्रशासक-नेत्याची' नितांत गरज होती. भारतीय जनता पक्षाच्या फळीतील शुभेंदु अधिकारी हे नाव या सर्व निकषांवर सर्वात योग्य ठरले असून, त्यांची मुख्यमंत्री पदासाठी झालेली निवड ही याच विश्वासाचे प्रतीक आहे.

राजकारणात जेव्हा एखादा नेता अविवाहित राहून स्वतःला पूर्णपणे समाजकार्यासाठी झोकून देतो, तेव्हा त्याचे प्राधान्य केवळ आणि केवळ जनसेवा हेच असते. शुभेंदु अधिकारी यांच्याकडे पाहताना हे प्रकर्षाने जाणवते. कौटुंबिक मोहपाशाचा कोणताही अडसर नसल्यामुळे ते २४ तास राज्याच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ शकतात. बंगालसारख्या जटिल राज्याला आज अशाच पूर्णवेळ समर्पित नेतृत्वाची गरज होती, जो जनतेच्या प्रश्नांसाठी सदैव उपलब्ध असेल.शुभेंदु अधिकारी यांचे सर्वात मोठे बलस्थान म्हणजे त्यांचा प्रदीर्घ प्रशासकीय अनुभव आणि तृणमूल काँग्रेसच्या कार्यपद्धतीची त्यांना असलेली अचूक माहिती. राजकीय मैदानात प्रतिस्पर्ध्याची रणनीती आणि त्यांच्या संघटनात्मक रचनेची खडानखडा माहिती असलेला नेताच प्रभावी बदल घडवू शकतो. नंदीग्राम तसेच भवानीपूर यांसारख्या महत्त्वाच्या मतदारसंघांत त्यांनी दाखवलेली चुणूक हे त्यांच्या रणनीतीचे आणि जमिनीवरील पकडीचे एक जिवंत उदाहरण आहे.एकेकाळी औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर असणारा हा प्रदेश आज विकासाच्या शर्यतीत कोसो मैल दूर आहे. देशातील आघाडीचे उद्योगपती बिर्ला घराणे मूळचे कोलकाता येथील असूनही त्यांचा एकही मोठा उद्योग आज राज्यात सक्रिय नाही. पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील सिंगूर येथे टाटा समूहाच्या नॅनो कार कारखान्यासाठी करण्यात आलेल्या भूसंपादनाला प्रचंड विरोध झाला आणि २००८ मध्ये तो प्रकल्प बंद करण्यात आला. २००६ मध्ये तत्कालीन डाव्या आघाडी सरकारने (बुद्धदेव भट्टाचार्य यांच्या नेतृत्वाखाली) सुमारे १००० एकर सुपीक जमीन अधिग्रहित केली होती, ज्याला स्थानिक शेतकरी आणि ममता बॅनर्जी यांनी तीव्र विरोध केला होता. अशा कटू अनुभवांमुळे आज नवे उद्योग येण्यास धजावत नाहीत.

केंद्रातील सत्ता आणि राज्यातील सक्षम नेतृत्व यांचा मेळ बसल्यास 'डबल इंजिन' सरकारचा वेग राज्याला औद्योगिक प्रगतीपथावर नेण्यास निश्चितच मदत करेल. आज बंगालमधील सुशिक्षित आणि कष्टकरी तरुण रोजगारासाठी इतर राज्यांकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करत आहेत. हे 'पलायन' थांबवणे हे राज्यासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. शुभेंदु अधिकारी यांच्यासारखा नेता, ज्याला जमिनीवरील प्रश्नांची आणि स्थानिक अर्थव्यवस्थेची जाण आहे, तोच उद्योगांना पोषक वातावरण निर्माण करून हे चित्र बदलू शकतो. मुख्य म्हणजे केंद्राचा शुभेंदु अधिकारी यांच्यावर असलेला विश्वास ही राज्यासाठी मोठी जमेची बाजू आहे, ज्यामुळे केंद्र सरकारच्या जनकल्याणकारी योजना थेट तळागाळातील गरिबांपर्यंत पोहोचतील.थोडक्यात सांगायचे तर, पश्चिम बंगालला आज केवळ आश्वासनांची नव्हे, तर 'कृती'ची गरज आहे. शुभेंदु अधिकारी यांच्या रूपाने राज्याला एक असा लोकनेता मिळाला आहे, ज्याच्याकडे प्रशासकीय शिस्त आणि सर्वसामान्यांच्या वेदनांची जाण आहे. बंगालची गमावलेली प्रतिष्ठा परत मिळवून देणे आणि 'सोनार बांगला'चे स्वप्न सत्यात उतरवणे, ही आता केवळ राजकीय घोषणा न राहता एक ध्येय बनले आहे. विकासाचा हा नवा मार्ग बंगालला पुन्हा एकदा देशाच्या प्रगतीचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज करेल, यात शंका नाही. हे केवळ सत्तांतर नसून, बंगालच्या पुनर्वैभवाचा शंखनाद आहे.

**अविनाश देशपांडे**

भारत का राजपत्र
The Gazette of India
सत्यमेव जयते
असाधारण
EXTRAORDINARY
भाग II-खण्ड ३ - उप-खण्ड (ii)
PART II-Section 3 - Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 1800] नई दिल्ली, सोमवार, अप्रैल १३, २०२६ / चैत्र २३, १९४८
No. 1800] NEW DELHI, MONDAY, APRIL 13, 2026 / CHAITRA 23, 1948

## सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय

## अधिसूचना

नई दिल्ली, १३ अप्रैल, २०२६

का.आ. १८६९ (अ).— केन्द्रीय सरकार ने, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम, १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३क की उपधारा (१) के आधीन जारी की गई भारत सरकार के, सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय, सड़क परिवहन और राजमार्ग विभाग की अधिसूचना संख्या का. आ. ३२९ (अ) तारीख २१ जानेवारी २०२६ और का. आ. ७९९ (अ) तारीख १६ फरवरी २०२६को भारत के राजपत्र, असाधारण, भाग-२, खंड ३, उपखण्ड (ii), में प्रकाशित की गई थी, द्वारा महाराष्ट्र राज्य के अकोला जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ए के कि.मी. २/०० से कि.मी. ३/१०० ( महान - अकोला भाग) तक के भूखंड सेक्शन का बार्शीटाकली बायपास चार लेन पेव्ह शोल्डर के निर्माण, अनुरक्षण, प्रवन्ध और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए उस अधिसूचना से उपाबध्द अनुसूची में विर्निदिष्ट भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा की थी;

और उक्त अधिसूचना का सार उक्त अधिनियम की धारा ३ क की उपधारा (३) के अधीन का.आ. ३२२ (अ) तारीख २१ जानेवारी २०२६ में 'सिटी न्युज सुपरफास्ट' और 'सायरन' दोनो तारीख ०५/०२/२०२६ में प्रकाशित किया गया था. और का.आ. ७९९(अ) तारीख १६ फरवरी २०२६ में 'सिटी न्युज सुपरफास्ट' और 'सायरन' दोनो तारीख २७/०२/२०२६ में प्रकाशित किया गया था ;

जबकी सक्षम प्राधिकारी को धारा ३ ग के तहत दायर आपत्ती प्राप्त हुई है, जिस पर विचार किया गया है और उसका उचित रूप से निपटान किया गया;

और सक्षम प्राधिकारी ने उक्त अधिनियम की धारा ३ घ की उपधारा (१) के अनुसरण में, केन्द्रीय सरकार को अपनी रिपोर्ट दे दी है;

अतः अब, केन्द्रीय सरकार, सक्षम प्राधिकारी की उक्त रिपोर्ट प्राप्त हो जाने पर और उक्त अधिनियम की धारा ३ घ की उपधारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए यह घोषणा करती है कि उक्त अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि का पूर्वोक्त प्रयोजन के लिए अर्जन किया जाना चाहिए;

और अब केन्द्रीय सरकार, उक्त अधिनियम की धारा ३ घ की उपधारा (२) के अनुसरण में, यह घोषणा करता है. कि इस अधिसूचना के राजपत्र में प्रकाशन पर उक्त अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि, सभी विल्लंगमों से मुक्त हो कर आत्यन्तिक रूप से केन्द्रीय सरकार में निहित हो जाएगी।

### अनुसूची

महाराष्ट्र राज्य के अकोला जिले मे राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ए केकि.मी. ०/०० से कि.मी. ३/१०० (महान- अकोला भाग) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण.

| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल ( हेक्टेयर में) | भूस्वामी/ हितबद्ध व्यक्तियों का नाम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **तालुक का नामः बार्शीटाकळी** | | | | | |
| **गांव का नामः अश्कारीपुर** | | | | | |
| १ | ३६/अ/३७/अ/२ | निजी | अकृषक | ०.००४४ | अर्चना गोपाल वक्टे, कोमल गोपाल वक्टे, ऋतुजा गोपाल वक्टे, तनुश्री गोपाल वक्टे, अपाक आई अर्चना वक्टे 36/A/37/A/2 |
| २ | ३६/अ/३७/अ/२ | निजी | अकृषक | ०.००४२ | जनार्दन सुकदेव चव्हाण 36/A/37/A/2 |
| ३ | ३६/अ/३७/अ/२ | निजी | अकृषक | ०.००९६ | मोहम्मद शकील मोहम्मद अनिस, सय्यद अबरार सैय्यद मोबीन, मोहम्मद एलियास मोहम्मद आरीफ 36/A/37/A/3 |
| ४ | ३७ पैकी | निजी | अकृषक | | विठ्ठल संस्थान 37 Paiki |
| ५ | ३७ पैकी | निजी | अकृषक | | मधुकर रंगलाल पवार 37 Paiki |
| ६ | ३७ पैकी | निजी | अकृषक | | बेबी कृष्णा राठोड ३७ Paiki |
| ७ | ३७ पैकी | निजी | अकृषक | | संगीता आनंद चव्हाण ३७ Paiki |
| ८ | ३७ पैकी | निजी | अकृषक | | वंदना मोहन जाधव 37 Paiki |
| ९ | ३७ पैकी | निजी | अकृषक | | शेख उस्मान शेख इस्माईल 37 Paiki |
| **गांव का नामः बार्शिटाकळी** | | | | | |
| १० | १०१/२अ | निजी | अकृषक | ०.०९ | अहेमदखान अलियारखान प्रो. प्राइकराजिनिंग फॅक्टरी, बार्शीटाकळी 101/2A |
| ११ | १०२/२ब | निजी | अकृषक | ०.१६ | फरहान खान रहीम खान भावेश आशीफ शेख आतिक, सुनीलकुमार विश्वेशर दयाल, सैय्यद नफीस सैय्यद हफिज, अनुज सुभाष चौधरी, नदीम जावेद खान सलाम खान मे. श्रीकोटेक्स भागीदार सैय्यद ग्यासोद्दीन सैय्यद रफीयोद्दीन 102/2B |
| १२ | १०२/३ | सरकारी | कृषक | ०.१२ | केन्द्रीय शासन रेल्वे १०२/३ |
| १३ | १०३/२ | निजी | कृषक | ०.०२ | मो. शोएब अ. सादीक १०३/२ |
| १४ | १०४ | निजी | अकृषक | ०.००३१ | मो. सादिल मो. रफ़िक़ १०४/३ |
| १५ | १०४ | निजी | अकृषक | ०.०२ | अली अहमद खान अली १०४/३ |
| १६ | १०९/१ | निजी | कृषक | ०४ | प्रविणकुमार वामनसा बुलबुले, माला दीपक बुलबुले, रविकुमार दीपक बुलबुले, स्नेहा दीपक बुलबुले, पूजा वैभव येळणे, निर्मलाबाई वामनसा बुलबुले १०९/१ |
| १७ | १०९/१अ | निजी | कृषक | ०४ | प्रविणकुमार वामनसा बुलबुले 109/1A |
| १८ | १०९/२ | निजी | कृषक | ०.१४ | संतोष महादेव पिंजरकर व प्रशांत राजु पिंजरकर एकत्रित १०९/२ |
| १९ | १९४/१ | निजी | कृषक | ०.४२ | अकोली बेस मस्जिद संस्थान २९४/१ |
| २० | २९५/१पै | निजी | अकृषक | ०.०१९७ | कमरुज्जा बदिउजमा 295/1 Pai |
| २१ | २९५/१/१अ | निजी | अकृषक | ०.०१६०१५ | महंमद इसाक महंमद युनुस 295/1/1A |
| २२ | २९५/१/१/४ अ | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | महंमद इसाक महंमद युनुस 295/1/1/4A |
| २३ | २९५/१/१० अ | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | शहेजादअली खान असद अली खान, शेख नायरोद्दीन शेख अली मोद्दीन 295/1/10A |
| २४ | २९५/१/१० ब | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | शहेजादअली खान असदअली खान, शेख नायरोद्दीन शेख अलीमोद्दीन 295/1/10 B |
| २५ | २९५/१/२अ | निजी | अकृषक | ०.०१२७३२ | महंमद इसाक गहंमद युनुस 295/1/2A |
| २६ | २९५/१/२७ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिद खान इस्माईल खान २९५/१/२७ |
| २७ | २९५/१/२८ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/२८ |
| २८ | २९५/१/२९ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/२९ |
| २९ | २९५/१/३० | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/३० |
| ३० | २९५/१/३१ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/३१ |
| ३१ | २९५/१/३२ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/३२ |
| ३२ | २९५/१/३३ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/३३ |
| ३३ | २९५/१/३४ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिद खान इस्माईल खान २९५/१/३४ |
| ३४ | २९५/१/३५ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/३५ |
| ३५ | २९५/१/३६ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/३६ |
| ३६ | २९५/१/३७ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/३७ |
| ३७ | २९५/१/३८ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/३८ |
| ३८ | २९५/१/३९ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/३९ |
| ३९ | २९५/१/३अ | निजी | अकृषक | ०.०१३७९२ | महंमद इसाक महंमद युनुस 295/1/3A |
| ४० | २९५/१/४ | निजी | अकृषक | ०.००५५६६ | शाहिद खान इस्माईल खान २९५/१/४ |
| ४१ | २९५/१/४० | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/४० |
| ४२ | २९५/१/४१ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/४१ |
| ४३ | २९५/१/४२ | निजी | अकृषक | ०.००५३७५ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/४२ |
| ४४ | २९५/१/४३ | निजी | अकृषक | ०.००५१ | श्रीकांत रमेश चौधरी २९५/१/४३ |
| ४५ | २९५/१/४४ | निजी | अकृषक | ०.००५ | नवलकिशोर दिनकरराव आखरे २९५/१/४४ |
| ४६ | २९५/१/४५ | निजी | अकृषक | ०.००५ | नवलकिशोर दिनकरराव आखरे २९५/१/४५ |
| ४७ | २९५/१/४६ | निजी | अकृषक | ०.००५ | सुधिर गुणवंतराव वनवे २९५/१/४६ |
| ४८ | २९५/१/४७ | निजी | अकृषक | ०.००५५६६ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/४७ |
| ४९ | २९५/१/४ब | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | महंमद इसाक महंमद युनुस 295/1/4B |
| ५० | २९५/१/५ | निजी | अकृषक | ०.००५५६६ | शाहिदखान इस्माईल खान २९५/१/५ |
| ५१ | २९५/१/५ अ | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | मुजब्बीर रहेमान गुलशेर खान 295/1/5A |
| ५२ | २९५/१/५ ब | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | मुजब्बीर रहमान गुलशेर खान 295/1/5B |
| ५३ | २९५/१/६ अ | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | सै. अशिक सै. रशिक 295/1/6A |
| ५४ | २९५/१/६ ब | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | महंमद सलिम महंमद, कदीर सै. आशिक सै. रशिक 295/1/6B |
| ५५ | २९५/१/७/अ | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | सै. आशिक सै. रर्शिक 295/1/7A |
| ५६ | २९५/१/७ब | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | सै. आशिक सै. रशिक 295/1/7B |
| ५७ | २९५/१/८ अ | निजी | अकृषक | ०.००९८५१ | मो. सलिम अब्दुल कलीम 295/1/8A |
| ५८ | २९५/१/९ अ | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | कमरुज्जा बदिउजमा, काजिम खान कासम खान 295/1/9A |
| ५९ | २९५/१/९ ब | निजी | अकृषक | ०.०१४७७७ | जबिउल्ला खान जमीर खान 295/1/9B |
| ६० | २९५/५ | निजी | कृषक | ०.२४ | मो. सलीम अब्दुल कदिर, सै. रागीव सै. चांद सै. आशिक मै. राशीद २९५/५ |
| ६१ | ३०२/१ | निजी | कृषक | ०.४२ | मो. सलीम अब्दुल कदिर, सै. रागीव सै. चांद, सै. आशिक सै. राशीद ३०२/१ |
| ६२ | ३१८ | सरकारी | कृषक | ०.१८६७ | केंद्रीय शासन रेल्वे ३१८ |
| ६३ | ३१९ | सरकारी | कृषक | ०.४३३४ | ई - क्लास विकास कार्यालय ३१९ |
| ६४ | ४० / १ | निजी | कृषक | ०.०४ | रेखा गजानन सप्रे / राहुल गजानन सप्रे / पूजा वैभव मुनी/ माधुरी गजानन सप्रे ४०/१ |
| ६५ | ४०/१ | निजी | कृषक | ०.०१ | सुबोध जमनलाल गोयंका ४०/१ |
| ६६ | ४०/१ | निजी | कृषक | ०.०४ | मो. राजीक मो. इसाक ४०/१ |
| ६७ | ४०/१ | निजी | अकृषक | ०.०७ | मो. राजीक मो. इसाक ४०/१ |
| ६८ | ४०/१ अ | निजी | कृषक | ०.०९ | मयुरी नवनीश अग्रवाल/ श्वेता नीरज 40/1A |

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## वेचक

### 'महाराष्ट्र साई पद्मश्री' पुरस्काराने शायर बेताब सन्मानित



यवतमाळ : सामाजिक कार्य व शायरी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल यवतमाळचे प्रसिद्ध शायर शायर बेताब यांना शिर्डी येथे आयोजित 'महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने परिवार लॉन्स, न्यू रिंग रोड सिटी मार्केट परिसरात हा भव्य पुरस्कार सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैशाली माधवराव सोनवणे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून सुरज किशोर कालडा, प्रा. डॉ. सुरेशकुमार गुडदे, प्रा. डॉ. जितेंद्र पाटील, दिलीप वाघ, नृत्यांगना अनुश्री खांडेकर तसेच ॲड. इक्बाल खान उपस्थित होते. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक सुदाम क. संसारे यांनी संपूर्ण सोहळ्याचे नियोजन केले होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर शायर बेताब यांनी आपल्या खास अंदाजातील शायरीतून आयोजक सुदाम संसारे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या प्रभावी सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. यावेळी मंचावरील मान्यवरांनी शायर बेताब यांना "धुरंधर शायर" अशी गौरवपूर्ण उपाधी दिली. या सोहळ्यात राज्यातील विविध क्षेत्रातील २७५ मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. तसेच यवतमाळ ही कलावंतांची भूमी असल्याचे गौरवोद्गारही यावेळी काढण्यात आले.



### माथार्जून येथे महाराजस्व शिबिरात विविध दाखले वाटप

झरीजामणी : तालुक्यातील माथार्जून येथे ८ में रोजी "छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर" उत्साहात पार पडले. शासकीय आश्रम शाळा, माथार्जून येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आला. या शिबिरात उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, फार्मर आयडी, आयुष्मान भारत कार्ड, रेशन कार्ड, निराधार योजना, जन्म-मृत्यू दाखले, मतदान कार्ड दुरुस्ती, नवीन मतदान कार्ड, पीएम किसान योजना तसेच आधार कार्ड अपडेट आदी विविध सेवा देण्यात आल्या.शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक नागरिकांनी विविध दाखले व योजनांचा लाभ घेत प्रशासनाच्या या उपक्रमाचे स्वागत केले. या उपक्रमामुळे नागरिकांची शासकीय कार्यालयांमध्ये होणारी धावपळ कमी झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. माथार्जून येथील "छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर" यशस्वीरित्या पार पडल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### बोपापूर (बाळापूर) चे ग्रामपंचायत अधिकारी आठ महिन्यापासून गायब

झरी : तालुक्यातील बोपापूर (बाळापूर) येथील गट ग्रामपंचायतमधील ग्रामपंचायत अधिकारी गेल्या आठ महिन्यापासून ग्रामपंचायतला हजरच न झाल्याने ग्रामस्थांत प्रचंड संताप आहे. ग्रामपंचायत अधिकारी गावात येत नसल्याने गावाचा विकास खुंटला असून गावातील जनतेला विविध दाखले व कागदपत्रासाठी भटकावे लागत आहे. याबाबत ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांसह मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार दिली आहे. ग्रामपंचायत अधिकारी किशोर मोघे यांनी कार्यालयाचा पदभार स्वीकारला तेव्हापासून कार्यालयात कधीच हजर झाले नसल्याने ग्रामवासींना शासनाच्या योजना पासून वंचित राहावे लागत असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. ग्रामस्थांनी विविध दाखल्यांवर स्वाक्षरी घेण्यासाठी अधिकाऱ्यांच्या गावी जावे लागते. संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्याचे कार्यालय त्यांच्या गावी झाले आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना या संपूर्ण अडचणीचा सामना करावा लागत आहे. याबाबतीत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना वारंवार तक्रार करून कोणत्याही प्रकारची दखल घेण्यात आली नाही. कार्यालयात गैरहजर राहूनही वेतन पूर्ण मिळत असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. याप्रकरणाची संपूर्ण चौकशी करून संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर तत्काळ कारवाई करण्यात यावी.

# ९ वर्षीय अन्वीचे दफन केलेले शव पुन्हा बाहेर काढून शवविच्छेदन

## मानवाधिकार संघटनेच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाची मोठी कारवाई, पोलिस बंदोबस्त, व्हिडिओ चित्रीकरणात बुलडोझरने उत्खनन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : नेर तालुक्यातील आजंती येथील पारधी बेड्यावर मृत्यू झालेल्या ९ वर्षीय अन्वी अनाडी भोसले हिच्या प्रकरणात अखेर प्रशासनाला पावले उचलावी लागली. शवविच्छेदन न करता करण्यात आलेल्या दफन विधीनंतर निर्माण झालेल्या तीव्र संताप, मानवाधिकार संघटनांच्या मागण्या आणि प्रसारमाध्यमांनी लावून धरलेल्या मुद्द्याची दखल घेत प्रशासनाने दिनांक ९ मे रोजी सकाळी मोठ्या शासकीय देखरेखीखाली दफन केलेले शव पुन्हा बाहेर काढून शवविच्छेदन केले.

विशेष म्हणजे, ही मागणी कोणत्याही शासकीय यंत्रणेची किंवा कुटुंबीयांची नव्हती; तर आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशन, नवी दिल्ली (यवतमाळ शाखा) यांच्या वतीने सातत्याने लावून धरली जात होती. संघटनेने या प्रकरणात शवविच्छेदनाची ठाम मागणी करत प्रशासनाला निवेदन दिले होते. त्यानंतर प्रसार माध्यमांमधूनही हा मुद्दा ठळकपणे समोर आल्यानंतर अखेर प्रशासनाला कारवाई करावी लागल्याची चर्चा जिल्हाभर रंगली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी पोलिसांचा मोठा फौजफाटा, महसूल विभाग, आरोग्य विभाग व संबंधित अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. संपूर्ण प्रक्रिया



व्हिडिओ चित्रीकरणाच्या देखरेखीखाली पार पडली. बुलडोझर व मानवीय सहाय्याने दफन केलेले शव बाहेर काढण्यात आले. त्यानंतर गावकरी, नातेवाईक आणि अन्वीच्या वडिलांच्या उपस्थितीत घटनास्थळीच शवविच्छेदनाची प्रक्रिया करण्यात आली.

या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून, आता शवविच्छेदन अहवालात नेमके काय समोर येणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अन्वीचा मृत्यू उष्माघातामुळे झाला की अन्य कोणत्या कारणामुळे, याचा खुलासा पीएम अहवालातून होण्याची शक्यता

### मानवाधिकार संघटनेच्या मागणीला प्रतिसाद

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशन, नवी दिल्ली (यवतमाळ शाखा) यांनी अन्वी च्या मृत्यूची सखोल चौकशी व शवविच्छेदनाची मागणी करत उच्चस्तरीय समिती कडे निवेदन दिले होते. तसेच दफन केलेला मृतदेह पुन्हा बाहेर काढून पोस्टमार्टम करण्याची मागणी ठामपणे मांडली होती. या मागणीची गंभीर दखल घेत प्रशासनाने अखेर कारवाई केली. त्यामुळे संघटनेच्या पाठपुराव्याला मोठे यश मानले जात असून, आता पुढे पीएम अहवालातून सत्य समोर येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. एका निष्पाप बालिकेच्या मृत्यूचे सत्य दडपले जाऊ नये, हीच आमची भूमिका होती. अशी प्रतिक्रिया जिल्हा अध्यक्ष विवेक वानखडे व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सुरुवातीला शवविच्छेदन न करता अंत्यसंस्कार कसे करण्यात आले? संबंधित यंत्रणांनी तातडीने कारवाई का केली नाही? अशा अनेक प्रश्नांवर आता प्रशासनाला उत्तर द्यावे लागणार आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे ग्रामीण भागातील पारधी समाजाच्या मूलभूत प्रश्नांकडेही पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे.

## अवधूतवाडी पोलिसांची एनडीपीएस अंतर्गत धडक कारवाई, २ किलोहून अधिक गांजा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : शहर व परिसरात गांजा सेवन तसेच अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यात तरुण पिढी अडकत असल्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यात अमली पदार्थांची विक्री, वाहतूक व सेवन करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार मा. अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या मार्गदर्शनाखाली अवधूतवाडी पोलीस स्टेशनने एनडीपीएस कायद्यांतर्गत धडक कारवाई केली.

पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून अवधूतवाडी पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील हिस्ट्रीशीटर आरोपी राजू बाबूलाल कनोजे, रा. आंबा नगर याच्याकडून १२४ ग्रॅम गांजा जप्त केला. तसेच बाबू उर्फ केशव महादेवराव शिरभाते व वसंता गुलाबराव भिसे, दोघेही रा. माथा कळंब, यांच्याकडून सुमारे २ किलो ६०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून तिन्ही आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदमवार, पोलीस उपनिरीक्षक सुरज जगताप, पोलीस हवालदार सुरेश मेश्राम, विशाल भगत, बलराम शुक्ला, मोहम्मद भगत, वाले, भुसारी, गजानन दूधकोहळे, राज कांबळे, योगेश चोपडे, सचिन राठोड तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : भरधाव जाणाऱ्या एका अज्ञात वाहनाने पादचाऱ्याला जोरदार धडक दिला. यात त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना तालुक्यातील गुंज येथे माहूर रोडवरील पेट्रोल पंपासमोर घडली. विठ्ठल थोरात (४५) रा. इसापूर ता. पुसद असे मृतकाचे नाव आहे. ते गुंज येथे वीज वितरण कंपनीच्या टॉवर उभारणीच्या कामावर मजुरी करण्यासाठी आले होते. शुक्रवारी सायंकाळी गुंज बसस्थानक परिसरातून किराणा सामान घेऊन परत कामाच्या ठिकाणी जात होते. दरम्यान, माहूर रोडवरील पेट्रोल पंपासमोर पुसदकडून भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनाने त्यांना जबर धडक दिली. मृत विठ्ठल थोरात यांच्या पश्चात पत्नी व तीन मुले असा परिवार असून, त्यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अपघात करणाऱ्या वाहनाचा पोलीस शोध घेत आहे.

## यवतमाळच्या सिग्नलवर आता 'थंडगार छाया'

### शहर व वाहतूक पोलिसांचा पुढाकार, ग्रीन नेटमुळे वाहनधारकांना उन्हापासून संरक्षण

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : राज्यभरात उष्णतेची तीव्र लाट कायम असताना यवतमाळ शहरातील तापमानानेही ४३ ते ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला आहे. प्रखर उन्हामुळे नागरिकांचे जनजीवन त्रस्त झाले असून विशेषतः शहरातील सिग्नल चौकांमध्ये थांबणाऱ्या दुचाकी वाहनधारकांना उष्म्याचा मोठा फटका सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर यवतमाळ शहर पोलिसांनी पुढाकार घेत शहरातील प्रमुख सिग्नल चौकांवर ग्रीन नेट लावण्याचा अभिनव आणि दिलासादायक उपक्रम हाती घेतला आहे.

वाहतुकीच्या सिग्नलवर लाल दिवा लागल्यानंतर अनेक वाहनधारकांना काही मिनिटे उन्हातच थांबावे लागते. अंगावर कोसळणारे तापते ऊन, सिमेंट रस्त्याची वाढलेली उष्णता आणि उकाड्यामुळे नागरिक अक्षरशः हैराण होत होते. याच समस्येची दखल घेत शहर पोलिसांनी "थंडगार छाया" देण्याचा निर्णय घेतला. शनिवारी सायंकाळी एलआयसी चौक एसपी कार्यालयासमोरील सिग्नल परिसरात ग्रीन नेट बसविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते. काम सुरळीत



पार पडावे यासाठी काही काळ एका बाजूची वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. पोलिस कर्मचारी आणि वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कामावर लक्ष ठेवले. विशेष म्हणजे, प्रखर उन्हात नागरिकांसोबत वाहतूक पोलिसांनाही दीर्घकाळ ड्युटी बजावताना त्रास सहन करावा लागत होता. याबाबत स्थानिक वृत्तपत्रांनी वेळोवेळी प्रश्न उपस्थित केले होते. तसेच काही सामाजिक कार्यकर्त्यांनी सिग्नलची वेळ कमी करण्याची मागणीही केली होती. या सर्व बाबींचा विचार करून पोलिस प्रशासनाने हा उपक्रम राबविला आहे. यंदा हा उपक्रम सुरू होण्यास थोडा विलंब झाला असला तरी पुढील वर्षापासून मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच सर्व प्रमुख चौकांमध्ये ग्रीन नेट लावण्यात येणार असल्याची माहिती पोलिस विभागाच्या वतीने देण्यात आली. या उपक्रमासाठी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांनी विशेष पुढाकार घेतला असून वाहतूक शाखेचे निरीक्षक सिंघम म्हणून ओळखले जाणारे ज्ञानोबा देवकते व पोलिस कर्मचाऱ्यांनीही मोलाचे सहकार्य केले. नागरिकांच्या दैनंदिन प्रवासात थोडासा गारवा आणि दिलासा देणारा हा उपक्रम सध्या शहरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

## कचऱ्याच्या ढिगाऱ्यावरून उभं राहिलं क्रीडा नंदनवन !

### दारव्ह्यात विकासाला संजय राठोड यांची गती"

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - एखाद्या लोकप्रतिनिधीने मनावर घेतलं, जनतेसाठी काम करण्याचा ध्यास घेतला आणि विकासाला दूरदृष्टीची जोड दिली, तर अशक्य वाटणारं चित्रही वास्तवात उतरू शकतं, याचं जिवंत उदाहरण म्हणजे आजचं दारव्हा शहर ठरत आहे.

जिथे एकेकाळी कचऱ्याचे ढीग आणि दुर्गंधी होती, त्या जागेवर आज अत्याधुनिक क्रीडा संकुल उभं राहत आहे. पूर्वी लोक टाळत असलेला परिसर आता तरुणांच्या स्वप्नांचा आणि खेळाडूंच्या घामाचा साक्षीदार बनणार आहे. हा केवळ जागेचा बदल नाही, तर विकासाच्या विचाराचा विजय मानला जात आहे. दारव्हा शहरात गेल्या काही वर्षांत झालेली विकासकामे ही फक्त सिमेंट आणि लोखंडाची बांधकामं नसून, ती सामान्य माणसांच्या आयुष्यात घडलेला सकारात्मक बदल असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. पालकमंत्री मा. ना. संजय राठोड



यांच्या पुढाकारातून शहरात विविध विकासकामांना गती मिळाली. गोळीबार चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा आज दारव्ह्याच्या स्वाभिमानाची ओळख बनला आहे. वन उद्यानामुळे शहराला हिरवाईची नवी ओळख मिळाली असून, मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांसाठी ते आकर्षणाचं केंद्र ठरत आहे. स्व.बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. अद्यावत अभ्यासिकेमुळे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी नवी दिशा मिळत असून, अनेक युवक शासकीय सेवेत पोहोचल्याने या उपक्रमाचे परिणामही दिसून येत आहेत.

याशिवाय अत्याधुनिक पोलीस स्टेशन, नवीन बसस्थानक, तहसील कार्यालय, व्यापारी संकुल, नाट्यगृह, डिजिटल शाळा, व्यायामशाळा, सभागृह, न्यायालयाची इमारत, आयटीआय विकास, पूल आणि रस्त्यांची कामे अशा विविध प्रकल्पांमुळे दारव्ह्याचा चेहरामोहरा झपाट्याने बदलताना दिसत आहे. धामणगाव देव येथील भक्त निवास तसेच देऊळगाव वळसा येथील महालक्ष्मी मंदिर परिसरातील सुविधा यामुळे धार्मिक पर्यटनालाही चालना मिळत आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाची वाटचाल करण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र शहरात पाहायला मिळत आहे. आज दारव्हा हे केवळ तालुक्याचं शहर राहिलेलं नाही, तर विकास, विश्वास आणि नव्या स्वप्नांचं प्रतीक बनत चाललं आहे. अजूनही अनेक स्वप्नं पूर्ण व्हायची आहेत, अनेक कामं बाकी आहेत; मात्र दिशा योग्य असून जनतेचा विश्वास कायम असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## चिंतेची बाब ! ढाणकीत भरवस्तीत रंगली होती गांजाची मैफल

### पाच जण पोलिसांच्या जाळ्यात तरुण पिढी अमली पदार्थांच्या विळख्यात ? पोलिसांच्या मोठ्या कारवाईने खळबळ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

ढाणकी - राज्यात एकीकडे अमली पदार्थमुक्त अभियानासाठी पोलीस प्रशासन कंबर कसून कामाला लागले असतानाच, ढाणकी परिसरातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ढाणकी येथील जयस्वाल देशी दारू दुकानासमोरील मोकळ्या जागेत चिलीमच्या साह्याने गांजा ओढणाऱ्या पाच जणांना बिटरगाव पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, विशेषतः तरुणांच्या अमली पदार्थांच्या वाढत्या व्यसनाधीनतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार बिटरगाव पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली होती की, जयस्वाल देशी दारू दुकानासमोरील मोकळ्या जागेत काही लोक उघडपणे गांजाचे सेवन करत आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून ठाणेदार पांडुरंग शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तातडीने सापळा



रचून धाड टाकली. यावेळी पोलिसांनी शंकर चंपत कांबळे (५५), रितेश दिलीप मुनेश्वर (२६), गजानन चांदु गोरेकर (३१), रितेश संजय मुकीरवार (३०) आणि शरद बापूराव खाडे (३१) हे पाच जण गांजा या अमली पदार्थाचे चिलीमच्या साह्याने सेवन करताना आढळून आले.पोलिसांनी घटनास्थळावरून गांजा आणि ओढण्याचे साहित्य जप्त केले असून, आरोपींवर 'एनडीपीएस' (NDPS) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तरुण पिढीसाठी धोक्याची घंटा असून या कारवाईत अटक करण्यात आलेल्या पाच आरोपीं पैकी चार आरोपी हे २६ ते ३१ या वयोगटातील आहेत. ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. ढाणकीसारख्या निमशहरी भागातही आता अमली पदार्थांचे जाळे पसरत असल्याचे यावरून स्पष्ट होत आहे. मौजमजा आणि विरंगुळा म्हणून सुरू होणारे हे व्यसन तरुणांच्या आरोग्यासोबतच त्यांच्या भविष्याचाही नाश करत आहे. भरवस्तीत अशा प्रकारे अमली पदार्थांचे सेवन होणे, हे समाजासाठी एक मोठे संकट मानले जात आहे. पोलिसांनी केलेली ही कारवाई स्वागतार्ह असली, तरी भविष्यातील पिढी वाचवण्यासाठी सामाजिक जनजागृती आणि कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजनांची गरज असल्याचे मत सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील रस्त्याच्या कामावर प्रश्नचिन्ह

### लाडखेड-जांभोरा-ढवळसर मार्गावरील सिमेंट रस्ता निकृष्ट दर्जाचा असल्याचा ग्रामस्थांचा आरोप

**जनमाध्यम प्रतिनिधी**

लाडखेड - मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या लाडखेड-जांभोरा-ढवळसर या साडेचार किलोमीटर सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामावर ग्रामस्थांनी गंभीर आक्षेप घेतले आहेत. तब्बल ५ कोटी ९५ लाख रुपयांच्या या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असून कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

राज्य महामार्ग २८२ अंतर्गत करण्यात येत असलेल्या या रस्त्याच्या कामात आवश्यक तांत्रिक निकष पाळले जात नसल्याची तक्रार आहे. रस्ता तयार करताना पेव्हर मशीनचा वापर न करता थेट डम्परमधून काँक्रीट टाकून पावड्याने पसरविण्यात येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



तसेच व्हायब्रेटरचा केवळ औपचारिक वापर होत असून रस्त्याला आवश्यक प्रमाणात पाणी मारले जात नसल्याने अनेक ठिकाणी सुरुवातीलाच भेगा पडल्याचे दिसून येत आहे.ग्रामस्थांच्या मते, रस्त्याच्या बेससाठी आवश्यक असलेली ४० मिमी व १० मिमी खडी टाकून योग्य रोलर दाबाई करण्यात आली नाही. जुन्या रस्त्यावरील खडी उकरून त्याचाच वापर करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी संतप्त नागरिकांनी काम बंद पाडत दर्जेदार काम करण्याची मागणी केली होती. मात्र, "कामच बंद करू" असा इशारा ठेकेदाराकडून देण्यात आल्याने ग्रामस्थांनी माघार घेतल्याची चर्चा आहे. जांभोरा हे प्रसिद्ध दत्त मंदिराचे तीर्थक्षेत्र असून या मार्गावर जडवाहतुकीची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. तरीही रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मुरूमाऐवजी माती टाकण्यात आल्याने पावसाळ्यात अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## समाज जागृतीनेच मराठी शाळा वाचू शकते : गजानन ऊल्हे

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - नुकतेच शनिवार दिनांक ०९ मे २०२६रोजी पुसद येथे प्रोटान शिक्षक संघटनेचे तालुकास्तरीय संमेलन पार पडले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रोटान शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष गजानन ऊल्हे यांची उपस्थिती लाभली होती तर उद्घाटक म्हणून पुसद नगर परिषदेचे शिक्षण सभापती विठ्ठल खडसे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षणाधिकारी रंगराव काळे, राष्ट्रीय आदीवासी एकता परिषदेचे गणपत गव्हाळे,अशोक पोले, महेंद्र मेश्राम, संतोष सुरवाडे, प्रा.आंबादास वानखेडे, मुरलीधर राठोड, प्रा.डॉ.प्रियंका गायकवाड, प्रा.डॉ. सुनिल खाडे इत्यादींची



उपस्थिती होती. अध्यक्ष स्थानावरून बोलतांना गजानन ऊल्हे यांनी मराठी शाळा ही समाजाची संपत्ती असून मराठी शाळा संपल्यास बहुजन समाजाचे मोठे नुकसान होणार आहे व हा समाज अज्ञानाच्या खाईमध्ये लोटला जाणार आहे. त्यामुळे शाळा वाचवण्यासाठी शिक्षकांनी समाजामध्ये जाऊन समाज जागृतीचे काम केले पाहिजे आणि समाजाला सोबत घेऊन आंदोलन उभे केले पाहिजे तरच मराठी शाळा वाचू शकते, असे प्रतिपादन करून शिक्षकांनी समाज जागृतीसाठी घराच्या बाहेर पडले पाहिजे असे आवाहनही यावेळी त्यांनी उपस्थित शिक्षकांना केले. या कार्यक्रमाला पुसद तालुक्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थितीती दर्शवीली.

## वाणिज्य शाखेत विडुळ येथील वैष्णवी दिलीप बिचेवार महाविद्यालयात प्रथम

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड : वाणिज्य शाखेतून विडुळ येथील वैष्णवी दिलीप बिचेवार हिने ९१% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

उमरखेड येथील मॉडर्न पब्लिक स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून शाळेच्या यशाची परंपरा यदाही कायम राखाली आहे. विद्यालयाचा वाणिज्य (Commerce) व विज्ञान (Science) विभागाचा निकाल १०० टक्के आहे. तनिष्क जयस्वाल ९०.८३ % गुणांसह द्वितीय तर सायली मुन्नरवार आणि ओमकार गावंडे यांनी प्रत्येकी ८८.१७ % गुण मिळवून संयुक्तपणे तृतीय क्रमांक पटकावला. इंग्रजी माध्यमाच्या वाणिज्य विभागातील एकूण ५६ विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत (Distinction), तर १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेतून रूपेश रामेश्वर कदम प्रथम, साक्षी विठ्ठल अनखुळे हिने द्वितीय, तर निकिता सुनीता चव्हाण व अस्मिता रामेश्वर सुरोशे यांनी तृतीय क्रमांक पटकावून यश संपादन केले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे विडुळ येथील वाणिज्य शाखेतून वैष्णवी दिलीप बिचेवार हिने ९१% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला या यशाबद्दल तिचे विडुळ मध्ये विशेष कौतुक करण्यात येत असून तिचे आई, वडील सामान्य परिस्थितीतील असून, मोलमजुरी करून वैष्णवीच्या शिक्षणासाठी ते नेहमी धडपडत असतात तिच्या या यशाबद्दल तिने आई-वडील आणि आपली अतिशय अल्प मोबदल्यात ट्युशन घेणाऱ्या व्यास मॅडम यांना विशेष श्रेय दिले आहे. विद्याध्यर्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्य आणि सर्व शिक्षक वृंदांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## जगाचा भेद लयाला जाण्याची मागणी संतानी केली : शृंगारे महाराज

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - बाराव्या शतकात जगाच्या भेद संपवण्यासाठी संत महाराष्ट्रात ज्ञानेश्वर,गुजरात येथे चक्रधर तर कर्नाटकात बसवेश्वर जन्मास आले त्यांनी पंथभेद,जातीभेद व लिंगभेद भेद नष्ट करण्याचे कार्य केले परंतु काळानुरूप पंथभेद जाऊन धर्मभेद वाढला, जातीभेद संपून पक्षभेद वाढला तर लिंगभेद संपून गरीब श्रीमंत भेद वाढला त्यासाठी विसाव्या शतकात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व कर्मयोगी गाडगे महाराज आले त्यांनी हा भेद नष्ट होण्यासाठी आयुष्य चंदनाप्रमाणे झिजविले आणि ईश्वराकडे तीच मागणी केली असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाचा व्यसनमुक्ती पुरस्कार प्राप्त ह.भ.प.शिवदास महाराज शृंगारे यांनी




कीर्तनमालेचे सहावे पुष्प गुंफतानी ग्रामपंचायत श्रीरामपूर येथे केले.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ११७ वी जयंती अर्थात ग्रामजयंती निमित्त होणाऱ्या सुसंस्कार शिबिरात पहाटे निवृत्तीनाथ बैस्कार,किसन गरडे, नेताजी केणे,भूमिका धर्माळे यांनी सामुदायिक ध्यान, जय उचाडे याने स्वसंरक्षण ज्युडो कराटे, योगशिक्षिका रंजना किन्हेकर यांनी यौगिक जागिंग सह योगासन प्राणायाम प्रात्यक्षिकासह करून घेतले तर आदर्श शिक्षक चंद्रकांत ठेंगे यांनी महापुरुषांची उदाहरणे देऊन अतिशय उत्तम मार्गदर्शन करून मुलांवर संस्कार असणे जीवनावश्यक आहेत त्यासाठी गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूरच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६९ | ४०/२ | निजी | कृषक | ०.१२ | बाबुराव जानुजी वाघमारे / गजानन जानुजी ४०/२ |
| ७० | ४०/३ | निजी | कृषक | ०.०३ | मोहम्मद फरहान मोहम्मद रज्जाक/ मोहम्मद फैझान अब्दुल रज्जाक ४०/३ |
| ७१ | ४०/४ | निजी | कृषक | ०.०५ | कमलाबाई अशोक खंडेलवाल ४०/४ |
| ७२ | ४०/४ | निजी | कृषक | ०.०९ | शुभम मदन अग्रवाल ४०/४ |
| ७३ | ४१ | निजी | कृषक | ०.०४ | मेहरुन्नीसा ज. शमीउल्ला खाँ. ४१ |
| ७४ | ४२/२ | सरकारी | कृषक | ०.०१ | महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी ४२/२ |
| ७५ | ४५/१/ड | निजी | कृषक | ०.०७ | विदर्भ जिनिंग तर्फे सुबोध जमनलाल गोयनका व सरीता सुबोध गोयनका 45/1/D |
| ७६ | ४५/१/क | निजी | अकृषक | ०.०४ | मे. जे. एस. कॉटनइंडस्ट्रीज प्रो.प्रा. सुबोध जमनलाल गोयनक 45/1/K |
| ७७ | ४५/३ | निजी | अकृषक | ०.०७ | मो. राजिक मो. एसाक ४५/३ |
| ७८ | ४५/३ | निजी | अकृषक | ०.०४ | मे. जे. एस. कॉटनइंडस्ट्रीजप्रो.प्रा. सुवोध लाल गोयनका 45/3/A |
| ७९ | ७६ | सरकारी | कृषक | ०.०११६४८ | ई-क्लास सरकार ७६ |
| ८० | ७८/२ | निजी | अकृषक | ०.००२ | सै. जाकीर सै. नबी ७८/२ |
| ८१ | ८ | निजी | अकृषक | ०.०५ | विक्रम श्रीराम गावंडे ८ |
| ८२ | ९/१/अ | निजी | अकृषक | ०.०२ | राजेश कुमार शामसुंदर केडीया 9/1/A |
| गांव का नाम: वनखेड़पुर | | | | | |
| ८३ | १० | निजी | अकृषक | ०.०२ | हसनशहा अन्वरशहा १० |
| ८४ | १० | निजी | कृषक | ०.११ | मेहरुन्निसा ज. शमीउल्लाखा १० |
| ८५ | १५ | सरकारी | अकृषक | ०.१ | कृषी उत्पन्न बाजार समिती १५ |
| ८६ | १६ | निजी | अकृषक | ०.००२८१५ | सरपंच ग्राम पंचायत १६ |
| ८७ | १६ | निजी | कृषक | ०.०७ | शे. कादीर शेखजी व आसीमखान कासमखान सामाईक क्षेत्र १६ |
| ८८ | १६ | निजी | कृषक | ०.०१५४ | अकलीमोद्दीन फईमोद्दीन १६ |
| ८९ | १६/१ | निजी | अकृषक | ०.०१५१०८ | आकाश सुभाष महल्ले व तुळशीराम काळे १६/१ |
| ९० | १६/२ | निजी | अकृषक | ०.०१४६१ | विलास तुकाराम पसलवाड १६/२ |
| ९१ | १६/३. | निजी | अकृषक | ०.०१४५८४ | मुनीबोद्दिन अमजद काजी मोझिबोद्दिन |
| ९२ | १६/४ | निजी | अकृषक | ०.०१४५५९ | मुनीबोद्दिन अमजद काजी मोझिवोद्दिन काजी १६/४ |
| ९३ | १६/५ | निजी | अकृषक | ०.०१४५२४ | अब्दुल नोमान अ हमीद १६/५ |
| ९४ | १६/६ | निजी | अकृषक | ०.०१४४६४ | अब्दुल नोगान अहमीद १६/६ |
| ९५ | १६/७ | निजी | अकृषक | ०.०१४३१९ | मुजीब खान युसुफ खान १६/७ |
| ९६ | १६/८ | निजी | अकृषक | ०.०१४३१९ | गुजीब खान युसुफ खान १६/८ |
| Total | | | | 4.982062 | |

[फा. सं. RO/MUM/NH (O)/2023-24/72/3D]
शेख अमीनखान निदेशक

**MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS**
**NOTIFICATION**
**New Delhi, the 13th April, 2026**

**S.O. 1869(E). -** Whereas by the notification of the Government of India in the Ministry of Road Transport and Highways, Department of Road Transport and Highways nuinber S.0.329(E) dated 21 January 2026 And S.0.799(E) dated 16 February 2026 published in Gazette of India, Extraordinary, Part II, Section 3, Sub-section (ii) issued under sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government declared its intention to acquire the land specified in the Schedule annexed to the said notification for (Barshitakli Bypass Four Lane with paved shoulder), maintenance, management and operation of National Highway No. 161A at Barshitakli in the stretch of land from km. 0/00 to 3/100 (Mahan-Akola section) in the District of Akola in the State of Maharashtra.

And whereas the substance of the said notification S.O.329(E) dated 21 January 2026 has been published in "City News Superfast" & "Sairan" both are Dated 05/02/2026. And S.O.799(E) dated 16 February 2026 has been published in "City News Superfast" & "Sairan" both are Dated 27/02/2026 .; under sub-section (3) of section 3A of the said Act;

And whereas the Competent Authority has received objections filed under Section 3-C, considered and settled the same appropriately;

And whereas, in pursuance of sub-section (1) of section 3D of the said Act, the competent authority has submitted its report to the Central Government;

Now, therefore, upon receipt of the said report of the competent authority and in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 3D of the said Act, the Central Government hereby declares that the land specified in the said Schedule should be acquired for the aforesaid purpose;

And further, in pursuance of sub-section (2) of section 3D of the said Act, the Central Government hereby declares that on publication of this notification in the Official Gazette, the land specified in the said Schedule shall vest absolutely in the Central Government, free from all encumbrances.

**SCHEDULE**

Brief description of the land to be acquired with or without structure falling National Highway No. 161A within the stretch of land from km. 0/00 to 3/100 (Mahan-Akola section) in the District Akola in the State of Maharashtra.

**State: MAHARASHTRA** **District: AKOLA**

| Sl. No. | Survey/Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Hectares | Name of Land Owner/Interested Person |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |

**Taluk: Barshitakli** **Village: Ashkaripur**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 36/A/37/A/2 | Private | Non-Agriculture | 0.0044 | Archana Gopal Vakte, Komal Gopal Vakte, Rutuja Gopal Vakte, Tanushree Gopal Vakte, A.Pa.K Mother Archana Vakte 36/A/37/A/2 |
| 2 | 36/A/37/A/2 | Private | Non-Agriculture | 0.0042 | Janardan Sukhdev Chavan 36/A/37/A/2 |
| 3 | 36/A/37/A/3 | Private | Non-Agriculture | 0.0096 | Mohammad Shakeel Mohammad Anis, Syed Abrar Syed Mobeen, Mohammad Ilyas Mohammad Arif 36/A/37/A/3 |
| 4 | 37 Paiki | Private | Agriculture | 0.0534 | Vitthal Sansthan 37 Paiki |
| 5 | 37 Paiki | Private | Agriculture | 0.0872 | Madhukar Rangalal Pawar 37 Paiki |
| 6 | 37 Paiki | Private | Non-Agriculture | 0.0287 | Bebi Krishna Rathod 37 Paiki |
| 7 | 37 Paiki | Private | Non-Agriculture | 0.0189 | Sangeeta Anand Chavan 37 Paiki |
| 8 | 37 Paiki | Private | Non-Agriculture | 0.0111 | Vandana Mohan Jadhav 37 Paiki |
| 9 | 37 Paiki | Private | Non-Agriculture | 0.0108 | Sheikh Usman Sheikh Ismail 37 Paiki |
| | | | | | |
| 10 | 101/2A | Private | Non-Agriculture | 0.09 | Ahmad Khan Aliyar Khan Pro.Pra. Eqra Jining Factory, Barshitakli 101/2A |
| 11 | 102/2B | Private | Non-Agriculture | 0.16 | Farhan Khan Rahim Khan, Bhavesh Asif Sheikh Atik, Sunilkumar Vishweshar Dayal, Syed Nafis Syed Hafiz, Anuj Subhash Chaudhary, Nadeem Javed Khan Salam Khan M/s. Shrikotex - Partner: Syed Gyasoddin Syed Rafiyoddin 102/2B |
| 12 | 102/3 | Government | Agriculture | 0.12 | Central Government Railway 102/3 |
| 13 | 103/2 | Private | Agriculture | 0.02 | Mo. Shoieb A. Sadik 103/2 |
| 14 | 104 | Private | Non-Agriculture | 0.0031 | Mo. Saadil Mo. Rafik 104/3 |
| 15 | 104 | Private | Non-Agriculture | 0.02 | Ali Ahmad khan ali 104/3 |
| 16 | 109/1 | Private | Agriculture | 0.04 | Pravin kumar Wamansa Bulbule Mala Dipak Bulbule, Ravikumar Dipak Bulbule, Sneha Dipak Bulbule Pooja Vaibhav Yelane Nirmalabai Wamansa Bulbule, 109/1 |
| 17 | 109/1A | Private | Agriculture | 0.4 | Pravinkumar Wamansa Bulbule 109/1A |
| 18 | 109/2 | Private | Agriculture | 0.14 | Santosh Mahadeo Pinjarkar & Prashant Raju Pinjarkar Combined 109/2 |
| 19 | 294/1 | Private | Agriculture | 0.42 | Akoli Base Masjid Sansthan 294/1 |
| 20 | 295/1 Pai | Private | Non-Agriculture | 0.0197 | Kamrujja Badiujina 295/1 Pai |
| 21 | 295/1/1 A | Private | Non-Agriculture | 0.016015 | Mahammad Isaak Mahammad Unus 295/1/1/4A |
| 22 | 295/1/1/4 A | Private | Non-Agriculture | 0.014777 | Mahammad Isaak Mahammad Unus 295/1/1 A |
| 23 | 295/1/10 A | Private | Non-Agriculture | 0.014777 | shahejad Ali Khan Asad Ali Khan, Sheikh Nairoddin Sheikh Alimoddin295/1/2 A |
| 24 | 295/1/10 B | Private | Non-Agriculture | 0.01477 7 | shahejad Ali Khan Asad Ali Khan,Sheikh Nairoddin Sheikh Alimoddin 295/1/10 B |
| 25 | 295/1/2/ A | Private | Non-Agriculture | 0.012732 | Mahammad Isaak Mahammad Unus 295/1/2A |
| 26 | 295/1/27 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/28 |
| 27 | 295/1/28 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/30 |
| 28 | 295/1/29 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/39 |
| 29 | 295/1/30 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/30 |
| 30 | 295/1/31 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/31 |
| 31 | 295/1/32 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/32 |
| 32 | 295/1/33 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/33 |
| 33 | 295/1/34 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/34 |
| 34 | 295/1/35 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/35 |
| 35 | 295/1/36 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/36 |
| 36 | 295/1/37 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/37 |
| 37 | 295/1/38 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/38 |

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### अभिनय नाट्य प्रशिक्षण शिबीराचे थाटात उद्‌घाटन

**लहेगाव**-महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ कामगार कल्याण केंद्र नवी वस्ती बडनेरा आणि गंधर्व बहुउद्देशीय संस्था अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने अभिनय नाट्य प्रशिक्षण शिबीराचे उद्‌घाटन संपन्न झाले या शिबिराचे उद्‌घाटक म्हणून रामकृष्ण चिखलकर गुणवंत कामगार पुरस्कार प्रमुख पाहुणे संजय मैदानकर जिल्हा सामान्य रुग्णालयात अमरावती विशेष उपस्थिती सुनील चव्हाण कामगार कल्याण अधिकारी अमरावती तसेच सचिन खारोडे केंद्र संचालक तसेच गंधर्व बहुउद्देशीय संस्थाचे मुख्य प्रशिक्षक दीपक नांदगावकर या मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सोनू सोनू तारापूरे यांनी मानले या शिबिरात ३० प्रशिक्षणार्थींनी घेतला सहभाग तसेच कार्यक्रम यशस्वीते करीता शर्वरी ठाकरे शंतनू सोलूव प्रतिक बुळुकले संजय चौधरी सय्यद मुक्तार अली विद्या भैसारे यांनी आता परिश्रम घेतले.



### न.पं.तर्फे विविध योजनांच्या लाभाचे वितरण

**तिवसा**-तहसील कार्यालय तिवसा येथे आज छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान (नागरी) उत्साहात आयोजित करण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून नागरी क्षेत्रातील विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र नागरिकांना वितरित करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. राजेश वानखडे हे उपस्थित होते. यावेळी नगर पंचायत तिवसा मार्फत रमाई आवास योजना अंतर्गत २ लाभार्थ्यांना प्रत्येकी अनुदानाचा लाभ देण्यात आला असून एकूण १ लाख ७५ हजार रुपयांचे वितरण करण्यात आले. तसेच प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत १५ लाभार्थ्यांना तर स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत १ लाभार्थ्यास लाभ देण्यात आला. तसेच विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले.या प्रसंगी मुख्याधिकारी शिवदास मुसळे, प्रशासकीय अधिकारी रोहन राठोड,कर निरीक्षक विकास गावंडे, स्वच्छता निरीक्षक राहुल इमले, वरिष्ठ लिपिक सुधीर विघ्ने तसेच नगर पंचायत तिवसाचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला असून लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.



### नंदकिशोर मते यांना पूरस्कार

**तिवसा**-पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत, न्यू इरा प्रेस दिल्लीच्या वतीने आयोजित शानदार सोहळ्यात अमरावती जिल्ह्यातील तिवसा येथील पत्रकार नंदकिशोर मते यांना ग्लोबल सक्सेस बेस्ट जर्नालिस्ट अवॉर्ड २०२६' चे देऊन गौरविण्यात आले. दिल्ली येथील इफोरिया मॅन्शन, मोतीनगर बँक्वेट हॉलमध्ये हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.प्रसिद्ध टीव्ही मालिका अभिनेत्री मिताली जी नाग व राष्ट्रीय समाचार पत्राचे मुख्य संपादक राजीवजी ढिंगरा यांच्या हस्ते नंदकिशोर मते यांना हे सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात देशभरातील विविध राज्यांतील पत्रकार, उत्कृष्ट फॅशन डिझाइनर, मेकअप आर्टिस्ट आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नंदकिशोर मते हे गेल्या ९ वर्षांपासून या क्षेत्रात सक्रिय आहेत.

## निधन

### रवींद्र डोळे

**अमरावती**-सुप्रसिध्द आयकर सल्लागार ॲड आशिष डोळे यांचे



वडील, खापर्डे बगिचातील नावलौकिक रवींद्र डोळे यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने १० मे रोजी सकाळी त्याचे राहते घरी निधन झाले. त्याचे मागे पत्नी आशाताई, मुलगा ॲड. आशिष, विवाहित कन्या रश्मी, जावई, सुन, नात व बराच मोठा आप्त परिवार आहे. रवींद्र डोळे यांच्यावर आज सोमवार ११ रोजी अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांची अन्त्ययात्रा सकाळी १० वाजता त्यांचे खापर्डे बगिच्यातील निवासस्थान सकाळी १० वाजता निघेल.

### सुरेश संभे

**मालखेड रेल्वे**–स्थानिक रहिवासी सुरेश शामराव संभे (वय ७०)



यांचे अल्पशा आजाराने ९ मे रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून, त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व नातूपंतू असा बराचसा आप्तपरिवार आहे. त्यांचे अंत्यसंस्कार १० मे रोजी मालखेड रेल्वे येथील हिंदू स्मशानभूमीत पार पडले.



### त्र्यंबकराव ढोरे

**शिरखेड**-येथील त्र्यंबकराव बापूराव ढोरे ७५वर्षी व यांचे वृद्धपकाळाने ८ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी शकुंतलाबाई, दोन मुले, सुना,नातवंड असा आप्तपरिवार आहे. विजय ढोरे यांचे ते वडील आहेत.

# वारंवार फुटणारी जलवाहिनी; 'कृत्रिम' जलसंकटाने अमरावतीकर हैराण

## 'कृत्रिम' जलसंकटाने नागरिक त्रस्त; सुरळीत पुरवठ्यासाठी आणखी प्रतीक्षा

**अमरावती/का.प्र.**

कडाक्याच्या उन्हाळ्यात अमरावतीकरांवर 'कृत्रिम' जलसंकट ओढवले आहे. अप्पर वर्धा धरणातून अमरावती शहराला पाणी पुरवठा करणारी मुख्य वितरिका डवरगाव परिसरात गुरूवारी दुपारी फुटल्याने गेले दोन दिवस अमरावती शहराचा पाणीपुरवठा बंद होता. दुरूस्तीचे काम म युद्धपातळीवर सुरू असले, तरी अमरावतीकरांचे मोठे हाल झाले. ही जलवाहिनी वारंवार का फुटते आणि त्यावर तोडगा केव्हा निघणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अमरावती शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजना अमृत-दोनसाठी ८६५.२६ कोटी रुपयांच्या निविदेला मान्यता मिळून दीड वर्षांचा कालावधी उलटला आहे. पण या योजनेचे काम संथगतीने सुरू असल्याने अमरावतीकरांना सुरळीत पाणी पुरवठ्यासाठी आणखी बरीच प्रतीक्षा करावी लागणार आहे. पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असूनही दिवसाआड पाणी, कमी दाबाचा पाणी पुरवठा, नळ जोडण्यांची संथगती यामुळे



अमरावतीकर त्रस्त आहे. अमरावती शहराला अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा केला जातो. अमरावतीकरांची तहान भागेल इतका पाणीसाठा धरणात उपलब्ध आहे. तरी अमरावतीकरांना अपुऱ्या व अर्धवट पाणी पुरवठ्याची झळ सहन करावी लागत आहे.अप्पर वर्धा धरण मोर्शी ते नेरपिंगळाई पर्यंतची डब्लूटीपी जलवाहिनी जुनी लोखंडी असून शिकस्त झाली असून जलवाहिनी फुटली तर अमरावतीचा पाणी पुरवठा चार ते पाच दिवस बंद राहतो असे चित्र आहे. त्यामुळे नजीकच्या गावांना सुद्धा पाणी पुरवठा होत नाही. ही गैरसोय टाळण्यासाठी अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना अमृत२.० अभियाना अंतर्गत सिंभोरा हेडवर्क्स ते नेरपिंगळाई संतुलन टाकी पासून पुढे तपोवन जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत मृदू पोलादी जलवाहिनी अंथरण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता, त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.



### तीन महिन्यांत दोन वेळा मुख्य जलवाहिनी फुटली

सध्याच्या अंथरलेल्या १५०० मिलीमीटर व्यासाच्या पी.एस.सी. गुरुत्ववाहिनीवर सातत्याने गळतीचे प्रमाण वाढत आहे. सदर गळत्या ह्या मुख्यत्वेकरून जलवाहिनी मधील तार गंजल्यामुळे व वाहिनी निकामी झाल्याने लागल्या आहेत. सध्या अस्तित्वातील जुनी पी.एस.सी. गुरुत्ववाहिनी १५६ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा करण्यासाठी संकल्पीत असून त्यामधून सद्यस्थितीत १२३ दशलक्ष लिटर पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

गेल्या तीन महिन्यात दोन वेळा मुख्य जलवाहिनी फुटली, फेब्रुवारी महिन्यात पंचवटी चौकात जलवाहिनीला तडे गेले होते. आता गुरूवारी पुन्हा जलवाहिनी फुटली. त्यामुळे नागरिकांना पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी पायपीट करावी लागली. आता अमृत योजनेचे काम केव्हा पूर्णत्वास जाणार, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

# मंत्रालयीन बैठकीत सैनिकांचा एल्गार

## सैनिक संघटनेच्या मागणीला मोठे यश

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

मुंबई येथे पार पडलेली एल्गार सैनिक एकता संघटनेची मंत्रालय बैठक यशस्वी ठरली आहे या बैठकीत सैनिव, माजी सैनिक व वीर नारी यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर शासनाने सकारात्मक निर्णय घेत अनेक महत्त्वाचे मुद्दे मान्य केले आहेत ही बैठक एल्गार संघटनेच्या सातत्यपूर्ण संघर्षाचे फलित असून नागपूर व मुंबई येथे झालेल्या आंदोलनानंतर शासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाली आहे. बैठकीचे नेतृत्व डायरेक्टर माजी कमांडो पद्माकर चंदनशिवे यांनी केले वीर नारी सुचिता मधुकर भोयर यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की परिवारासाठी आजचा दिवस ऐतिहासिक असला तरी न्याय मिळेपर्यंत हा संघर्ष सुरूच राहील बैठकीत सैनिक व माजी सैनिकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला सरकारने वीरणारी कुटुंबासाठी विशेष योजना सुरू करून रोजगार पुनर्वसन आर्थिक सक्षमीकरणासाठी ठोस पावले उचलून शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी अशी मागणी सैनिक संघटने द्वारे करण्यात आली

या बैठकीस कॅप्टन कमलेश दाभाडे, नारायण अंकुशी, अनंत डगवार, श्याम दादा परसोडकर, कृष्णा राठोड, सविता इंगळे, वीर नारी सविता नाईक, शितादेवी चंपलवार, यांच्यासह विविध सैनिक संघटना व सैनिक महिला बचत गटाचे सदस्य उपस्थित होते.



## शेतकऱ्यांना प्रशिक्षणाची सुवर्ण संधी- डॉ. खांबरे



**अमरावती**-जागतिक स्तरावर शेती विषयक अद्यावत तंत्रज्ञानाची माहिती राज्यातील शेतकरी बांधवाना अवगत व्हावी यासाठी अमरावती येथे राज्यातील पहिले शाश्वत केंद्राची सुरवात महाराष्ट्र दिनी झाली असून येथे शेतकरी बांधव यांच्या करिता अद्यावत प्रशिक्षण प्राप्त होणार असल्याचे प्रतिपादन प्राचार्य दिलीपसिंह खांबरे यांनी उदघाटन प्रसंगी केले. सस्टेनो फौंडेशन पुणे या संस्थे मार्फत कृषी क्षेत्रातील सर्व यंत्रणा यांना सहभागी करून विदर्भातील अकरा जिल्ह्यातील शेतकरी बांधव यांच्यासाठी स्थानिक कॅम्प परिसरातील जिल्हा उद्योग केंद्रा समोरील आनंद पॅलेसमध्ये शाश्वत विकास केंद्राचे उदघाटन नुकतेच थाटात पार पडले. शाश्वत विकास केंद्राचे व्यवस्थापकीय संचालक गणेश चौधरी यांनी मनोगता मधून दिली.याप्रसंगी, केंद्राचे संचालक प्रकाश तट्टे, समन्व्यक जयंत सवई, बीकेडीचे संचालक किशोरानंद देशमुख, श्रीमती डॉ. अर्चना मोहोड, जेष्ठ नागरिक संघांचे अध्यक्ष पुरुषोत्तम गावंडे, कामगार नेते दामोदर पवार, सेवानिवृत्त विभागीय सहसंचालक काशिनाथ चौधरी, डॉ. गोवर्धन चरपे, सिद्धार्थ वानखडे, किशोर हुरडे, केंद्राचे जन संपर्क अधिकारी ॲड. प्रभाकर वानखडे, नेचरोपॅथी केंद्राच्या अनिता चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.समारंभाचे संचालन व आभार प्रदर्शन गणेश चौधरी यांनी केले.

# प्रशिक्षणातून धेय समर्पित कार्यकर्ता तयार व्हावा-अतुल मोघे

## संघ शिक्षा वर्ग, विदर्भ प्रांत वर्धा येथे प्रारंभ

**वर्धा**-राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. स्वयंसेवकांच्या अथक परिश्रम व त्यागाने आज समाजाने संघटनेला आपलेसे मानले आहे. संघटनेच्या कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभाग व सहयोग देत आहे. संघ संस्थापक डॉ. हेडगेवार यांना हिंदू समाजाचं हिंदू म्हणून संघटन करायचं होतं. तेच काम शाखांच्या माध्यमातून अव्याहत सुरू आहे. प्रशिक्षण वर्गात शाखा चालवण्याच्या तंत्राचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणातून धेय समर्पित कार्यकर्ता तयार व्हावा अशी अपेक्षा प्रांत कार्यवाह अतुल मोघे यांनी केली.

स्थानिक नागठाणा येथील अग्निहोत्री अभियांत्रिकी महाविद्यालय परिसरात ८ ते २४ मे दरम्यान राष्ट्रीय स्वयंसेवक




संघ, विदर्भ प्रांताच्या वतीने 'संघ शिक्षा वर्ग (सामान्य) २०२६' च्या उद्‌घाटन सत्रात ते बोलत होते. यावेळी प्रांत सह संघचालक श्रीधर गाडगे, वर्गाचे सर्वाधिकारी मनोहर सपकाळ यांची उपस्थिती होती. प्रशिक्षणात विदर्भातील सर्व जिल्ह्यातुन वय वर्ष १६-४० चे २०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. एकुण २५ शिक्षक प्रशिक्षण देणार आहेत. समाजातील विविध स्तरातील स्वयंसेवक सामुदायिक जिवनाचा उत्कृष्ट अनुभव या वर्गात घेणार आहेत. ८ ते २४ मे दरम्यान आयोजित या प्रशिक्षण वर्गात वैचारिक सत्र, शारीरिक व्यायाम, नियुध्द, बौद्धिक सत्र संघटनात्मक मार्गदर्शन व सेवेच्या विविध उपक्रमांचा समावेश आहे. श्रीरामनवमीच्या दिवशी दरवर्षी विदर्भातील सर्व संघाच्या शाखेतील स्वयंसेवक वनवासी कल्याण आश्रमा करता निधी संकलन करीत असतात तो निधी एकत्रित आज संघ शिक्षा वर्गाच्या उद्घाटन सत्रात माननीय प्रांत सहसंघ चालक प्रांत कार्यवाह यांनी वनवासी कल्याण आश्रम चे विदर्भ प्रांत सचिव श्री भास्करराव रोकडे यांना सुपूर्द केला.वर्गाचे सर्वाधिकारी नागपूरचे मनोहर सपकाळ, कार्यवाह अमरावतीचे डॉ. दत्तात्रय रत्नपारखी, मुख्यशिक्षक नागपूरचे प्रतिक लांजेवार, सहमुख्यशिक्षक धामणगावचे विशाल मोकाशे, बौध्दिक प्रमुख भंडाराचे कृष्णा ठाकरे, सहबौध्दिक प्रमुख यवतमाळ चे संतोष मुत्तलवार, सेवा प्रमुख नागपूरचे दीपक भोंगाडे व अभिषेक मीश्रा सह सेवा प्रमुख म्हणुन १५ दीवसिय प्रशिक्षण वर्गात प्रमुख दायित्वात संचालन करणार आहेत. नागपूर चे श्री मोहन अग्निहोत्री वर्ग पालक आहेत.

# डॉ.वसंत हंकारे यांनी भरला परतवाडा वासियांमध्ये हुंकार

## विधानपरिषदेचे नवनिर्वाचित आ. बच्चुभाऊ कडू यांचा सत्कार

**अचलपूर/वार्ताहर**

परतवाडा शहरामध्ये आयोजित प्रसिद्ध व्याख्याते समाज प्रबोधनकार डॉ. वसंत हंकारे सर यांच्या समाज प्रबोधन कार्यक्रमात हजारो नागरिकांनी उपस्थिती दर्शवली. आजच्या वस्तुस्थितीवर डॉ. वसंत हंकारे यांनी हुंकार भरल्याने असंख्य विद्यार्थी व पालकांना तसेच नागरिकांच्या अश्रूचा बांध फुटला. शिवसेना, युवा सेना, महिला आघाडी च्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन माजी राज्यमंत्री तथा नवनिर्वाचित विधान परिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या हस्ते झाले.

यावेळी माजी आ.ज्ञानेश्वर धाणे पाटील, युवा सेनेचे विभागीय सचिव विठ्ठल सरफ शिवसेनेचे संपर्कप्रमुख सहसंपर्क प्रमुख गजू वाकोडे,श्याम देशमुख, महिला आघाडीच्या अकोला लोकसभा संपर्कप्रमुख तथा अमरावती सह संपर्क प्रमुख वर्षाताई भोयर, महिला आघाडी जिल्हाप्रमुख वंदना दार्वेकर,अरुणा इंगोले, युवती सेना जिल्हाप्रमुख कोमल बद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. परतवाडा शहरांमध्ये नुकतेच घडलेले अश्लील व्हिडिओ प्रकरण, तसेच



विद्यार्थिनींना खोट्या प्रेमाच्या जाळ्यातून वाचवण्यासाठी आणि भरकटलेली तरुणाई व न समजलेले आई-वडील, विद्यार्थी,पालक,शिक्षक यांचे नाते डॉ.वसंत हंकारे यांनी समजून सांगताना अनेक नागरिकांचा अश्रूचा बांध फुटला. शिवसेना युवा सेना आणि उपस्थित नागरिकांच्या वतीने माजी राज्यमंत्री तथा शिवसेनेचे विधानपरिषदेचे आमदार बच्चू कडू यांचा जाहीर नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता युवा सेनेचे जिल्हाप्रमुख प्रितेश अवघड, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बंडू घोम, तालुकाप्रमुख विवेक महल्ले, तालुका संघटक डॉ. राजा माहुलकर, परतवाडा शहर प्रमुख विलास सोळंकी, अचलपूर शहर प्रमुख आतिश अहिर, परतवाडा शहर प्रमुख लकी महाराज चोबे, अचलपूर शहर प्रमुख विशाल गौर,उपशहर प्रमुख सुनील चित्ते, उमेश बडोदे, सतीश नागे, अचलपूर शहर प्रमुख सारिकाताई आसोलकर, पंकज पर्वतकर, नितीन कवठाळे, वेदांत बेदरकर, विशाल खलेलकर, वेदांत कवठाळे, मुकेश गौर, राम मासोतकर आदी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# जनगणना व मतदार यादी पडताळणीसाठी नियुक्त शिक्षकांना भत्ता अनुज्ञेय करा

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे शिक्षण संचालनालयास पत्र

**अमरावती/क्रा.प्र.**

जनगणना व मतदार यादी पडताळणी SIR करीता नियुक्त शिक्षकांना मे, जून महिन्याच्या ग्रीष्मकालीन सुट्टी कालावधीतील वाहतूक भत्ता अनुज्ञेय करा.अश्या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी,माध्यमिक शिक्षण संचालक डॉ.महेश पालकर यांना पाठविले आहे अशी माहीती शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे.



प्राथमिक, माध्यमिक शिक्षक मे, जून महिन्यात ३० दिवसापेक्षा अधिक ग्रीष्मकालीन सुट्टी उपभोगतात या कारणामुळे शिक्षकांना सुट्टी कालावधीचा वाहतूक भत्ता दिला जात नाही.मात्र २०२६ च्या मे व जून महिन्यात राज्यातील जिल्हा परिषद, नपा, मनपा आणि अनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळांतील बहुतांश शिक्षकांच्या सेवा जनगणना राष्ट्रीय कर्तव्यार्थ तसेच मतदार पडताळणी कामासाठी (SIR) अधिग्रहित करण्यात आलेल्या आहेत.

यावर्षी मे व जून महिन्याच्या सुट्टी कालावधीत शिक्षकांना कोणतीही ३० दिवसापेक्षा अधिक कालावधीची दीर्घ सुट्टी उपभोगता येणार नसल्याने शिक्षक कर्तव्यावर आहेत. त्यामुळे शिक्षकांना मे व जून महिन्याचा पूर्ण वाहतूक भत्ता नियमानुसार अनुज्ञेय आहेच. त्यामुळे जनगणना आणि एर्द कार्यार्थ नियुक्त शिक्षकांचा मे व जून २०२६ चा पूर्ण वाहतूक भत्ता शालार्थ प्रणालीत काढण्यासाठीचे निर्देश सर्व संबंधितांना निर्गत करावेत अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कडून मागणी करण्यात आली आहे.

## मधुकर महाराज खोडे यांना 'सत्यपाल महाराज समाजप्रबोधन पुरस्कार'

**अमरावती**-व्यसनमुक्तीच्या कार्यात उल्लेखनीय योगदान देणारे व्यसनमुक्ती सम्राट मधुकर महाराज खोडे यांना यंदाचा 'सत्यपाल महाराज समाजप्रबोधन पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. नागपूर येथील सुरेश भट सभागृहात १६ मे रोजी प्रबोधन दिन कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.सप्तखंजरी वादक प्रबोधनसम्राट श्री सत्यपाल महाराज यांच्या जन्मदिनी प्रबोधन दिन साजरा केला जातो. या निमित्ताने सप्तखंजरी प्रबोधनकार संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दरवर्षी सामाजिक व प्रबोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो. मधुकर महाराज खोडे यांनी विदर्भातील गावखेडी, बंजारा तांडे, भटक्या-विमुक्त व आदिवासी भाग तसेच शहरातील श्रामिक वस्त्यांमध्ये जाऊन



व्यसनमुक्तीबाबत जनजागृती केली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या संदेशाचा प्रसार करत त्यांनी अनेकांना दारू व इतर व्यसनांपासून दूर करून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवले आहे.या कार्यक्रमात गिरीशजी गांधी (अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ), नितीन गडकरी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती सप्तखंजरी वादक प्रबोधनकार तुषार सूर्यवंशी यांनी दिली आहे.

# समाजकारण, शिक्षणसेवा आणि कार्यकर्त्यांच्या विश्वासाचे नेतृत्व -डॉ. नितीनजी धांडे

भारतीय जनता पार्टी अमरावती शहर जिल्हाध्यक्ष तथा शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू, संवेदनशील आणि दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व डॉ. नितीन धांडे यांचा ११ मे रोजी वाढदिवस साजरा होत आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, समाजकारण, शिक्षण आणि संघटन या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची आज विशेष चर्चा होत आहे.

डॉ. नितीनजी धांडे हे नाव आज अमरावती शहरात केवळ शिक्षण क्षेत्रापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर राजकीय क्षेत्रातील एक सक्षम मार्गदर्शक, समाजाशी घट्ट नाळ जोडलेला संवेदनशील व्यक्ती आणि कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारा नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे, साधेपणा, संयम आणि अभ्यासपूर्ण कार्यपद्धती ही त्यांच्या नेतृत्वाची खरी वैशिष्ट्ये मानली जातात.शिक्षण क्षेत्रामध्ये त्यांनी केलेले योगदान विशेष उल्लेखनीय आहे. विदर्भातील दुसऱ्या क्रमांकाची मानली जाणारी 'विदर्भ युथ वेल्फेअर' ही नामांकित शिक्षण संस्था आज हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देण्याचे कार्य करीत आहे आणि त्या संस्थेचे अध्यक्ष म्हणून डॉ. धांडे यांनी संस्थेला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्याचे माध्यम नसून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, आत्मविश्वास आणि सामाजिक जबाबदारी निर्माण करणारी प्रक्रिया आहे, या विचारातून त्यांनी संस्थेच्या माध्यमातून अनेक सकारात्मक उपक्रम राबविले.यासोबतच भारताचे यशस्वी प्रधानमंत्री श्री नरेंद्रजी मोदी, राज्याचे लाडके मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस, यांच्या लोकाभिमुख व प्रभावशाली नेतृत्वाने प्रेरित होऊन २०१४ पासूनच राजकीय क्षेत्रामध्ये त्यांच्या सक्रिय सहभाग वाढला देव,देश,धर्म सोबतच सबका साथ, सबका विकास, और सबका विश्वास, या तत्वांवर काम करणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे ते महाराष्ट्र प्रदेश विशेष निमंत्रित सदस्य झाले, काही त्यावेळी वर्षातच अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाची निवडणूक देखील लढले या निवडणुकीत अपयश जरी मिळाले असेल तरी त्यावेळी या मतदार संघात पक्षाचा उमेदवार म्हणून प्रतिनिधित्व करणे हीच त्यावेळची गरज होती, त्यानंतर पक्षाने डॉ. धांडे यांना दिलेली मोठी जबाबदारी म्हणजे भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष, या पदाला एक वर्षाचा कार्यकाळ अगदी वाढदिवसाच्या दोन दिवसानंतर पूर्ण होणार आहे, एक एमबीबीएस एम.डी असे उच्च विभूषित डॉक्टर असलेले व्यक्ती थेट भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष होण्याची ही पहिलीच वेळ अमरावतीच्या संघटनात्मक रचनेमध्ये आली,



अशावेळी अनेकांना काही गैरसमज सुद्धा होते, की अध्यक्ष पदाचा हा कार्यकाळ त्यांना व्यवस्थित निभावता येणार की नाही, मात्र अध्यक्षपदाच्या वर्षभराच्या कार्यकाळामध्ये अनेक उतार चढाव आले, भाजपा हा अध्यक्ष प्रणालीने चालणारा पक्ष असल्यामुळे अनेक निर्णय घेत असताना त्यांना सर्वांनाच घेऊन चालण्याचे चॅलेंजच एका पद्धतीने होते, अशावेळी त्यांनी अनेकांना अनेक विषयात संधी दिली जिल्हा कार्यकारिणी, मोर्चा अध्यक्ष, विविध सेल प्रकोष्ठ,आघाड्या यांचे अध्यक्ष, त्यांच्या कार्यकारण्या या सगळ्यांची सांगड घालण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली, त्यांच्या या वर्षभराच्या कार्यकाळामध्ये भारतीय जनता पार्टी अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने झालेले सर्व कार्यक्रम भरगच्च संख्येचे झाले, यामध्ये राज्याचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांचा अमरावती प्रवास, भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र जी चव्हाण यांचे अनेक प्रवास, आणि विशेष करून अमरावती जिल्ह्याचे लाडके पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्या उपस्थितीमध्ये झालेले अनेक संघटनात्मक कार्यक्रम व उपक्रम त्यांनी यशस्वी करून दाखविले,

या दरम्यान अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये अध्यक्ष म्हणून त्यांची महत्त्वाची भूमिका ठरली, या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीला अपेक्षेप्रमाणे यश जरी मिळाले नसेल तरीही सलग दुसऱ्यांदा अमरावती महानगरपालिकेमध्ये भाजपाचा महापौर करण्यामध्ये मोलाचा वाटा अध्यक्ष म्हणून त्यांचा राहिला,राजकीय पक्ष म्हंटला की अंतर्गत मतभेद, अनेक टीका टिपणी आणि सर्व गोष्टी आल्याच मात्र कोणी दूरचा आणि कोणी जवळचा असा कोणताही विचार न करता त्यांनी केवळ आपल्या कामावर लक्ष केंद्रित केले, राजकारणात प्रत्येक व्यक्ती आपली महत्त्वाकांक्षा ठेवून काम करण्याच्या साठी आतुर असतो, मात्र मला काय मिळेल याची अपेक्षा न करता डॉक्टर धांडे यांनी स्वतःला भाजपा संघटना मजबूत करण्याच्या साठी अतिशय तळमळीने झोकून दिले, एका प्रकारे पक्ष संघटनेने त्यांना दिलेली जबाबदारी ते व्यवस्थितरित्या सध्या पार पाडत आहे, या सर्व बाबींमध्ये त्यांची विशेषता अशी की अगदी बूथ लेवल पासून च्या सर्व कार्यकर्त्यांकरिता ते सहज उपलब्ध असतात, कोणी केव्हाही कॉल केला तरी त्याचा कॉल उचलतात त्याला रिप्लाय करतात, कोणी पदाने किंवा अन्य बाबींनी लहान किंवा मोठा अशी तमा न बाळगता सर्व कार्यकर्त्यांना घेऊन चालतात,नवीन कार्यकर्त्यांना संधी देणे आणि प्रत्येकाला पक्षाशी भावनिकदृष्ट्या जोडून ठेवणे, ही त्यांची कार्यशैली अनेकांना प्रेरणा देणारी आहे.डॉ. नितीनजी धांडे यांचे व्यक्तिमत्त्व हे शांत, संयमी आणि विकासाभिमुख नेतृत्वाचे उत्तम उदाहरण मानले जाते. प्रसिद्धीपेक्षा कामावर विश्वास ठेवणारे आणि पदापेक्षा जबाबदारीला अधिक महत्त्व देणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख दिवसेंदिवस अधिक मजबूत होत आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान, कार्यकर्त्यांप्रती असलेली आत्मीयता आणि समाजहिताची भूमिका यामुळे ते अनेकांसाठी प्रेरणास्थान बनले आहेत.

या लेखाच्या शेवटी चार ओळी डॉ श्री नितीनजी धांडे यांच्या साठी अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाला त्यांच्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करताना, आगामी काळातही त्यांच्या हातून समाजसेवा, शिक्षणसेवा आणि संघटन बळकटीकरणाचे कार्य अधिक जोमाने घडत राहो, राजकीय क्षेत्रात त्यांना उत्तुंग भरारी मिळो व उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि निरंतर यश लाभो, हीच सदिच्छा.

**बादल कुलकर्णी**
**अमरावती.**

## आदेश नाही, प्रेरणा देणारे नेतृत्व

अमरावतीच्या शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात प्रभावी नेतृत्वाची ओळख निर्माण करणारे नाव म्हणजे डॉ. नितीन धांडे. संस्कार, शिस्त, दूरदृष्टी आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यांच्या जोरावर त्यांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

डॉ. नितीन धांडे यांचा जन्म अमरावती येथे एका प्रतिष्ठित व संस्कारी कुटुंबात झाला. वडील स्व. नानासाहेब धांडे हे जिल्हा परिषदेचे सलग दहा वर्ष अध्यक्ष होते, तर आई शालिनी धांडे यांनी माणुसकी, शिस्त आणि सामाजिक मूल्यांचे संस्कार दिले. बालपणापासूनच अभ्यासात प्रावीण्य मिळवत त्यांनी पुणे येथील नॅशनल मॉडर्न पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेतले आणि पुढे नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. व एम.डी. शिक्षण पूर्ण केले. वैद्यकीय क्षेत्रात प्राध्यापक म्हणून कार्य करत असतानाच त्यांनी शिक्षण व्यवस्थापनातही उल्लेखनीय योगदान दिले. सन २०१४ पासून विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी संस्थेच्या प्रगतीला नवे परिमाण दिले. आज त्यांच्या नेतृत्वाखाली प्राथमिक शिक्षणापासून अभियांत्रिकी, फार्मसी, डेंटल व उच्च शिक्षणाच्या विविध शाखांमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षणासोबत संशोधन, कौशल्य विकास आणि नवोपक्रम यांनाही त्यांनी तेवढेच महत्त्व दिले.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेतून संशोधन क्षेत्रात कार्य करत 'Central India Research Foundation', 'Innovation & Entrepreneurship Development Centre' आणि 'Atal Incubation Centre' सारखे महत्त्वपूर्ण उपक्रम त्यांनी उभे केले.



विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची वृत्ती आणि स्टार्टअप संस्कृती विकसित करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.राजकीय क्षेत्रातही त्यांनी संघटन कौशल्य आणि सकारात्मक नेतृत्वाच्या जोरावर आपली छाप निर्माण केली. भाजपच्या विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत आज ते अमरावती भाजप शहराध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. कार्यकर्त्यांना सोबत घेऊन चालणे, संवादातून नेतृत्व निर्माण करणे आणि प्रत्येकाला आपलेसे वाटेल अशी कार्यपद्धती हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य आहे.डॉ. नितीन धांडे यांचे व्यक्तिमत्त्व केवळ प्रशासकीय किंवा राजकीय नेतृत्वापुरते मर्यादित नाही, तर ते संवेदनशील, कुटुंबवत्सल आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व आहे. म्हणूनच त्यांचे नेतृत्व आदेश देणारे नाही, तर प्रेरणा देणारे नेतृत्व म्हणून समाजात ओळखले जाते.

**डॉ. लोभस घडेकर**
**अमरावती.**

## मी पाहिलेला कार्यकर्त्यांचा अध्यक्ष डॉ नितीनजी धांडे

साधारणतः एक वर्षापूर्वी अनेक कारणांमुळे (जी या लेखाशी सलग्न करता येणार नाहीत) मी माझा जुना पक्ष सोडून भारतीय जनता पार्टीमध्ये आदरणीय बावणकुळे साहेबांच्या नेतृत्वात प्रवेश केला. नवीन ठिकाणी येताना पक्षातील काही शीर्ष नेतृत्वाच्या भेटी घेण्याबाबत सूचना होत्या. त्या अनुषंगाने अनेक भेटींपैकी पहिली भेट भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांची झाली.

अगदी दहा मिनिटांची असलेली ती भेट औपचारिकच होती. दोघांनाही एकमेकांविषयी फारशी माहिती नसल्याने संवाद मर्यादित राहिला. आमच्यासोबत एक मित्रही होते. त्या दिवशी झालेल्या भेटीत एवढ्या मोठ्या संस्थेचे अध्यक्ष आणि त्याचबरोबर भाजपसारख्या मोठ्या पक्षाचे शहराध्यक्ष असलेल्या व्यक्तीबद्दल नेमके काय मत बनवावे, हेच कळत नव्हते.मात्र ठरल्याप्रमाणे पक्षप्रवेश झाला. यापूर्वीही या पक्षात काम केल्यामुळे काही ओळखी होत्याच, पण नव्या संस्कृतीत रुळणे हीच प्राथमिकता होती. जबाबदारीशिवाय काम करण्याची सवय टिकत नाही, हे जाणवत होते. दिवस पुढे जात होते तसे भेटी वाढत गेल्या आणि त्यातून नितीनभाऊंचा स्वभाव, प्रत्येकाशी वागण्याची पद्धत आणि त्यांची कार्यशैली अनुभवायला मिळत होती.महानगरपालिका निवडणुकीच्या काळात नेत्यांच्या निर्देशानुसार एका प्रभागाची जबाबदारी मिळाली. कोअर कमिटीमध्येही स्थान मिळाले आणि त्यावेळी खऱ्या अर्थाने नितीनभाऊंची ओळख झाली. निवडणुकीदरम्यान अनेक वाद, उमेदवारी वाटपातील नाराजी आणि त्यामुळे निर्माण झालेला गोंधळ पण या सगळ्या काळात नितीनभाऊंचा संयम कधीही ढळला नाही. कोणालाही न दुखावता, जे योग्य असेल ते वरिष्ठांपर्यंत पोहोचविण्याची त्यांनी भूमिका घेतली.शेवटी निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही, परंतु आदरणीय बावणकुळे साहेबांनी आपल्या अनुभवाच्या जोरावर मनपामध्ये सत्ता आणली. या संपूर्ण प्रक्रियेत एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली अध्यक्ष म्हणून नितीनभाऊंची भूमिका अत्यंत समर्पित, प्रामाणिक आणि परिपक्व होती.

काळ पुढे सरकत होता. पक्षहिताचे निर्णय घेतले जात होते आणि एका कुटुंबप्रमुखाप्रमाणे नितीनभाऊ प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रयत्न करत होते. मोठ्या पदावर पोहोचल्यानंतर अनेक जण कार्यकर्त्यांपासून दूर जातात, परंतु नितीनभाऊंनी प्रत्येक सामान्य कार्यकर्त्याला आपलैसे मानलै. त्यांच्या दालनात कोणताही कार्यकर्ता कोणत्याही संकोचाशिवाय जाऊ शकतो, हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद आहे.

हळूहळू त्यांच्यासोबत अधिक वेळ घालवताना लक्षात आले की विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटीसारख्या मोठ्या संस्थेचे अध्यक्ष असूनही ते अतिशय साधे आणि सहजस्वभावी आहेत. मंत्री किंवा मोठे नेते आले की त्यांच्या गाडीत बसण्यासाठी, त्यांच्यासोबत दिसण्यासाठी अनेकांची धडपड सुरू असते. पण शहर जिल्हाध्यक्ष म्हणून नैतिक अधिकार असतानाही नितीनभाऊ कधीही स्वतःहून पुढे होताना दिसले नाहीत. बोलावले तरच पुढे जाणे, अन्यथा इतर कार्यकर्त्यांनाही संधी मिळू द्यावी, ही त्यांची भूमिका कायम राहिली.राजकारणात प्रसिद्धीची हाव असणे सामान्य बाब मानली जाते. मोठमोठे कार्यक्रम, हिंदू धर्मातील सण-उत्सव, गर्दी आणि कार्यकर्त्यांचा लवाजमा हे राजकारणाचे वास्तव असते. पण विनाकारण प्रसिद्धीच्या मागे न धावता, पक्षासाठी जे योग्य असेल तेच करणे, संघटनात्मक कामासाठी वेळ देणे आणि त्यासाठी लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीत मग ते तन, मन किंवा धन असो स्वतः पुढाकार घेणे, तसेच सामान्य कार्यकर्त्यावर कोणताही भार पडू न देणे, ही त्यांची कार्यपद्धती विशेष जाणवली.आजच्या दिखाव्याच्या राजकारणात साधेपणा जपणारे व्यक्तिमत्त्व दुर्मिळ होत चालले आहे. नितीनभाऊंमध्ये मात्र पदापेक्षा माणुसकी मोठी असल्याचे सतत जाणवते. कर्तव्यदक्ष, सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करणारे, शांत, संयमी, मनमिळावू आणि दिलदार व्यक्तिमत्त्व असलेले आदरणीय नितीनभाऊ धांडे यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा. ईश्वर आपणास उदंड आणि निरोगी आयुष्य देवो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.नेतृत्व म्हणजे फक्त पुढे उभै राहणै नसतै, तर प्रत्येक कार्यकर्त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे असते आणि हेच नितीनभाऊंमध्ये प्रकर्षाने दिसून येते. सत्ता, पद आणि प्रसिद्धी यापलीकडे जाऊन माणसं जोडणारे नेतृत्वच दीर्घकाळ स्मरणात राहते.

**सुनील खराटे**
**अमरावती.**

# अहंकार जीवनातील सुख-शांती हिरावून त्रासाचा मार्गावर वळवतो

जरी आपल्याला शारीरिकरित्या मानवी शरीर मिळाले असले तरी, आपण खऱ्या अर्थाने मानव आहोत का किंवा मानव म्हणवून घेण्यास पात्र आहोत का? आजच्या जगात, खऱ्या अर्थाने माणूस म्हणून जगणारे लोक अधिकाधिक दुर्मिळ होत चालले आहेत. चला, आधी आपण स्वतःबद्दल जाणून घेऊया, माणूस असण्याचा अर्थ काय असतो. दुसऱ्यांच्या सुखात आनंद मानणे, इतरांच्या दुःखात वेदना अनुभवणे, इतरांच्या भावना समजून घेणे आणि त्यांचे आदर करणे. आपले स्वार्थ बाजूला ठेवून नेहमी इतरांच्या कल्याणाचा विचार करणे. देश आणि समाजाच्या विकासासाठी काम करण्यास तत्पर असणे, सर्वतोपरी मदत करणे आणि मानव कल्याणाची तळमळ कायम ठेवणे. लबाडबाजी आणि मत्सर टाळणे. निसर्ग, प्राणी, पक्षी आणि जंगलांचे रक्षण करणे. जात, धर्म, लिंग, प्रदेश किंवा रंगरूप यावर आधारित भेदभावाला न जुमानता, संपूर्ण मानव समाजाला समान पातळीवर मानावे आणि मानवसेवा व विकासाला प्राधान्य द्यावे. शब्द आणि कृती यात कोणताही फरक नसावा. व्यसन, भ्रष्टाचार, अनैतिक वर्तन, इतरांशी गैरवर्तन, गुन्हेगारी आणि भेदभाव यांपासून अलिप्त राहणे आणि नेहमी चांगल्या कामांना प्राधान्य देणे. ही सर्व माणुसकीची वैशिष्ट्ये आहेत, जी सर्व मानवांमध्ये असली पाहिजेत. जर आपल्यात हे सर्व गुण असतील, तर आपण खऱ्या अर्थाने मानव आहोत, नाहीतर जनावरांनाही लाजवेल अशा घृणास्पद, लज्जास्पद दुःखद घटना आपल्या आजूबाजूला रोज घडतात आणि आपण डोळे मिटून भ्याडपणे जगतो.

आपल्या सभोवतालच्या या संघर्षमय वातावरणात, प्रत्येकजण खोट्याचा मुखवटा घालून स्वतःला माणूस म्हणून दाखवण्याचा प्रयत्न करत आहे आणि हेच वातावरण अहंकाराला बळी पडून जीवनातील शांती हिरावून घेत आहे. आज नातेसंबंध आणि विवाहसंबंध तुटण्यात अहंकार प्रमुख भूमिका बजावतो आहे. सांगायला कारणे काहीही असोत, पण आज विविध देशांमध्ये धुमसत असलेल्या युद्धांचे कारणही अहंकारच आहे, ज्यामुळे असंख्य निष्पाप लोकांचा जीव जातो, पर्यावरणाचा विनाश होतो, संपत्ती वाया जाते आणि संपूर्ण जगावर गंभीर परिणाम होतो. अनेकदा नातेवाईक, शेजारी आणि ओळखीचे लोक अहंकारामुळे आयुष्यभर एकमेकांशी बोलत नाहीत; असे करून त्यांना आयुष्यात काय मिळते, हेच मला कळत नाही.

आपणास माहित आहे का? की जेव्हा आपण राग, चिडचिड, मत्सर, तणाव किंवा वाईट विचारांनी भरून जातो, तेव्हा त्याचा थेट आपल्या स्वतच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो, म्हणजेच इतरांवर रागावल्याने आपले जीवन धोक्यात येते.आपल्या कुटुंबातील, शेजारच्या किंवा ओळखीच्या कोणाला चांगली बातमी मिळाली की, आपल्या मनात मत्सर दाटून येतो. आपण 'लोकांच्या कष्टाकडे दुर्लक्ष करतो आणि चांगल्या गोष्टी इतरांच्याच बाबतीत का घडतात, आपल्या बाबतीत का नाही?' असा विचार करत आपल्या नशिबाला दोष देतो. खोटे देखावे आणि मत्सराच्या भावनाने स्वतःचे मापदंड उंचावण्याचे प्रयत्न अनेकदा आपल्याला समस्यांकडे घेऊन जातात. हेच आजच्या समाजाचे कटू सत्य आहे. माणसाचा अहंकार त्याचे सुख आणि शांती हिरावून घेतो आणि सुंदर, सरळ-साधे, शांततापूर्ण जीवनाचा मार्ग कठीण बनवतो. अहंकार माणसाच्या जीवनाला विनाशाकडे ढकलतो, जणू काही तो स्वतःच आपल्या मृत्यूची चिता तयार करत आहे.



आपल्या सभोवतालच्या अनेक वाईट घटनांमुळे असंख्य लोकांच्या झालेल्या दुःखद अंताच्या बातम्या आपल्याला हादरवून टाकतात. उदाहरणार्थ, आज अनेक पालक आपल्या मुलांना परदेशात किंवा मोठ्या शहरांमध्ये पाठवतात आणि त्यांची मुले परदेशात स्थायिक झाली याचा त्यांना अभिमान वाटतो, अहंकार बाळगतात, पण अनेकदा हेच वृद्ध पालक मरण पावतात, तरीही त्यांची मुले त्यांच्या अंत्यविधीला उपस्थित राहणेही योग्य मानत नाहीत. हेच आपल्या समाजाचे कटू वास्तव आहे.अहंकार अनेकदा आपली खोटी प्रतिमा जपण्यासाठी वास्तवाला विकृत करतो, ज्यामुळे चुका मान्य करणे किंवा टीका स्वीकारणे कठीण होते. जर अहंकाराने आपल्यावर ताबा मिळवला, तर आपण स्वतःलाच बरोबर सिद्ध करण्याच्या ध्यासाने पछाडलेले असतो, ज्यामुळे संघर्ष निर्माण होतो. अहंकारामुळे व्यक्ती स्वतःला महान किंवा परिपूर्ण समजू लागते, ज्यामुळे इतरांबद्दल न्यूनतेची भावना निर्माण होते. अहंकार आपल्याला इतरांच्या मतांची आणि भौतिक यशाची खूप जास्त काळजी करण्यास भाग पाडतो, ज्यामुळे जीवनात चिंता, दुःख आणि उदासी येते. यामुळे लोक चांगले काम करण्याऐवजी चांगले दिसण्याला, शॉर्टकट किंवा सोपे मार्ग निवडण्याला प्राधान्य देतात. अहंकाराचा जीवनावर खोलवर परिणाम होतो. वाढलेला अहंकार आपल्याला काहीतरी नवीन शिकण्यात अडथळा आणतो, अपयशाच्या भीतीमुळे वाढ खुंटवतो आणि सतत इतरांशी तुलना करत राहतो, ज्यामुळे आपल्याला दुःखी वाटते. जेव्हा अहंकार आपल्या नियंत्रणात असतो, तेव्हा आपण खोटा अभिमान दाखवण्याऐवजी स्वतःला सुधारण्यावर लक्ष केंद्रित करतो, ज्यामुळे परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता वाढते, नातेसंबंध अधिक दृढ होतात आणि उत्पादकता वाढते.

स्वतःला समजून घेण्यासाठी, आपल्या कृती, वर्तन, व्यक्तिमत्त्व आणि त्यांचा इतरांवर कसा परिणाम होतो यावर चिंतन करणे महत्त्वाचे आहे. स्वतःचे विश्लेषण करण्यासाठी वेळ काढा आणि अशी क्षेत्रे ओळखा जिथे आपला अहंकार आपल्या निर्णयांवर आणि संवादांवर प्रभाव टाकत आहे. जगण्यासाठी सर्वात महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, पौष्टिक अन्न आणि मन समाधानी असेल तर आयुष्य आनंदाने जगता येते, पण याला प्राधान्य देण्याऐवजी लोक अहंकार, ढोंग आणि गर्वामध्ये आपली शांती गमावतात. आजकाल लोक आपल्या घरासमोरील झाड तोडून त्यावर अतिक्रमण करू इच्छितात, जेणेकरून आपल्या घराची हद्द वाढवता येईल. परंतु या विचारसरणीमुळे देशभरात तापमान वाढला आहे, याकडे कोणाचेच लक्ष जात नाही असे दिसते; प्रत्येकजण स्वार्थी कारणांसाठीच जगत आहे असे वाटते. आपले लक्ष स्वार्था वरून हटवून समाधान मानसिकतेकडे वळवावे. नम्रता आणि शिकण्याची वृत्ती अंगीकारावे.

**'अहंकार हे एक मंद विष आहे जे माणसाच्या सद्गुणांना नष्ट करते.'**

**डॉ. प्रीतम भी. गेडाम**
**८२३७४ १७०४१**

## राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन

आजचा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात १९९९ सालापासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास महामंडळ (टी डी बी) यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो. ११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या मार्गदशनाखाली राजस्थान येथील पोखरणच्या वाळवंटात शक्ती या अण्वस्त्रांच्या चाचण्या दोन टप्प्यात यशस्वी केल्या. दोन दिवसांनी म्हणजे १३ मे रोजी पुन्हा पोखरण २ ऑपरेशन शक्ती अंतर्गत आणखी दोन अण्वस्त्र चाचण्या केल्या. अण्वस्त्रांच्या या सर्व चाचण्या यशस्वी करून भारत अण्वस्त्र संपन्न राष्ट्र बनले. तेंव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी भारत अण्वस्त्र सज्ज झाल्याचे जाहीर केले आणि करोडो भारतीयांची मान अभिमानाने उंचावली. भारताने केलेली ही दुसरी अणूचाचणी होती. १९७४ साली भारताने पहिल्यांदा अणवस्त्रांची चाचणी केली त्यावेळी इंदिरा गांधी या पंतप्रधान होत्या. त्याच्या यशस्वितेचा संकेतांक ( कोडवर्ड ) होता द बुद्धा लाफड - बुद्ध हसला ११ मे १९९८ रोजी दुसऱ्या यशस्वी चाचणीचा संकेतांक होता, द बुद्धा लाफड आगेन - बुद्ध पुन्हा हसला २४ वर्षांनंतर भारताने जमिनीखालुन प्रत्यक्ष अणुस्फोट घडवून आणून ते यशस्वी केले तेंव्हा जगातील साऱ्या देशाने तोंडात बोटे घातले मित्र राष्ट्राने कौतुक केले तर शत्रू राष्ट्राचा जळफळाट झाला. ही अणूचाचणी करताना भारताने कमालीची गुप्तता पाळली होती. अमेरिकेलाही या



अणूचाचणीचा सुगावा लागला नव्हता. या अणू चाचण्यांमुळे भारत जगातील सहावे अण्वस्त्र सज्ज राष्ट्र बनले. याच काळात भारताने विकसित केलले स्वदेशी बनावटीचे पहिले विमान हंस - ३ ने त्याचे पहिले उड्डाण बंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचेच्या ( सीएसआयआर ) विमान नॅशनल एरोस्पेस लॅबरोटरीज ( एनएएल ) ने विकसित केले होते. तसेच ११ मे १९९८ रोजीच संरक्षण संशोधन विकास संघटना ( डीआरडीओ ) त्रिशूल क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी पूर्ण केली गेली. कमी पल्ल्याचे पण जमिनीवरून हवेत जलद मारा करणारे त्रिशूल हे भारताच्या एकात्मिक गायडेड क्षेपणास्त्र कार्यक्रमाचा एक भाग होता. ११ मे च्या अणूचाचणी नंतर भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात हे प्रचंड यश मिळवले होते म्हणूनच त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून घोषित केला.

**श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 38 | 295/1/39 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/39 |
| 39 | 295/1/3A | Private | Non-Agriculture | 0.013792 | Mahammad Isaak Mahammad Unus 295/1/3A |
| 40 | 295/1/4 | Private | Non-Agriculture | 0.005566 | Shahid Khan Ismail Khan 295/1/4 |
| 41 | 295/1/40 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/40 |
| 42 | 295/1/41 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/41 |
| 43 | 295/1/42 | Private | Non-Agriculture | 0.005375 | Shahid Khan Ismail Khan 295/1/42 |
| 44 | 295/1/43 | Private | Non-Agriculture | 0.0051 | Shrikant Ramesh Chaudhary 295/1/43 |
| 45 | 295/1/44 | Private | Non-Agriculture | 0.005 | Navalkishore Dinkarrao Aakhare. 295/1/44 |
| 46 | 295/1/45 | Private | Non-Agriculture | 0.005 | Navalkishore Dinkarrao Aakhare. 295/1/45 |
| 47 | 295/1/46 | Private | Non-Agriculture | 0.005 | Sudhir Gunwantrao Vanve 295/1/46 |
| 48 | 295/1/47 | Private | Non-Agriculture | 0.005566 | Shahid Khan Ismail Khan 295/1/47 |
| 49 | 295/1/4B | Private | Non-Agriculture | 0.014777 | Mahammad Isaak Mahammad Unus 295/1/4B |
| 50 | 295/1/5 | Private | Non-Agriculture | 0.005566 | Shahid Khan Ismail Khan 295/1/5 |
| 51 | 295/1/5A | Private | Non-Agriculture | 0.014777 | Mujabbir Raheman Gulsher Khan 295/1/7A |
| 52 | 295/1/5B | Private | Non-Agriculture | 0.014777 | Mujabbir Raheman Gulsher Khan 295/1/5B |
| 53 | 295/1/6A | Private | Non-Agriculture | 0.014777 | Syd. Aashiq Syd. Rashik 295/1/6A |
| 54 | 295/1/6B | Private | Non-Agriculture | 0.014777 | Muhammad Salim Muhammad, Qadir Syd. Ashiq Syd Rashik 295/1/6B |
| 55 | 295/1/7A | Private | Non-Agriculture | 0.014777 | Syd. Aashiq Syd. Rashik 295/1/7A |
| 56 | 295/1/7B | Private | Non-Agriculture | 0.014777 | Syd. Aashiq Syd. Rashik 295/1/9B |
| 57 | 295/1/8A | Private | Non-Agriculture | 0.009851 | Mo. Salim Abdul Kaleem 295/1/8A |
| 58 | 295/1/9A | Private | Non-Agriculture | 0.014777 | Kamrujja Badiuzma, Kazim Khan Kasam Khan 295/1/9A |
| 59 | 295/1/9B | Private | Non-Agriculture | 0.014777 | Zabiullah Khan Zameer Khan 295/1/9B |
| 60 | 295/5 | Private | Agriculture | 0.24 | Mo. Salim Abdul Qadir, Syd Ragib Syd Chand, Syd Ashiq syd. Rasheed 295/5 |
| 61 | 302/1 | Private | Agriculture | 0.42 | Mo. Salim Abdul Qadir, Syd Ragib Syd Chand, Syd. Ashiq, syd. Rasheed 302/1 |
| 62 | 318 | Government | Agriculture | 0.1867 | Central Government Railway 318 |
| 63 | 319 | Government | Agriculture | 0.4334 | E-Class Development office 319 |
| 64 | 40/1 | Private | Agriculture | 0.04 | Rekha Gajanan Sapre/ Rahul Gajanan Sapre/ Pooja Vaibhav Muni/ Madhuri Gajanan Sapre 40/1 |
| 65 | 40/1 | Private | Agriculture | 0.01 | Subodh Jamanlaal Goyanka 40/1 |
| 66 | 40/1 | Private | Agriculture | 0.04 | Mo. Rajik Mo. Issahak 40/1 |
| 67 | 40/1 | Private | Non-Agriculture | 0.07 | Mo. Rajik Mo. Issahak 40/1 |
| 68 | 40/1A | Private | Agriculture | 0.09 | Mayuri Navanish Agrawal / Shweta Niraj 40/1A |
| 69 | 40/2 | Private | Agriculture | 0.12 | Baburao Januji Waghmare/ Gajanan Januji 40/2 |
| 70 | 40/3 | Private | Agriculture | 0.05 | Mohammad Farhan Mohammad Rajjak/ Mohammad Faizan Abdul Rajjak 40/3 |
| 71 | 40/4 | Private | Agriculture | 0.05 | kamalabai ashok khandelwal 40/4 |
| 72 | 40/4 | Private | Agriculture | 0.09 | Shubham Madan Agrawal 40/4 |
| 73 | 41 | Private | Agriculture | 0.04 | Mehrunnisa Ja. Shamiulla Kha. 41 |
| 74 | 42/2 | Government | Agriculture | 0.01 | M.S.E.D.C.L. 42/2 |
| 75 | 45/1/D | Private | Agriculture | 0.07 | Vidarbh Jining for Subodh Jamanlal Goyanka & Sarita Subodh Goyanka 45/1/D |
| 76 | 45/1/K | Private | Non-Agriculture | 0.04 | M/s. J.S. Cotton Industries Pro.Pa.Subodha Jamanlal Goynaka 45/1/K |
| 77 | 45/3 | Private | Non-Agriculture | 0.07 | Mo. Rajik Mo. Esak 45/3 |
| 78 | 45/3 | Private | Non-Agriculture | 0.04 | M/s. J.S. Cotton Industries Pro.Pa.Subodh Jamanlal Goynaka 45/3/A |
| 79 | 76 | Government | Agriculture | | E-Class Government 76 |
| 80 | 78/2 | Private | Non-Agriculture | 0.002 | Syd. Jakir Syd Nabi 78/2 |
| 81 | 8 | Private | Non-Agriculture | 0.05 | Vikram Shriram Gawande 8 9/1/A |
| 82 | 9/1/A | Private | Non-Agriculture | 0.02 | Rajeshkumar Shyamsundar Kediya 9/17A |
| Village wankhedpur | | | | | |
| 83 | 10 | Private | Non-Agriculture | 0.02 | Hasanshaha Anwarshaha 10 |
| 84 | 10 | Private | Non-Agriculture | 0.11 | Mehrunnisa J. Shamiulla Khan 10 |
| 85 | 16 | Government | Non-Agriculture | 0.1 | Krushi Utpanna Bazar Samiti 15 |
| 86 | 16 | Government | Non-Agriculture | 0.002815 | Sarpanch Gram Panchayat 16 |
| 87 | 16 | Private | Agriculture | 0.07 | Sheikh Kadir Sheikhji & Aseem Khan Kasam Khan (Joint Area) 16 |
| 88 | 16 | Private | Agriculture | 0.0154 | Aklimoddin Faimoddin 16 |
| 89 | 16/1 | Private | Non-Agriculture | 0.015108 | Akash Subhash Mahalle & Tulsiram Kale 16/1 |
| 90 | 16/2 | Private | Non-Agriculture | 0.01461 | Vilas Tukaram Pasalwad 16/2 |
| 91 | 16/3 | Private | Non-Agriculture | 0.014584 | Muneboddin Amjad Kazi Moziboddin Kazi 16/3 |
| 92 | 16/4 | Private | Non-Agriculture | 0.014559 | Muneboddin Amjad Kazi Moziboddin Kazi 16/4 |
| 93 | 16/5 | Private | Non-Agriculture | 0.014524 | Abdul Noman s/o Hamid 16/5 |
| 94 | 16/6 | Private | Non-Agriculture | 0.014464 | Abdul Noman s/o Hamid 16/6 |
| 95 | 16/7 | Private | Non-Agriculture | 0.014319 | Mujib Khan Yusuf Khan 16/7 |
| 96 | 16/8 | Private | Non-Agriculture | 0.014319 | Mujib Khan Yusuf Khan 16/8 |
| | | Total | | 4.982062 | |

जा.क्र. जिमाका/ अकोला/ जाहिरात/२०/२०२६

[F. No. RO/MUM/NH(O)/2023-24/72/31] **SHAIKH AMINKHAN, Director**

# ११२ क्रमांकावर खोटी माहिती देणे भोवले ; तरुणाविरुद्ध गुन्हा

■ **प्रतिनिधी | खेट्री** ■

आपत्कालीन मदतसेवेच्या ११२ क्रमांकावर भाचीवर अत्याचार झाल्याची खोटी माहिती देऊन पोलिस प्रशासनाची दिशाभूल करणाऱ्या नवेगाव येथील एका तरुणाविरुद्ध चान्नी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई ९ मे रोजी करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नवेगाव येथील गणेश महादेव झाटे (वय २५) याने ११२ क्रमांकावर फोन करून आपल्या भाचीवर अत्याचार झाल्याची माहिती दिली होती. ही माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयामार्फत चान्नी पोलिस स्टेशनला प्राप्त होताच ठाणेदार रवींद्र लांडे यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तत्काळ पोलिस पथकासह नवेगाव गाठले. घटनास्थळी चौकशी केली असता, अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी खोटी माहिती देऊन ११२ क्रमांकाचा गैरवापर केल्याप्रकरणी गणेश झाटे याला ताब्यात घेत त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## भाचीवर अत्याचार झाल्याची खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल



### खोटी माहिती म्हणजे खऱ्या गरजूंना अडथळा

११२ क्रमांक ही नागरिकांच्या मदतीसाठी सुरू करण्यात आलेली आपत्कालीन सेवा आहे. तिचा गैरवापर केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. खोटी माहिती देणे म्हणजे केवळ कायद्याचा भंग नसून, खऱ्या गरजूंच्या मदतीत अडथळा निर्माण करणे आहे. त्यामुळे नागरिकांनी जबाबदारीने वागावे आणि अफवा किंवा खोट्या तक्रारींपासून दूर राहावे.

**रवींद्र लांडे,** ठाणेदार
चान्नी पोलिस ठाणे, अकोला

## आर्ट ऑफ लिव्हिंगचा' अनसंग एवरीडे हीरोज' पुरस्कार सोहळा

**अकोला :** आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ४५ व्या स्थापना वर्षानिमित्त व गुरुदेव श्री श्री रविशंकरजींच्या ७० व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने अकोल्यात 'अनसंग एवरीडे हीरोज पुरस्कार' सोहळा संपन्न झाला.स्थानिक आरएलटी कॉलेजमध्ये संपन्न या सोहळयात समाजात निस्वार्थ सेवा करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करण्यात आला.यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या सोहळयात प्रमुख अतिथी म्हणून सौ सुहासिनी संजय धोत्रे, जिला विधि सेवा प्राधिकरण अकोलाचे सचिव दिनानाथ दाभाडे, डॉ. हेडगेवार हॉस्पिटलचे अध्यक्ष नरेंद्र उपाख्य बाबासाहेब पाठक उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. ६वे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांच्या न्यायालयात**
**'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'**
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र. २

दावा रु. /-- वि.दि.दा.नं.३८०/२०२५
चौ. ता.: ११/०६/२०२६

**साई कन्स्ट्रकशन ....... विरुध्द... प्रभाकर**

**बनाम :-** 1. Shri. Prabhakar Nimbalkar 2.Kusum Shankarprasad Mishra All R/o- 1779, Kalal ki Chawl, Akola Tq. Dist. Akola

ज्याअर्थी वादी यांनी 'SUIT FOR EVICTION, POSSESSION, ARREARS OF RENT AND INQUIRY INTO FUTURE MESNE PROFIT' यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक १६/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेलो असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पुष्ट्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल.आगणी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक २७/०४/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय (व.स्तर.), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६८८/२०२६ प्रोसेस नं.६१०९/२०२६
चौ.ता. २२/०६/२०२६ दिनांक : ०२/०५/२०२६

**अर्जदार :** १. साधना रामदास आठवले रा. वरोडी, पोस्ट सांगळूद, ता. जि. अकोला. २. वैशाली राजू वरघट रा. राउंड रोड क्वार्टर, गजानन मंदिर जवळ, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९८९०८५७७८४

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : चित्रलेखा ध्रुव उर्फ ध्रुवकुमार खंडारे
**पत्ता :-** रा. व्दारा साधना रामदास आठवले रा. वरोडी, पोस्ट सांगळूद, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या. न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत चित्रलेखा ध्रुव उर्फ ध्रुवकुमार खंडारे यांचे दि. २४/०९/२०२३ रोजी वरोडी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६६९/२०२६ प्रोसेस नं.५८५३/२०२६
चौ.ता. २५/०६/२०२६ दिनांक : २९/०४/२०२६

**अर्जदार :** १. सोमेश मनिषराव गुलाहे २. मेघा मनिषराव गुलाहे ३. कुसुमबाई लक्ष्मण गुलाहे सर्व रा. दत्त कॉलनी, गौरक्षण रोड, मोरे चक्की जवळ, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९०७५५५५४११

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. मनिष लक्ष्मण गुलाहे २. नयना मनिष गुलाहे
**पत्ता :-** रा. व्दारा सोमेश मनिषराव गुलाहे रा. दत्त कॉलनी, गौरक्षण रोड, मोरे चक्की जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्तं अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मनिष लक्ष्मण गुलाहे यांचे दि. ०३/११/२०२१ रोजी टाटा मेमोरियल खारघर येथे व तसेच मयत नयना मनिष गुलाहे यांचे दि. ०८/०८/२०१७ रोजी त्यांच्या राहत्या घरी दत्त कॉलनी, गौरक्षण रोड, मोरे चक्की जवळ, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६६४/२०२६ प्रोसेस नं.५८५२/२०२६
चौ.ता. २५/०६/२०२६ दिनांक : २९/०४/२०२६

**अर्जदार :** प्रसन्न अन्नासाहेब रवाळे रा. पातुर नंदापूर, ता. जि. अकोला. मो. नं. ९३०९८०४०१६

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. अण्णासाहेब महादेव रवाळे २. सुशीलाबाई अण्णासाहेब रवाळे
**पत्ता :-** रा. पातुर नंदापूर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अण्णासाहेब महादेव रवाळे यांचे दि. १५/०१/२०२६ रोजी राहत्या घरी मौजे पातूर नंदापूर, ता. जि. अकोला येथे व तसेच मयत सुशीलाबाई अण्णासाहेब रवाळे यांचे दि. १७/०९/२०२४ रोजी विघ्नहर्ता हॉस्पीटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६६८/२०२६ प्रोसेस नं.५६६६/२०२६
चौ.ता. १८/०६/२०२६ दिनांक : २७/०४/२०२६

**अर्जदार :** १. निर्मला मोहन वाघमारे २. राहुल मोहन वाघमारे ३. प्रफुल मोहन वाघमारे सर्व रा. राधाकृष्ण टॉकिज समोर, न्यु भिम नगर, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९८८१५५७०४१

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मोहन दयाल वाघमारे
**पत्ता :-** रा. व्दारा निर्मला मोहन वाघमारे रा. राधाकृष्ण टॉकिज समोर, न्यु भिम नगर, कृषी नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मोहन दयाल वाघमारे यांचे दि. १५/१०/२०२५ रोजी राहत्या घरी, न्यु भिम नगर, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७१०/२०२६ प्रोसेस नं.६१०४/२०२६
चौ.ता. ०७/०७/२०२६ दिनांक : ०२/०५/२०२६

**अर्जदार :** १. सुनंदा काशिनाथ इंगळे २. जयकुमार काशिनाथ इंगळे ३. राहुल काशिनाथ इंगळे ४. शिशुपाल काशिनाथ इंगळे १ ते ४ रा. नंदा निकेतन, जागृती विद्यालयाजवळ, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला. ५. निलांबरी काशिनाथ इंगळे रा. फ्लॅट नं. १४४/८, दुसरा माळा, श्री पारलेश्वर को. ऑप. सोसायटी, शहाजीराजे रोड, विले पार्ले ईस्ट, मुंबई. मुंबई उपनगर

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : काशिनाथ भिकाजी इंगळे
**पत्ता :-** रा. नंदा निकेतन, रणपिसे नगर, जागृती विद्यालयाच्या गेटसमोर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत काशिनाथ भिकाजी इंगळे यांचे दि. २९/०१/२०१० रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १५६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# अप्पर वर्धा जलवाहिनीची दुरुस्ती युद्धपातळीवर

## पाणीपुरवठा आहे खंडीत, नागरिकांची प्रतीक्षा



**नांदगाव पेठ -** नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरातील माहुली जहागीरजवळ गुरुवारी सकाळी अप्पर वर्धा जलाशयाची १५०० मिमी व्यासाची मुख्य जलवाहिनी अचानक फुटल्याने एकच खळबळ उडाली होती. प्रचंड दाबामुळे पाण्याचे उंच फवारे हवेत उसळत होते. काही क्षणांतच परिसर जलमय होऊन लाखो लिटर पाणी वाया गेले. घटनेची माहिती मिळताच जीवन प्राधिकरणचे अभियंता, अधिकारी आणि कर्मचारी यांनी तातडीने उपाययोजना करण्यास सुरुवात केली. युद्धपातळीवर दुरुस्तीच्या कामाला प्रारंभ झाल्यानंतर गळती रोखण्यास यंत्रणेला अखेर यश मिळाले.

ही जलवाहिनी अमरावती शहरासह एमआयडीसी परिसरासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

त्यामुळे रात्रीपासूनच युद्धपातळीवर दुरुस्ती मोहीम हाती घेण्यात आली. जेसीबी, पोकलेन, क्रेन व इतर यंत्रसामग्रीच्या सहाय्याने मोठे उत्खनन करण्यात आले. फुटलेल्या पाईपचा अचूक भाग शोधण्यासाठी कर्मचाऱ्यांना मोठी कसरत करावी लागली.

दरम्यान, सतत वाहणारे पाणी, चिखल आणि पाईपमधील प्रचंड दाब यामुळे दुरुस्तीच्या कामात अनेक अडथळे निर्माण होत होते. काही वेळ तर कामगारांना पाण्याच्या प्रवाहात उतरून काम करावे लागले. जीव धोक्यात घालून कर्मचारी आणि तांत्रिक पथकाने अखंड प्रयत्न सुरू ठेवले. अनेक तासांच्या मेहनतीनंतर अखेर सायंकाळपर्यंत गळती थांबवण्यात यश आले.

मात्र, जलवाहिनीतील दाब पूर्णपणे पूर्ववत करण्यासाठी तसेच संपूर्ण यंत्रणा सुरळीत सुरू होण्यासाठी आणखी वेळ लागणार असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरासह अमरावती शहरातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. सध्या गळती नियंत्रणात आली असली तरी संपूर्ण पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार असल्याने नागरिकांना पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# मनपा झोन क्र. १ मध्ये जनगणना प्रशिक्षण

## सहा. आयुक्त नंदकिशोर तिखीले यांचे प्रगणकांना मार्गदर्शन

**अमरावती/ प्रतिनिधी**

अमरावती महानगरपालिका झोन क्र. १ अंतर्गत बॅच ७ व ८ साठी आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण सत्रात जनगणना कार्याच्या प्रभावी अंमलबजावणीवर विशेष भर देण्यात आला. या प्रशिक्षणादरम्यान सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखीले यांनी रामपुरी कॅम्प येथील प्रगणक व पर्यवेक्षकांशी सविस्तर संवाद साधत त्यांना जनगणनेचे महत्त्व पटवून दिले.

प्रशिक्षण सत्राची सुरुवात जनगणनेच्या उद्दिष्टे, प्रक्रिया व जबाबदाऱ्या यांचे सखोल मार्गदर्शन देऊन करण्यात आली. यावेळी सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखीले यांनी सांगितले की, जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नसून देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. शासनाच्या विविध योजना, निधी वाटप, पायाभूत सुविधा विकास, शैक्षणिक व आरोग्य सेवा यांचे नियोजन अचूक जनगणनेवर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक प्रगणक व पर्यवेक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

सहाय्यक आयुक्त तिखीले यांनी पुढे स्पष्ट केले की, जनगणनेदरम्यान नागरिकांकडून



मिळणारी माहिती ही गोपनीय ठेवली जाते आणि ती केवळ शासकीय नियोजनासाठीच वापरली जाते. त्यामुळे नागरिकांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून अचूक माहिती मिळवणे हे प्रगणकांचे प्रमुख कर्तव्य आहे. त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना जनतेशी सौजन्यपूर्ण व संयमाने संवाद साधण्याचे आवाहन केले.

प्रशिक्षणादरम्यान प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणी, शंका व प्रश्न यांवर चर्चा करण्यात आली. तिखीले यांनी प्रत्येक मुद्द्यावर सविस्तर मार्गदर्शन करत त्यांचे निरसन केले. तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, डेटा संकलनातील अचूकता, वेळेचे नियोजन आणि अहवाल सादरीकरण याबाबतही सूचना देण्यात आल्या.

या प्रसंगी सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखीले यांनी सर्वांना प्रोत्साहित करत सांगितले की, जनगणना ही एक राष्ट्रीय जबाबदारी असून ती यशस्वी करण्यासाठी प्रत्येकाने समर्पणाने कार्य करणे आवश्यक आहे. 'आपण केलेले काम थेट देशाच्या विकासाशी जोडलेले आहे,' असे सांगत त्यांनी कर्मचाऱ्यांमध्ये कर्तव्यभावना व उत्साह निर्माण केला.प्रशिक्षण सत्रामुळे उपस्थित प्रगणक व पर्यवेक्षकांमध्ये जनगणनेबाबत जागरूकता वाढली असून त्यांनी आपले काम अधिक जबाबदारीने पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमामुळे झोन क्र. १ मध्ये जनगणना प्रक्रिया अधिक प्रभावी व सुयोग्य पद्धतीने पार पडण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# श्री हव्याप्र मंडळाचे चिखलदरा येथे राष्ट्रीय योग संमेलन व राष्ट्रीय योगासन स्पर्धा १५ व १६ ला

## पत्रपरिषदेमध्ये डॉ. श्रीकांत चेंडके, डॉ. अरुण खोडस्कर यांची माहिती

**अमरावती / प्रतिनिधी**

विदर्भातील थंड हवेचे ठिकाण चिखलदरा येथे श्री ह.व्या.प्र. मंडळा तर्फे १९७७ पासून सुरु उन्हाळी योग्य शिबीर व सोबतच तेथे योग, निसर्गोपचार केन्द्राची स्थापना सुध्दा करण्यात आली. हे वर्ष शिबिरांचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून त्यानिमित्त मंडळाच्या या योग केन्द्रात १५ व १६ मे २०२६ ला भव्य योग व निसर्गोपचारा संमेलन, आजी माजी शिबिरार्थांचा मेळावा व विविध वयोगटांतील मुले-मुली, स्त्री-पुरुषांकरीता राष्ट्रीय योगासन स्पर्धा आयोजित करण्यात आले असून या सोहळा व स्पर्धांना जवळपास तीनशे योग प्रेमी सहभागी होतील.

उद्घाटन श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्याहस्ते होणार असल्याची माहिती श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके व डॉ. अरुण खोडस्कर यांनी दिली.

११ मे ते ३१ मे पर्यंत लहान मुलं-मुली, तरुण-तरुणी प्रौढ स्त्री पुरुषांकरीता येथे योग व निसर्गोपचार प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. त्याचप्रमाणे वृध्द व व्याधीग्रस्त करीता निसर्गोपचाराची व्यवस्था असते. यामध्ये जवळपास शंभर ते दिडशे शिबिरार्थी भाग घेत असतात. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, व्यापारी, शेतकरी, व्याधीग्रस्त इत्यादी सहभागी होत असतात.

संमेलनाचे उद्घाटन १५ मे ला सकाळी ११ वाजता मंडळाच्या सचिव व उपप्राचार्या डॉ. माधुरी चेंडके यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर दैनिक लोकमतचे संपादक व साहित्यिक श्रीमंत माने करतील. यावेळी मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्यूकेशनचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, चिखलदरा नगर परिषदेचे अध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर, नगर परीषदेचे मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड, वनाधिकारी अनंत डिगोळे उपस्थित असतील. विशेष उपस्थितीमध्ये छत्रपती संभाजीनगरचे योगतज्ज्ञ डॉ. उत्तमराव काळवणे, तसेच ठाण्याच्या घंटाळी योग केंद्राच्या योग व स्त्रिरोग तज्ज्ञ डॉ. उलका नातू असतील.

उद्घाटनानंतर योग तज्ज्ञांची व्याख्याने, योगोपचार मार्गदर्शन, संशोधन पेपर वाचन, प्रात्यक्षिक



इ. चे आयोजन होईल. १६ मे ला पहाटे ध्यान, धारणा, प्राणायाम, शुध्दीक्रिया इ. चा सराव होईल. मंडळाचे योग मार्गदर्शक प्राचार्य डॉ. अरुण खोडस्कर मार्गदर्शन करतील.

त्यानंतर विविध वयोगटांतील मुला-मुली,' स्त्री-पुरुषांकरीता योगासन स्पर्धा आयोजित होईल.

शेवटी सायंकाळी ४ वाजता समारोप व बक्षिस वितरण समारंभ मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके यांचे अध्यक्षतेखाली मेळघाटचे आमदार केवलराम काळे, चिखलदरा नगरसेवक आल्हाद कलोती, समाजसेवक चंद्रकांत जाजोदिया उपाख्य लप्पी भैया, चिखलदरा वनप्रशिक्षण केन्द्राच्या प्राचार्या मुक्ताबाई टेकाडे उपस्थित असतील. यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते रंगीत स्मरणीका प्रकाशित होईल. यामध्ये तज्ज्ञांचे लेख, चिखलदरा परिसराची माहिती असेल.

या कार्यक्रमांत महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील जवळपास तीनशे योगप्रेमियांनी पंजीकरण केले आहे.

पत्र परिषदेला मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव डॉ. माधुरी चेंडके, मंडळाचे कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, संमेलनाचे मुख्य मार्गदर्शक व पन्नास वर्षापासून चिखलदरा योग केन्द्राशी संबंधीत असलेले डॉ. अरुण खोडस्कर, योग निसर्गोपचार प्रमुख डॉ. सुनील लाबडे, संमेलन प्रमुख डॉ. प्रविण अनासने, डॉ. नितीन काळे, स्पर्धा प्रमुख प्रा. संदिप मांडळे, प्रा. प्रतिक पाथरे, प्रा. संजय वाघमारे उपस्थित आहे.

# अंजनगाव शहरात ईच्छापूर्ती श्री शिवमहापुराण कथेचे आयोजन

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी**

अंजनगाव सुर्जी शहरातील बोराळा रोडवरील येवकार मंगल कार्यालयात ईच्छापूर्ती श्री शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. मे महिन्यात अधिक जेष्ठ मास ( अधिक महिना ) असून अधिक मास महिन्यात हिंदू धर्मानुसार या महिन्यात दान, धर्म, तप, भजन, पुजन कथा श्रवण चे महत्व असते. त्यामुळे अधिक मास महिन्यात केलेले दान ,तप मुळे मिळणारे फळ दुप्पटीने जिवनात प्राप्त होते . त्यामुळे अंजनगाव परिसरातील भाविक भक्तांना यांचा लाभ मिळावा यासाठी २१ मे ते २७ मे पर्यंत ईच्छापूर्ती श्री शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले.

कथेची वेळ दुपारी ४ ते ७ वाजेपर्यंत असणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. तर कथेच्या सहाव्या दिवशी पित्राचे मोक्ष प्राप्ती करीता ज्यांना पितृ दर्पण करायचे असल्यास त्यांनी आयोजन समितीचे आयोजन ब्रिजमोहन झांवर ७०२०७१०४१७ या नंबरवर संपर्क साधुन आपल्या नावाची नोंद करण्यात यावी असे ईच्छा पूर्ती श्री शिवमहापुराण आयोजन समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# शहीद भगतसिंह युनियनचा आंदोलनाचा इशारा

**अमरावती-** मनपा अतिक्रमण विभागाच्या वतीने मंगळवारी गाडगे नगर ते कठोरा नाका परिसरात हॉकर्स व्यापाऱ्यांवर कारवाई करण्यात आली होती. यामध्ये अनेक हात गाड्या आणि साहित्य जप्त करण्यात आले होते. या कार्यवाईमुळे शेकडो व्यवसायीकांवर उपासमारीची वेळ आली असून कुटुंबीयांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर शहीद भगतसिंह हॉकर्स युनियनच्या वतीने गुरुवारी मनपा आयुक्तांना निवेदन देऊन साहित्य परत करण्याची मागणी करण्यात आली. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आलेला आहे. गणेश मारोटकर यांच्या नेतृत्वात निवेदन देतेवेळी दीपक लोखंडे सुरज चढार, शिव बजाज, विजय राठोड, अभय रायकवार, मो.अयाज समद, कुणाल गडे, संकेत तिडके, आदित्य चव्हाण, श्रेयस जाधव ,गजानन उईके,अनिल उईके आदि उपस्थित होते.

# वादळी वाऱ्यामुळे घरावर कोसळले झाड

**अमरावती-** गेल्या काही दिवसापासून गर्मीमुळे नागरिक त्रस्त झाले आहे. रोज तापमान वाढत आहे.तापत्या उन्हात गुरुवारी दुपारी अचानक वातावरणात परिवर्तन झाले आणि दुपारनंतर वादळी वारे वाहू लागले. वादळी वाऱ्यामुळे चपरासीपुरा परिसरात एक कडू लिंबाचे झाड घरावर कोसळले. यामुळे घराचे मोठे नुकसान झाले आणि परिसरातील महावितरण चे तार तुटून पडल्याने विज पुरवठा बाधित झाला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी या घटनेमध्ये नाही झाली. चपरासीपुरा परिसरात असलेले कडूलिंबाचे झाड निर्मला महेश पाली यांच्या घरावर कोसळले. यावेळी घरात कोणी नसल्याने जनहानी टळली पण घराचे मोठे नुकसान झाले. परिसरातील विजेचे तारही तुटून पडले होते. काही काळासाठी वीजपुरवठा बाधित झाला होता.

# विभागीय लोकशाही दिन आज

**अमरावती :** विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी दि. ११ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे.विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाही दिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांचे तक्रार अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाही दिनानंतर) विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे. नागरिकांनी तक्रार अर्ज dcgamravati@gmail.com efkeâbkee dcg_amravati@rediffmail.com या ई-मेलवर विहित नमुन्यात पाठविण्याचे आवाहन आयुक्तालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

# रोजगार मेळाव्यात १० उमेदवारांची अंतिम निवड

**अमरावती :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक जिल्हा कार्यालयात 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा' संपन्न झाला. या मेळाव्यात १८० उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन १० जणांची अंतिम, तर ४६ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी कौशल्य विकास अधिकारी अभिषेक ठाकरे, सुभाष गुल्हाने, कृपा अर्गुलेवर, संदीप यादव, पंकज कचरे उपस्थित होते. मेळाव्यात प्रेसिजन मॅपिंग, आशिष एंटरप्रायजेस, श्रीराम लाईफ इन्शुरन्स, हैदराबाद सिक्युरिटी, एच.आर. जाधव मेअर्स आणि एल.आय.सी. या सहा नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र नागठाणा जैन मंदिरात मुर्त्यांची चोरी

**वरूड -** रवाळा येथील श्री क्षेत्र नागठाणा परिसरातील जैन मंदिरातील मुर्त्यांची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याने याप्रकरणी शे.घाट पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. माहितीनुसार, रूपेश किशोर इंदाने हे गेल्या सात वर्षापासून नागठाणा जैन मंदीरात पुजारीचे काम पाहतात. ६ मे रोजी रात्री अकराच्या सुमारास जैन मंदीरातील वेदीवरील पितळी अष्टधातुच्या संपूर्ण मुर्त्या मंदीरात व्यवस्थितीत ठेवल्या होत्या.

यावेळी मंदीरातील काम पाहणारे २ माताजी व एक जैन साधू असे एकूण १० लोक मंदीरातील खोल्यांमध्ये निद्रा घेत होते. पहाटे पाचच्या सुमारास लता महात्मे हिने रूपेशला येऊन सांगितले की, मंदीरातील एकूण पाच मुर्त्या व एका मुर्ती वरील छत्र दिसून येत नाही. त्यामुळे मंदीरातील मुर्त्यांची पाहणी केली तेव्हा ९ इंच उंचीची ११ किलो वजनाची २१ हजाराची श्री आदिनाथ स्वामिची मूर्ती, ७ इंच उंचीची ५ किलो वजनाची ९ हजाराची मुनीसुव्रतनाथांची मुर्ती, ५ इंच उंचीची ४ किलो वजनाची ७ हजाराची श्री विमलसागर गुरूमुर्ती, ५ इंच उंचीची ४ किलो वजनाची ७ हजाराची सन्मती सागर गुरूमुर्ती, ७ इंच उंचीची ५ किलो वजनाची ९ हजाराची पद्मावती देवीमुर्ती, ४ हजाराचे पाषान मुर्ती वरील २ किलो वजनाचे छत्र अशा प्रकारे वेदीवरील ठेवलेल्या अष्ट धातुच्या मुर्त्या व एका पाषाण मुर्ती वरील ३१ किलो वजनाचे ५७ हजाराचे छत्र अज्ञात चोरटयाने लंपास केल्याचे आढळून आले. या प्रकरणी पुजारी रूपेश इंदाने यांनी शे.घाट पोलिसांत ७ मे रोजी तक्रार दाखल केली आहे. पोलिसांचा तपास सुरू आहे.

# मिलिंद विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**खल्लार-** नजिकच्या गौरखेडा( चांदई )येथिल मिलिंद विद्यालयाचा दहावीचा निकाल निकाल ७५ टक्के लागला असून विद्यालयातून सर्वाधिक गुण घेऊन प्रथम येण्याचा मान प्राची किशोर वंजारी या विद्यार्थिनीने मिळविला आहे. प्राची वंजारीने ८५ टक्के गुण प्राप्त केले आहे. द्वितीय क्रमांक रोहिणी संतोष वानखडे हिने ८१ टक्के, कोमल सुभाष इंगळे हिने ८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे. याचबरोबर कौसर पठाण, नव्या खंडारे, संबोधी तायडे, ट्विंकल राऊत यांनी चांगले गुण मिळवून प्राविण्यश्रेणीमध्ये चार विद्यार्थी,



प्रथम श्रेणीमध्ये अकरा विद्यार्थी व द्वितीय श्रेणीमध्ये सहा विद्यार्थी व तृतीय श्रेणीमध्ये दोन विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांनी विद्यालयाचे नाव मोठे केले आहे. त्यानिमित्त त्यांचा सत्कार समारंभ विद्यालयात शाळा समितीचे सभासद नूरखा पठाण, अरविंद खंडारे ,सुभाष इंगळे ,अनिल इंगळे, मुख्याध्यापक अमित वानखडे व विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रमुख उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या मातापित्यांचा सत्कार करण्यात आला.

उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे राहुल व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर, अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, संचालिका शुभांगी अभ्यंकर यांनी कौतुक केले आहे.

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार **श्री.शरद चंमतराव सयाम,** रा.न्यू गणेश विहार साई नगर, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी मला दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी सर्वत्र आम जनतेस जाहीर नोटीस देतो की, माझे पक्षकार यांनी खाली नमुद शेत मालकासोबत त्यांचा ताब्यातील व मालकीतील प्लॉट खरेदी करण्याचा सौदा केला आहे. सौद्यातील प्लॉटचे वर्णन खालीलप्रमाणे- शेखर मनोहर चन्ने यांचे मालकीचा व ताब्यातील प्लॉट मौजा निंभोरा खुर्द, ता.जि.अमरावती भूमापन क्र.५/४/११/ए क्षेत्रफळ १.६२ चौ.मी. १७४३ चौ.फुट, महसूल आकारणी ५९३ रु. ज्याच्या दिशा - पुर्वेस - लेआऊट मधील रोड, पश्चिमेस - प्लॉट क्र.२१-ब, उत्तरेस - प्लॉट क्र.१९-ब, दक्षिणेस - प्लॉट क्र.१८-ब व महसूल दप्तरी याची फेरफार नोंद २०३५१/२०२०.

या वरील नमुद वर्णन केलेला व चतुःसिमेतील खुला प्लॉट या विषयी कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हक्क, ताबा, कर्ज, गहाण, दान, बोजा, बक्षीस, खरेदी, लीज, करार, जप्ती, जामीन, अन्न वस करार, नोटरी केलेला करार, खरेदी करारनामा, इतर वारस, मृत्यूपत्र न्यायालयातील व न्यायालयाबाहेरील वाद, चतुःसिमेबद्दल वाद वगैरे, ताब्यावरुन वाद, कसलाही प्रकारचा हक्क, अधिकार, संबंध इत्यादी असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांच्या आत आम्हाला लेखी कागदपत्रासह कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. वरील मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची लेखी तक्रार हरकत न आल्यास वरी नमुद प्लॉट हा ख रेदी व्यवहार करण्यास योग्य व निर्जोखमी आहे असे समजून माझे पक्षकार वरील नमुद प्लॉटविषयी खरेदीचा व्यवहार वरील नमुद व्यक्तिसोबत पूर्ण करुन घेतील. मग त्यानंतर वरील नमुद प्लॉटसंबंधी कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तक्रार चालणार नाही, विहीत कालावधीनंतर केलेल्या तक्रारीच्या परिणामास व खर्चास ती तक्रार करणारी व्यक्ती सर्वस्वी जबाबदार राहील व माझे पक्षकार यांची कोणतीही जबाबदारी राहणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

खरेदी घेणार तर्फे अधिवक्ता
(ॲड.निखील पुरुषोत्तमराव देशमुख)
**शिवप्रस्थ** १२ब, वृंदावन कॉलनी,
स्कूल ऑफ स्कॉलर शाळेमागे निंभोरा, अमरावती
मो.९०९६०२८७२०

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे **श्री.विनोद रतनगीर गोसावी,** रा.प्लॉट क्र.१८, केशरवाणी लेआऊट, न्यू गणेश कॉलनी, अमरावती ता.जि.अमरावती-४४४६०१, यांनी **श्री.अवधुत किसनराव पोकळे**, नांदगांव पेठ, अमरावती ता.जि.अमरावती यांच्याशी त्यांनी दिनांक ०५.०१.२०२५ रोजीचे अनु.दस्त क्र.३३/१९९५ नुसार खरेदी केलेली व त्यांच्या मालकीची व ताब्यातील खालील वर्णित स्थावर मालमत्ता (शेतजमीन) विकत घेण्याचा सौदा कायम करीत आहे. स्थावर मालमत्ता (शेतजमिनीचे) वर्णन - सब रजिस्ट्रार नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण विभाग, जि.प. अमरावतीचे कक्षेती ग्रामपंचायत नांदगांव पेठ चे हद्दीतील मौजे अमन्नापूर, प्रगणे नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती, भूमापन क्र.व उपविभाग ३४/३, भो.वर्ग १, एकुण क्षेत्रफळ २ हे.५४ आर यापैकी दि.१७.०६.२०२१ च्या नायब तहसीलदार यांच्या विभाजनाच्या आदेशानुसार ज्याचा क्र.रामाक्र./एसआरव्ही/४३/अमन्नापूर/७६/२०२०/२०२१ विभाजन झालेली पूर्व-पश्चिम वाटणीची उत्तरेकडील माझ्या मालकीची व ताब्यातील शेतजमीन क्षेत्रफळ १ हे.२० आर, आ.रु.५.४८, खाते क्र.१०३८ हिस्सा सालीम शेतजमीन यामध्ये असलेल्या झाडाझुडपासह, जलपाषाणासह व इतर जमीन संलग्न तदंगभूत वस्तुसह तसेच शेत गट क्र.४३/३ मधील नंदकिशोर किसनराव पोकळे यांच्या शेतात असलेल्या सामाईक विहीर, मोटरपंपावरुन १/३ पाणी घेण्याचा हक्कासह, याची चतुःसिमा खालीलप्रमाणे- पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस - रस्ता व श्री.कांबळे यांचे शेत, उत्तरेस - अब्दुल जमील अब्दुल रशीद यांचे शेत,दक्षिणेस - नंदकिशोर किसनराव पोकळे यांचे शेत.

त्याअर्थी वरील वर्णित मालमत्तेबाबत कोणाचाही गहाण, बोझा, तारण, सावकारी व्यवहार, वारसा हक्क व इतर अधिकार जे कायदेशीररित्या अडथळा करतील असे व्यवहार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळवावे. अन्यथा कोणालाही कुठल्याही प्रकारची हरकत/तक्रार न ाही असे समजून सौदा करण्यात येईल व त्यानंतर वरील सर्व प्रकारचे व्यवहार आमच्यावर बंधनकारक राहणार नाही. तथा आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कसलाही उजर/अधिकार/हक्क/तक्रार इत्यादी चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

करीता ही नोटीस जाहीर करत आहे.
ठिकाण - अमरावती
दिनांक - ०८.०५.२०२६

(ॲड.निलेश ज.पुंड)
**१०२, गजानन अपार्टमेंट, मोहन कॉलनी,**
**अर्जुन नगर, अमरावती**
मो.८४२१७२२१११

# मोथा येथे गावकऱ्यांच्या सुविधेसाठी शुद्ध पाणीपुरवठ्याचे नियोजन

**अमरावती/ प्रतिनिधी**

दुर्गम भागातील नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा व्हावा आणि त्यांच्या आरोग्याचे रक्षण व्हावे, यासाठी मोथा ग्रामपंचायत व स्थानिक प्रशासनामार्फत विविध उपाययोजनांवर भर दिला जात आहे. चिखलदरा तालुक्यातील मोथा येथे गावकऱ्यांची सोय व स्थानिक भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन पाणीपुरवठा अधिक लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने नियोजन केले जात आहे.

मोथा गावामध्ये सद्यस्थितीत गाव तलावातील विहिरीवरून पाण्याच्या टाकीद्वारे घरोघरी नळ कनेक्शन देऊन पाणीपुरवठा केला जातो. या पाण्याचे नियमित क्लोरिनेशन करून ते निर्जंतुक केले जाते. मात्र, मुख्य विहीर तलावामध्ये असल्याने पावसाळ्यात किंवा नैसर्गिक कारणांमुळे पाणी गढूळ येण्याची शक्यता लक्षात घेऊन, गावकरी हे पाणी पिण्याव्यतिरिक्त इतर घरगुती वापरासाठी प्राधान्याने वापरत आहेत. गावकऱ्यांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी गावालगत असणाऱ्या दुसऱ्या विहिरीचे स्वच्छ पाणी वापरण्याची येथील नागरिकांची पूर्वापार परंपरा आहे. ही विहीर स्वच्छ पेयजलाचा एक उत्तम नैसर्गिक पर्याय ठरली आहे. सद्यस्थितीत या दुसऱ्या विहिरीची पाणी साठवण क्षमता संपूर्ण गावाला नळ जोडणीद्वारे पुरवण्याइतकी पुरेशी नसली, तरी गावकऱ्यांची पिण्याच्या पाण्याची अडचण दूर करण्यासाठी हा पारंपरिक जलस्रोत अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं ५०बी सातुर्णाऔद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वे पुलाजवळ राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती- आवृत्ती वर्ष - ३७ अंक - २४१**
आर.एन.आय.रजी.नं.४९७६३ पोस्टल लायसन क्र
ATI\RNP\47\2023-25

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक,
अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम



# शेतकऱ्यांना पिक कर्ज तात्काळ मंजूर करण्याकरीता बँकांनी समन्वयाची भूमिका बजावावी - पालकमंत्री डॉ.भोयर

**वर्धा/जनमाध्यम**

खरीप हंगामाला सुरवात होत असून शेतकरी हंगामासाठी पिक कर्ज घेत असतो. पिक कर्जासाठी बँक शाखेत अर्ज केल्यावर सदर अर्ज मुख्य शाखेत मंजुरीसाठी पाठविण्यात येत असल्यामुळे कर्ज प्रकरणे मंजूर होण्यास बराच वेळ जातो. परिणामी पेरणीला सुरवात होऊन जाते. यासाठी बँकांनी समन्वयाची भूमिका बजावून पिककर्जाची प्रकरणे तात्काळ मंजूर करावी. पिक कर्जाचे १०० टक्के वितरण करावे, अशा सूचना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केल्यात.

जिल्हास्तरीय खरीप हंगाम पुर्व आढावा बैठकीचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी त्यांनी सुचना केल्या. बैठकीला खा. अमर काळे, आ. दादाराव केचे, आ. समिर कुणावार, आ. राजेश बकाने, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलीस अधिक्षक सौरभकुमार अग्रवाल, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी अरविंद उपरीकर आदी उपस्थित होते.मागील वर्षी ८८७ कोटी ४८ लाख रुपयांचे पिककर्जाचे वाटप करण्यात आले. यावर्षी देण्यात आलेले



पिककर्जाचे १०० टक्के लक्षांक पूर्ण होईल, असे बँकांनी नियोजन करावे. प्रधानमंत्री सौर कृषि पंप योजनेंतर्गत लावण्यात आलेल्या सौरपंपामध्ये शेतकऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी विद्युत वितरण कंपनीने जिल्हा व तालुका तक्रार निवारण कक्ष स्थापन करावा. पुर्वी गोपिनाथ मुंअंडे शेतकरी अपघात विमा योजनेत केवळ शेतकऱ्यांना मदत देण्यात येत होती. शासनाने यामध्ये बदल करुन शेतमजूरांचा समावेश केला आहे. याची ग्रामीण भागात कृषि विभागांनी जनजागृती करावी. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत निधीपासुन वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी प्रयत्न करावे, अशा सूचना यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिल्यात.एल निनोच्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी जलसंधारण, जलयुक्त शिवारमधील कामांचे प्राधान्य ठरवून ती पूर्ण करण्यात यावीत. तसेच शेतक-यावर दुपारी पेरणीचे संकट येऊ नये यासाठी गावस्तरावर बैठका घेऊन शेतीचे नियोजन करण्यासाठी मार्गदर्शन करावे, अशाही सुचना यावेळी पालकमंत्री डॉ. भोयर यांनी दिल्यात.

यावर्षी जिल्ह्यात धान, ज्वारी, बाजरी, मका, तुर, मुग, उडीद, सोयाबीन, तीळ, सुर्यफुल, भुईमुग, कापूस या पिकासाठी ४ लाख १८ हजार ९७५ हेक्टर पेरणीचे नियोजन करण्यात आले असून ८७ हजार १८४ क्विंटल बियाणे मागणीचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी १ लाख १७ हजार १०० मेट्रीक टन खताची मागणी असून एप्रिल अखेर पर्यंत ५९ हजार १८९ मेट्रीक टन खताचा साठा शिल्लक आहे, असे अरविंद उपरीकर यांनी बैठकीत सांगितले.

यावेळी खा.अमर काळे यांनी खत वितरीत करण्यासाठी वर्धा व हिंगणघाट रॅक पॉईट असल्याने काही तालुक्यात खत पुरवठ्याला विलंब होत असतो, याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले. आ. दादाराव केचे यांनी बोगस बियाणे विक्री करण्यावर आळा घालण्यासाठी प्रयत्न करावे. पीएम किसान निधी पासुन वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी प्रयत्न करा, असे सांगितले तर आ. समिर कुणावार यांनी शेतक-यांना माती परीक्षण यावर मार्गदर्शन करण्यासाठी तालुका स्तरावर कार्यशाळेचे आयोजन करावे, असे ते म्हणाले.आ.राजेश बकाने यांनी एलनिनोच्या पार्श्वभूमीवर विद्युत वितरण कंपनील जागृक राहून तसे नियोजन करण्याच्या सुचना दिल्यात. बैठकीला संबंधीत विभागाचे अधिकारी, कृषि निविष्ठा दुकानदार संघटनेची प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी उत्कृष्ट व नाविण्यपूर्ण शेती करणा-या शेतक-यांचा व शेतक-यांना सहकार्य करणा-या आधिका-यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## केसरीमल कन्या शाळेची यशपरंपरा कायम

**वर्धा/जनमाध्यम**

स्थानिक केसरीमल कन्या शाळेच्या विद्यार्थिनींनी एसएससी



बोर्ड शालांत परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शाळेची उज्ज्वल परंपरा कायम राखली. विद्यालयाचा निकाल तब्बल ९६ टक्के लागला असून ९८ विद्यार्थिनींपैकी ९४ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत. विद्यार्थिनींच्या या घवघवीत यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.यंदाच्या परीक्षेत श्रुत्ती खीरडकर हिने ९६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. वृषाली वाढई हिने ८९.४० टक्के, चाहत पेटकर हिने ८६.४० टक्के, श्रावणी थाये हिने ८६ टक्के, नुतन बढिये हिने ८५.२० टक्के तर शिवानी अवथळे हिने ८५ टक्के गुण मिळवून यश संपादन केले.या यशस्वी विद्यार्थिनींच्या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला विमेन्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माधव पंडित, कार्यवाह संध्याताई पुरेकर तसेच मुख्याध्यापिका धनिष्ठा बोरुटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थिनींचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.मान्यवरांनी विद्यार्थिनींना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वास यांच्या बळावर यशाचे नवे शिखर गाठण्याचा संदेश दिला. संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे संचालन ज्योती भगत यांनी केले.

## शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त केव्हा होणार?

### नसबंदी आणि रेबीज लस देण्यांची पालिकेची जबाबदारी



**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

दिवसेंदिवस शहरात मोकाट कुत्र्यांची वाढती संख्या पाहता लहान मुले,शाळकरी विद्यार्थी,म्हातारे अबला वृध्द या कुत्र्यांच्या भुकण्याने आणि अंगावर येवुन चाल घेण्याने कायमचे दहशतीत असता या मोकाट कुत्र्यांवर पालीका कधी अंकुश लावणार असा प्रश्न आता सिंदीकर विचारु लागले आहेत.

शहर दिवसेंदिवस बकाल होत असतांनाच शहरातील रहीवाशांना उदरनिर्वाहासाठी कामाच्या शोधात बाहेर जावे लागते शिवाय शहरात शैक्षणिक सुवीधांच्या दुष्काळामुळे विद्यार्थ्यांना शहराच्या बाहेर जावे लागते यांचे शहरात जाने-येने रात्री अपरात्री होत असते परिणामांचा शहरात वाढलेली मोकाट कुत्र्यांच्या संख्येमुळे त्यांच्या पुढे मोठे संकट उभे असते.रात्री येणाऱ्यावर भुकने,गाडीच्या मागे धावने, अंगावर गाडीवर चालुन येथे,चावा घेणे अशा घटना नित्यांच्या झाल्या आहेत.यामुळे या मोकाट कुत्र्यांची शहरात चांगलीच दहशत निर्माण झाली आहे.या मोकाट कुत्र्यांच्या संख्येवर अंकुश लावण्यासाठी पालीकेने यांची नसबंदी करण्याची मोहीम सुरू करावी.सोबतच उघड्यावरील अन्न, मांस खाऊन पोट भरणारी ही कुत्री संसर्गजन्य आजाराचे सर्वात मोठे वाहक आहे पुढे पावसाळा सुरू होणार असुन पुढील धोका लक्षात घेता पावसाळ्यापूर्वी यां मोकाट कुत्र्यांचे रेबीज लक्षीकरन होने काळाची गरज आहे.पालीकेने सिंदीकरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने याकडे लक्ष देऊन हि समस्या सोडवावी अशी जनतेची मागणी आहे.

हिंगणघाट नगरपरिषदेने 'वेट फार ॲनीमल' संस्थेच्या सहकार्याने हिंगणघाटातील संपूर्ण मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया आणि रेबीज लशीकरन मोहीम हाती घेतली आहे.सिंदी नगरपालिकेने सुध्दा तातडीने पावसाळ्यापूर्वी हि मोहीम शहरात राबवावी.मुख्याधिकारी सिंदीवासीयांच्या सुरक्षेला प्रथम प्राधान्य द्यावे असे मला वाटते.

**सुरज कोपरकर नगरसेवक.सिंदी रेल्वे**

## बोर बनले 'बिग कॅट'चे साम्राज्य; १४ वाघांसह ६४ बिबट्यांची धडकी भरवणारी नोंद

### बोर व्याघ्र प्रकल्पाच्या चौथ्या गणनेचा धडकी भरवणारा अहवाल
### विदर्भातील जंगल आता 'बिग कॅट हब' बनण्याच्या वाटेवर

**वर्धा/जनमाध्यम**

विदर्भाच्या जंगलात आता फक्त वाघच नव्हे, तर बिबट्यांचाही 'राज' वाढत असल्याचे धक्कादायक आणि तितकेच अभिमानास्पद चित्र समोर आले आहे. जैवविविधतेने समृद्ध असलेल्या बोर व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर आणि बफर क्षेत्रात तब्बल ६४ बिबट्यांचा अधिवास असल्याची अधिकृत नोंद समोर आली असून, त्यासोबतच १४ प्रौढ वाघांचे अस्तित्वही अधोरेखित झाले आहे. वाईल्ड लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, देहरादूनच्या तज्ज्ञांनी जाहीर केलेल्या सन २०२४-२५ च्या वन्यजीव गणनेच्या चौथ्या टप्प्यातील अंतिम अहवालामुळे वन विभागासह पर्यावरणप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

एकेकाळी देशातील सर्वात छोटा व्याघ्र प्रकल्प म्हणून ओळख असलेला बोर आज जंगल संवर्धनाच्या नकाशावर झपाट्याने मोठे स्थान मिळवत आहे. बफर क्षेत्राचे एकसंघ नियंत्रण आल्यानंतर बोरची ओळख बदलली आणि आता हे जंगल वाघ-बिबट्यांचे सुरक्षित आश्रयस्थान बनत असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे.सुमारे १३ हजार ८०० हेक्टरचे कोअर क्षेत्र आणि ६७ हजार ८१४.४६ हेक्टरचे विस्तीर्ण बफर क्षेत्र असलेल्या बोर व्याघ्र प्रकल्पात वन्यजीवांची अचूक संख्या शोधण्यासाठी यंदा अत्याधुनिक पद्धतीने गणना करण्यात आली. तब्बल ३९६ ट्रॅप कॅमेऱ्यांचे जाळे जंगलभर उभारण्यात आले होते. दिवस-रात्र टिपलेल्या हजारो छायाचित्रांचे बारकाईने विश्लेषण केल्यानंतर हा अंतिम अहवाल तयार करण्यात आला.या अहवालाने एक गोष्ट निर्विवादपणे स्पष्ट

**स्पॉटेड क्वीन'चाच दबदबा** - अहवालानुसार, बोर व्याघ्र प्रकल्पातील ६४ बिबट्यांमध्ये २७ नर, ३४ मादी आणि ३ 'सेक्स अनआयडेंटिफाईड' बिबट्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे मादी बिबट्यांची संख्या अधिक असल्याने भविष्यात बिबट्यांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता वन्यजीव अभ्यासकांनी व्यक्त केली आहे.

**९ बिबट्यांची 'सीमापार' हालचाल** -गणनेदरम्यान २८ बिबट कोअर क्षेत्रात, तर २७ बिबट बफर क्षेत्रात आढळले. मात्र, ९ बिबट्यांची कोअर आणि बफरमध्ये सतत मुव्हमेंट असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे बोरचे जंगल वन्यजीवांसाठी किती सुरक्षित आणि मुक्त अधिवास ठरत आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

केली आहे, बोरचे जंगल आता केवळ पर्यटनाचे आकर्षण राहिले नसून ते वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे केंद्र बनले आहे. जंगल सफारीसाठी विदर्भासह राज्यभरातून येणाऱ्या पर्यटकांना आता बिबट्यांचे वाढते अस्तित्वही आकर्षित करणार आहे.

बोरच्या जंगलातून आलेली ही आकडेवारी केवळ वन विभागासाठी नव्हे, तर संपूर्ण विदर्भासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. मात्र, वाढत्या वन्यजीव संख्येसोबत मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी प्रशासनाने अधिक सतर्क आणि सज्ज राहण्याची गरजही या अहवालाने अधोरेखित केली आहे.



जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १६३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त

### युवकास बेदम मारहाण

**हिंगणघाट** - अंगावर पाणी उडाल्याच्या किरकोळ कारणावरून युवकाला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना शहरातील बिडकर वॉर्ड परिसरात घडली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा नोंद केला आहे.अक्षय भोयर (वय २९, रा. गोमाजी वॉर्ड) हा चारचाकी वाहनाने कलोडे चौकातून जात होता. दरम्यान, रस्त्यावरील खड्ड्यात वाहन गेल्याने पाणी उडून ते सुशांत गैरवार यांच्या अंगावर पडले. या कारणावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर सुशांत गैरवार याने अक्षय भोयर याला लाथाबुक्क्यांनी तसेच काठीने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या मारहाणीत अक्षय जखमी झाला. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी प्रकरणाची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.

### मोटारपंपसह केबल पळविला

**पुलगाव** - शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी नदीवर बसविण्यात आलेला सबमर्सिबल मोटारपंप आणि केबल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना वाघोली बिरे शेतशिवारात उघडकीस आली. या चोरीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.मंगेश बिरे (वय ४९) आणि सतीश मोकाशी, दोघेही रा. वाघोली यांनी नदीवर सबमर्सिबल मोटारपंप बसवून पिकांच्या ओलीतीसाठी पाणीपुरवठा सुरू केला होता. मात्र, अज्ञात चोरट्यांनी संधी साधून मोटारपंपासह सुमारे ३०० मीटर केबल चोरून नेली. चोरीस गेलेल्या साहित्याची किंमत सुमारे १७ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. सकाळी शेतात गेल्यानंतर मोटारपंप आणि केबल जागेवर नसल्याचे लक्षात येताच शेतकऱ्यांनी पोलिसांत तक्रार दिली. पुलगाव पोलिसांनी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### तुकाराम वॉर्डातून दुचाकी पळविली

**वर्धा** - घरासमोर उभी करण्यात आलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना तुकाराम वॉर्ड परिसरात घडली. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.लतेश अग्रवाल (वय ४६, रा. तुकाराम वॉर्ड) यांनी नेहमीप्रमाणे आपली दुचाकी घरासमोर उभी केली होती. दरम्यान, अज्ञात चोरट्याने संधी साधून दुचाकी चोरून नेली. काही वेळानंतर दुचाकी जागेवर नसल्याचे लक्षात येताच परिसरात शोध घेण्यात आला. मात्र, वाहनाचा कुठलाही मागमूस लागला नाही. अखेर रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे. शहरात वाढत्या वाहनचोरीच्या घटनांमुळे नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त होत आहे.

### गळफास घेत व्यक्तीची आत्महत्या

**वर्धा** - राहत्या घरी गळफास घेऊन एका व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना येळाकेळी येथे उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.आकाश चापडे (वय ३३, रा. येळाकेळी) याला दारूचे व्यसन होते. त्याच्या व्यसनामुळे पत्नी आणि मुलगा त्रस्त होऊन वेगळ्या ठिकाणी राहत असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे तो मानसिक विवंचनेत होता. अशाच अवस्थेत त्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली, असे तक्रारीत नमूद असल्याचे सावंगी पोलिसांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.

### स्नानगृहात पडून व्यक्तीचा मृत्यू

**हिंगणघाट** - स्नानगृहात पाय घसरून पडल्याने जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना शहरातील म्हाडा कॉलनी परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.प्रवीण मेश्राम (वय ३५, रा. म्हाडा कॉलनी, हिंगणघाट) हे घरातील स्नानगृहात असताना अचानक पाय घसरून खाली पडले. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांनी रुग्णालयात भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

## नगरपालिकांनी जिल्हा वार्षिकचे प्रस्ताव प्राधान्यक्रम ठरवूनच सादर करावेत - पालकमंत्री डॉ.भोयर

**वर्धा/जनमाध्यम**

नगरपालिका प्रशासनाने नागरिकांच्या प्राधान्यक्रमानुसार कामे घेतल्याशिवाय प्रस्ताव सादर करू नयेत. विशेषतः शहरातील मोकळ्या जागांचे संरक्षण, अभ्यासिकांचे व्यवस्थापन, शाळांतील मूलभूत सुविधा व नागरी समस्यांवरील तातडीच्या उपाययोजना यांना अग्रक्रम देण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा वार्षिक योजनेचा (सर्वसाधारण) खर्च व आगामी नियोजनाचा आढावा पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी घेतला, त्यावेळी ते बोलत होते. आमदार समीर कुणावार, जिल्हाधिकारी



वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, उपवनसंरक्षक हरवीर सिंग, जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुध्द राजुरवार यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.नगरपालिकांनी शहरी महिला बचत गटांच्या बैठका घेऊन इच्छुक गटांना मोकळ्या जागांची जबाबदारी द्यावी. त्या ठिकाणी लहान स्वरूपाचे निवारे अथवा कार्यालय उभारून महिलांना उद्योग सुरू करता येईल का, याचा विचार करावा. तसेच गार्डन मेंटेनन्सची कामेही बचत गटांना देण्यात यावीत. त्यामुळे अतिक्रमणास आळा बसेल आणि अनधिकृत उपक्रम थांबतील. हा विषय एक महिन्याच्या आत पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

वर्धा नगरपालिकेत काही अभ्यासिका सुरू असल्या तरी त्यांचे योग्य व्यवस्थापन नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. ज्या अभ्यासिका सुरू आहेत, त्या सामाजिक संस्थांच्या माध्यमातून व्यवस्थित चालवाव्यात. नगरपालिकांच्या शाळांमध्ये स्वच्छ शौचालये, बाथरूम, शुद्ध पिण्याचे पाणी, वर्गखोल्यांतील गळती दुरुस्ती, प्रयोगशाळेतील सुविधा यांना प्राधान्य द्यावे, असे निर्देश दिले. आवश्यक असल्यास शिक्षणाधिकाऱ्यांकडे जबाबदारी सोपवावी. अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने यंत्रणांनी सादर केलेल्या प्रस्तावांची काटेकोरपणे तपासणी करावी, असेही त्यांनी सांगितले.बांधकाम विभागाने केवळ अंदाजपत्रक व टेंडर प्रक्रियेत न अडकता निर्माण झालेल्या मालमत्तेचे जतन कसे होईल, यावरही लक्ष केंद्रित करावे. बांधकाम व आरोग्य विभागांनी संयुक्त नियोजन करून प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि सिव्हिल हॉस्पिटलमधील लहान-मोठ्या दुरुस्त्यांचा आराखडा तयार करावा. स्वच्छता, रंगरंगोटी, पायऱ्यांची दुरुस्ती, विद्युत सुरक्षितता आदी बाबी तातडीने मार्गी लावून प्रस्ताव सादर करावेत. मृद व जलसंधारण विभागाने अर्धवट असलेली सर्व कामे पावसाळ्यापुर्वी पूर्ण करावीत. शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना पालकमंत्री डॉ.भोयर यांनी यावेळी दिल्या.आ. समीर कुणावार यांनी देखील अनेक विषय उपस्थित केले. जिल्हाधिकारी वान्मथी सी म्हणाल्या, कुठलेही काम प्रस्तावित करतांना संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेवूनच प्रस्ताव सादर करा. स्थानिक पातळीवर कामे करतांना अडचण आल्यास विभाग प्रमुखांना अवगत करा. सर्व विभागांनी विहित मर्यादेत प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.पशुसंवर्धन, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, लघू पाटबंधारे, महिला व बालविकास आदी विभागाचा सविस्तर आढावा पालकमंत्री डॉ. भोयर यांनी यावेळी घेतला.

## विठ्ठलराव पराते (शेटे) यांचे निधन

**सिंदी रेल्वे/वार्ताहर**



येथील लोखंडी पुलाजवळील रहिवासी विठ्ठल शंकरराव पराते (शेटे) वय वर्षे ७९ यांचे निधन झाले, त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर जांभुळ घाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले,

# दोन मोजण्या - दोन अहवाल ... अन् 'अरबों'च्या दंडवसुलीतून 'अरुण' पळवाट?

## गाजीपूर-रुदाळी खाण प्रकरणात महसूल यंत्रणेवर संशयाचे सावट

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या गाजीपूर आणि रुदाळी परिसरातील गौण खनिज खदानी पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आल्या आहेत. खदानींच्या मोजणीत दोन सरकारी विभागांनी सादर केलेल्या अहवालांमध्ये प्रचंड तफावत आढळून आल्याने संपूर्ण महसूल आणि खनिकर्म यंत्रणेवरच संशयाचे सावट गडद झाले आहे. विशेष म्हणजे, पहिल्या मोजणीत लाखो ब्रास अतिरिक्त उत्खनन स्पष्टपणे समोर आले असताना, दुसऱ्या ETS मोजणीने संपूर्ण चित्रच बदलल्याची चर्चा रंगली आहे. परिणामी शासनाच्या कोट्यवधी नव्हे, तर अरबो रुपयांच्या दंडवसुलीवर पाणी फेरले जाणार का, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

अकोट तालुक्यातील पोपटखेड गट ग्रामपंचायतीअंतर्गत येणारे गाजीपूर आणि रुदाळी हे आदिवासी बहुल भाग गेल्या दीड दशकात खनिज उत्खननाचे मोठे केंद्र बनले आहेत. २०१० नंतर येथे गौण खनिज उत्खनन व्यवसाय झपाट्याने वाढला. सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या डोंगररांगांवर मोठ्या प्रमाणात उत्खनन करून परिसर अक्षरशः पोखरून काढल्याचे चित्र आहे. मात्र या उत्खननातून शासनाच्या तिजोरीत अपेक्षित महसूल जमा झाला का? हा प्रश्न कायम अनुत्तरित राहिला आहे.

दरम्यान, सन २०२४ मध्ये गाजीपूर आणि रुदाळी येथील १४ तात्पुरत्या व लीजधारक खदानींची संयुक्त मोजणी करण्यात आली होती. उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, अकोट आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकाने तलाठी, मंडळ अधिकारी तसेच संबंधित परवानाधारक किंवा त्यांच्या

### ईटीएस मोजणीतून नेमके कुणाला अभय?



प्रतिनिधींच्या उपस्थितीत ही मोजणी केली होती. या मोजणीचा सविस्तर अहवाल उपविभागीय अधिकारी (महसूल) तसेच जागतिक बँक प्रकल्प विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना सादर करण्यात आला. या अहवालातील निष्कर्ष धक्कादायक होते. परवानगीपेक्षा लाखो ब्रास गौण खनिजाचे अतिरिक्त उत्खनन झाल्याचे प्राथमिक निष्कर्षात स्पष्ट झाले होते.

यानंतर अकोट तहसीलदारांनी उत्खनन आणि परवान्यातील तफावत तपासून संबंधित खाणधारकांना मार्च २०२५ अखेरीस नोटीस वजा पत्रेही बजावली होती. त्यामुळे आता मोठ्या दंडवसुलीची कारवाई होणार, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, यानंतर संपूर्ण प्रकरणाला अचानक वेगळे वळण मिळाले. खाणधारकांनी पहिली मोजणीच अमान्य असल्याचा

■ दरम्यान, आता या दोन्ही मोजण्यांची स्वतंत्र चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. पहिली मोजणी चुकीची होती की ETS अहवालात आकडे 'व्यवस्थित' करण्यात आले, हा खरा प्रश्न असून शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास हा प्रकार राज्यातील सर्वात मोठ्या गौण खनिज घोटाळ्यांपैकी एक ठरू शकतो, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

' अरुण ' दावा करत महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या 'आशीर्वादा'ने नव्याने ETS मोजणीची मागणी पुढे रेटल्याची चर्चा सुरू झाली.

विशेष म्हणजे महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांनीही या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत भूविज्ञान व खणीकर्म संचालनालय, नागपूरमार्फत पुनर्मोजणीची शिफारस केली. यानुसार २३ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान ETS पद्धतीने नव्याने मोजणी करण्यात आली. मात्र या ETS अहवालाने पहिल्या मोजणीतील अनेक निष्कर्षांना छेद दिल्याचे समोर येत आहे. दोन्ही अहवालांतील आकडेवारीत एवढी मोठी तफावत कशी आली, यावरूनच संशय अधिक गडद झाला आहे. एकाच खदानींच्या मोजणीत दोन सरकारी यंत्रणांचे निष्कर्ष परस्परविरोधी कसे असू शकतात, असा सवाल आता स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, पहिल्या मोजणीत मोठ्या प्रमाणात अतिरिक्त उत्खनन दिसत असताना दुसऱ्या अहवालामुळे संबंधित खाणधारकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी शासनाला आकारण्यात येणाऱ्या दंडाच्या रकमेत प्रचंड घट होऊ शकते. या संपूर्ण प्रक्रियेमुळे महसूल विभागातील काही अधिकारी, खनिकर्म विभाग आणि खाणधारक यांच्यात 'साटेलोटे' असल्याचा आरोप आता उघडपणे होऊ लागला आहे.

स्थानिक पातळीवर तर या प्रकरणात केवळ महसूल घोटाळाच नव्हे, तर पर्यावरणीय नियमांचीही मोठ्या प्रमाणावर पायमल्ली झाल्याचा आरोप होत आहे. सातपुड्याच्या संवेदनशील पट्ट्यात सुरू असलेल्या अनियंत्रित उत्खननामुळे भूगर्भीय संतुलन धोक्यात आले असून, जंगल क्षेत्र आणि जलस्त्रोतांवरही परिणाम होत असल्याची चर्चा आहे. मात्र प्रशासनाकडून याकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

# घातखेडा तलावात बुडून चार जणांचा मृत्यू

## मृतांमध्ये सख्खा बहिण -भावाचा समावेश

**-महाजनपुरा परिसरावर शोककळा**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील डॉ.गोळे महाविद्यालयामागील घातखेडा तलाव परिसरात रविवारी दुपारी भीषण दुर्घटना घडली. डब्बा पार्टीसाठी गेलेल्या चार अल्पवयीन मुलांचा तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांमध्ये सख्खा भाऊ-बहिणीचाही समावेश असल्याने महाजनपुरा परिसरावर शोककळा पसरली आहे. मृत मुलांची नावे सोनाली नरेंद्र जोशी (वय १६), आदित्य नरेंद्र जोशी (वय १२), पायल बबलू पंडित (वय १४) आणि यश गजानन काकने (वय १३) अशी आहेत. सर्व मृतक





महाजनपुरा परिसरातील रहिवासी होते. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी हे सर्व मुले-मुली डब्बा पार्टीसाठी घातखेडा तलाव परिसरात गेले होते. जेवणानंतर सोनाली तलावात उतरली. मात्र, ती खोल पाणी आणि चिखलात अडकून बुडू लागली. तिला वाचविण्यासाठी आदित्य, पायल आणि यश यांनीही तलावात उडी घेतली. परंतु, चारही जण चिखलात अडकल्याने बाहेर येऊ शकले नाहीत. सोबत ☞(पान २ वर)

### ■ आक्रोशाने हादरला परिसर

'माझ्या लेकरांना परत आणा...!' असा हंबरडा फोडत कुटुंबीयांनी इर्विन रुग्णालय परिसरात आक्रोश केला. एका घरातील सख्खा भाऊ-बहिणीचा मृत्यू झाल्याने जोशी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आई-वडिलांचा आक्रोश पाहून उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. परिसरातील नागरिकांनीही घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. आनंदासाठी गेलेली निष्पाप लेकरं काळाच्या पडद्याआड गेल्याने महाजनपुरा परिसरात हळहळ आणि शोक व्यक्त केला जात आहे.

## अन्वी भोसले प्रकरण

# दफन केलेला मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदन

### जनमाध्यमच्या वृत्ताची दखल

**-उष्माघात, पाण्याअभावी मृत्यू की अन्य कारण? फॉरेन्सिक अहवालाकडे लक्ष**

**-प्रशासन, पोलिस व आरोग्य विभागाच्या उपस्थितीत घटनास्थळीच प्रक्रिया**

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** नेर तालुक्यातील आजंती येथील पारधी बेड्यावर राहणाऱ्या ९ वर्षीय अन्वी भोसले हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाला अखेर नवे वळण मिळाले आहे. जनमाध्यम वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या वृत्ताची दखल घेत प्रशासनाने दफन करण्यात आलेला मृतदेह बाहेर काढून घटनास्थळीच शवविच्छेदनाची प्रक्रिया पार पाडली. १ मे रोजी अन्वीचा अचानक मृत्यू झाला होता. पिण्याच्या पाण्यासाठी जात असताना ती कोसळल्याची माहिती समोर आली होती. उष्माघात, पाण्याअभावी झालेला त्रास किंवा अन्य कारणामुळे मृत्यू झाला असावा, असा संशय स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत होता. मात्र मृत्यूनंतर कोणतीही वैद्यकीय तपासणी अथवा शवविच्छेदन न करता

संघटना व नागरिकांकडून सातत्याने मागणी होत असताना प्रशासनाने अखेर गंभीर दखल घेत चौकशी प्रक्रिया सुरू केली. आज सकाळी तहसील प्रशासन, पोलीस विभाग, फॉरेन्सिक पथक व आरोग्य विभागाच्या उपस्थितीत





दफन केलेला मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर घटनास्थळीच शवविच्छेदन करण्यात आले. यावेळी तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी, पोलीस निरीक्षक अनिल बेहेराणी, डॉ. प्रशिक भोयर, पोलीस उपनिरीक्षक दीपक बदरके, मंडळ अधिकारी रुपेश थोड्यो तसेच तलाठी अतुल शिरभाते उपस्थित होते.

दरम्यान, आजंती पारधी बेड्यावर तीव्र पाणीटंचाई असल्याचा आरोप नागरिकांनी पुन्हा एकदा केला आहे. मूलभूत सुविधांच्या अभावामुळेच ही दुर्दैवी घटना घडल्याचा संताप स्थानिकांनी व्यक्त केला. फॉरेन्सिक अहवाल प्राप्त झाल्यानंतरच अन्वीच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, अशी माहिती डॉ. प्रशिक भोयर यांनी दिली.


### ■ जनमाध्यमच्या वृत्तानंतर प्रशासन जागृत

अन्वी भोसले प्रकरणी जनमाध्यम मध्ये प्रकाशित झालेल्या वृत्तानंतर जिल्हा प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या. शवविच्छेदन न करताच दफनविधी झाल्याने उपस्थित झालेले प्रश्न आणि नागरिकांमधील तीव्र प्रतिक्रिया लक्षात घेऊन प्रशासनाने मृतदेह बाहेर काढण्याचा निर्णय घेतला.आता फॉरेन्सिक अहवालातून नेमके सत्य समोर येणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# अल्टो कारमधून बकरीची चोरी

## शिरजगाव कसबा पोलिसांत गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिरजगाव परिसरात अल्टो कारमधून बकरी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणी शिरजगाव कसबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मोहम्मद असीम मोहम्मद इकबाल (वय २७, रा. फ्रेंडस कॉलनी, शिरजगाव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला. जोडखंबा परिसरात शुक्रवारी सायंकाळी सुमारे ४.३० वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. फिर्यादी यांनी आपल्या घरातील दोन बकऱ्या चरण्यासाठी बाहेर सोडल्या होत्या. काही वेळानंतर त्यापैकी एक बकरी घरी परत आली नाही, अशी माहिती त्यांच्या बहिणीने दिली. त्यानंतर फिर्यादी बकरीचा शोध घेण्यासाठी बाहेर पडले असता मोहल्ल्यातील शेख अर्षियान व शेख अल्तमस यांनी माहिती दिली की, अल्टो कार क्रमांक २१३६ मधील अज्ञात व्यक्तीने फिर्यादीची अंदाजे १० हजार रुपये किंमतीची बकरी कारमध्ये टाकून चोरून नेली. या प्रकरणी फिर्यादीच्या जबानीवरून शनिवारी रात्री सुमारे ८ वाजता शिरजगाव कसबा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# सालोड येथे घरफोडी

## कपाटातील सोन्याचे मणी व पेंडॉल लंपास

### मंगरूळ चव्हाळा पोलिसांचा तपास सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** मंगरूळ चव्हाळा पोलिस स्टेशन हद्दीतील सालोड येथे घरफोडीची घटना घडून कपाटातील सुमारे ३० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी मंगरूळ चव्हाळा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी नीता धनराज भबुतकर (वय ३२), रा. सालोड, ता. नांदगाव खंडेश्वर यांनी याबाबत तक्रार दिली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना शुक्रवारी रात्री १०.३० ते शनिवारी पहाटे ३.३० दरम्यान घडली. फिर्यादी यांच्यानुसार, मुलीला नवीन कपडे घालण्यासाठी त्यांनी कपाट उघडले असता कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले ४६ सोन्याचे मणी व एक सोन्याचा पेंडॉल, ☞(पान २ वर)

# युवा स्वाभिमान नगरमध्ये युवकाची निर्घृण हत्या

## संशयीत आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात खोलापुरी गेट पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका तरुणाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि१०) रात्री उघडकीस आहे. युवा स्वाभिमान नगर परिसरात झालेल्या या थरारामुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खोलापुरी गेट पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या युवा स्वाभिमान नगर येथे रविंद्र राजुरकर या नामक इसमाची हत्या करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. भरवस्तीत झालेल्या या हत्येमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

घटनेची माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलिसांनी तत्काळ धाव घेत पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत एका संशयित आरोपीला ताब्यात घेतले असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. पोलीस सध्या या आरोपीची



कसून चौकशी करत आहेत.

रविंद्र राजुरकर याची हत्या नेमकी कोणत्या कारणातून करण्यात आली, जुन्या वादातून की इतर काही कारणातून, हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. खोलापुरी गेट पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, लवकरच यामागील खरे कारण समोर येण्याची शक्यता आहे.

## 'समृद्धी'वरून गुटका तस्करी

# तब्बल १.३१ कोटींचा गुटका, सुगंधित तंबाखू, ट्रकमधून जप्त





**अकोला/प्रतिनिधीः-** समृद्धी महामार्गावरून प्रतिबंधित गुटख्याची तस्करी सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. महामार्ग पोलिसांच्या तपासणीदरम्यान ट्रकमधून कोट्यवधी रुपयांच्या गुटखा तस्करीचा भांडाफोड झाला. तब्बल १ कोटी ३१ लाख ५१ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

समृद्धी महामार्गावरील कारंजा (लाड) टोल नाका येथे महामार्ग पोलिसांकडून वाहन तपासणी सुरू होती. यावेळी महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग नागपूरचे पोलीस अधीक्षक यशवंत सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक कृष्ण कन्हैया पवार व पोलीस अंमलदार यांनी संशयित ट्रक (क्रमांक एमएच ४० सीटी २९६४) थांबवून तपासणी केली. वाहनातून गोडसर वास येत असल्याने चालकाकडे सखोल चौकशी करण्यात आली. त्यावेळी वाहनामध्ये तंबाखू सदृश्य पदार्थ असून तो अमरावती येथील जावेद नामक व्यक्तीचा असल्याचे चालकाने सांगितले. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक कृष्णकन्हैया पवार यांनी तत्काळ ☞(पान २ वर)

# दोन ट्रकमध्ये धडक; चालक जखमी

**देवगाव-पुलगाव मार्गावर भातकुली येथील घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** देवगाव-पुलगाव मार्गावरील भातकुली येथे दोन ट्रकची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एका ट्रकचा चालक जखमी झाल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शेख मोहसीन शेख जलील (वय ३३, रा. काठोडा, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली) यांच्या मालकीचा ट्रक क्रमांक एमएच २६ बीई ८९०२ हा शुक्रवारी रात्री सुमारे १० वाजता औंढा नागनाथ येथून सोयाबीनचे कट्टे भाड्याने घेऊन नागपूरकडे निघाला होता. दरम्यान, शनिवारी सकाळी




अंदाजे ५.५० वाजताच्या सुमारास देवगाव-पुलगाव मार्गावरील भातकुली येथे समोरून येणाऱ्या ट्रक क्रमांक सीजी ०४ एलई ०७२६ च्या चालकाने निष्काळजीपणे व धोकादायक पद्धतीने वाहन चालवून समोरासमोर धडक दिली. या अपघातात ☞(पान २ वर)